# दूर्वा आणि फुलें

प्र. के. अत्रे

म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र.



REFBK-0007167

३५

७३५५९
२५।२।७७

किं. ५/-
१८९३

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
संमृद्धी योजना
* १९७० *

# दुर्वा आणि फुलें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलम,
अनुक्रम ७३५५८ वि: मिश्र
क्रमांक १६७ नों दि: २७-२-७१

REFBK-0007167

लेखक
आचार्य प्र. के. अत्रे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ७१६७

किंमत अडीच रुपये

प्रकाशक
रा. जं. देशमुख
देशमुख आणि कंपनी
१९१ शनवार पुणें २

प्रथमावृत्ति १९४५
द्वितीयावृत्ति १९४९

१ पुढील आवृत्तीचे सर्व हक्क सौ. सुधा अत्रे यांच्या स्वाधीन आहेत.
२ मुखपृष्ठावरील चित्र दीनानाथ दलाल यांचें आहे.

मुद्रक
द. ग. गपचूप
शिवाजी प्रिंटिंग वर्क्स
४९५ शनवार, पुणें २

# दूर्वा आणि फुलें

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ७१६७

## माझे गुरु गडकरी

१९११ सालीं मीं गडकऱ्यांना पहिल्यान्दां पाहिलें. त्या वर्षी पुण्यांत प्लेग होता. आम्ही गांवाबाहेर एरंडवण्याच्या झोंपड्यांमध्यें रहात होतों. ज्या कोठडींत मी अभ्यासाला बसत असें, त्याच्या बरोबर मागल्या बाजूस दुसरी एक कोठडी होती. मध्यें एका तट्ट्याची तेवढी पातळशी फारकत होती. या मागल्या खोलींत एक छोटीशी खाणावळ होती. तिच्यांत पांचसहा माणसें जेवायला येत. या खाणावळींतल्या वासाचा आणि वर्दळीचा आम्हांला चांगलाच उपसर्ग होत असे. विशेषत: तेथें एक माणूस जेवायला येत असे. तो आला कीं, तासभर त्याच्या तोंडाची टकळी अशा खड्या स्वरांत वाजे कीं, अभ्यासाचीं पुस्तकें बाजूला ठेवून ती ऐकत बसण्यावांचून मला दुसरा उपायच नसे. तो माणूस पट्टीचा बडबड्या होता. अनेक विषयांवर बोलून तो आपल्या भोजनभाऊंना हंसवीत असे. एके दिवशीं हा माणूस आपल्या श्रोत्यांना एक गोष्ट सांगत होता. 'वर पाहिजे' अशी खोटी जाहिरात देऊन कांहीं गुंडांनीं एका अविवाहित श्रीमंत माणसाला कसें लुबाडलें याविषयींची ती गोष्ट होती. ही गोष्ट मीं पूर्वी वाचली होती. तेव्हां मला राहवेना. मी माझ्या खोलींतून ओरडलों, 'ही गोष्ट छापून आली आहे मासिक मनोरंजनांत!' त्याबरोबर त्या बडबड्या माणसाचा खडा सवाल तिकडून आला, 'बरोबर. काय नांव त्या गोष्टीचें?' मी म्हणालों, 'दंडधारी!' जेवण संपतांच ही बडबडी व्यक्ति माझ्या खोलीच्या दाराशीं आली आणि एकदोन शब्दांत माझें कौतुक करून चालती झाली!

● ● ●

—ही गडकऱ्यांची आणि माझी आयुष्यांतली पहिली भेट! त्या वेळीं त्यांचें नांव 'गडकरी' आहे हें देखील मला माहीत नव्हतें. पुढें चारआठ

दिवसांनीं शेजारच्या एका बिऱ्हाडांतलें लहान मूल विलक्षण तऱ्हेनें मेलें. सकाळीं बिछाने गुंडाळून ठेवतांना एका बाईनें आपल्या मुलासकट गादी गुंडाळून ठेविली. नवऱ्यानें जेवावयाच्या वेळीं मुलाची आठवण केली, तेव्हां आईनें मुलाचा शोध सुरू केला. शेवटीं बिछान्यांत मेलेल्या स्थितींत तें मूल तिला आढळून आलें. या प्रसंगामुळें झोंपडीकर मंडळीमध्यें भयंकर खळबळ उडाली! गडकऱ्यांच्या संतापाला तर सीमा नव्हती! त्यामुळें गडकऱ्यांबद्दल मला कांहीं तरी आकर्षण वाटूं लागलें! (या अपघाताचा उल्लेख पुढें त्यांनीं आपल्या 'स्वयंपाकघराच्या गोष्टी' मध्यें केलेला आहे!) त्यानंतर पुन्हां दोन निरनिराळ्या प्रसंगीं गडकरी माझ्या दृष्टीस पडले. आमच्या झोंपड्यां-समोर कायस्थ प्रभु मंडळींचा निराळा तळ होता. तेथें कोणीतरी वृद्ध गृहस्थ वारले. त्यांच्या शेवटच्या तयारीच्या वेळीं डोक्याला टापशी बांधून आणि न शोभण्याइतका गंभीर चेहरा करून गडकरी विशेष प्रामुख्यानें वावरत असतांना मला दिसले. पुढें थोड्या दिवसांनीं प्रभु मंडळींचें संमेलन भरलें. त्या प्रसंगा-चीं गाणीं गडकरी यांनीं रचलेलीं होतीं. गडकरी हे कवि आहेत हें त्या वेळीं प्रथम मला कळून आलें, आणि त्यांच्याबद्दल मला फारच आश्चर्य वाटलें!

● ● ●

पुढें दोनतीन वर्षें मीं गडकऱ्यांना पाहिलें नाहीं किंवा त्यांच्याविषयीं कांहीं ऐकलें नाहीं. 'मासिक मनोरंजन' मध्यें मी 'गोविंदाग्रजां' च्या कविता वाचीत होतों; पण 'गोविंदाग्रज' म्हणजे गडकरी हें माहीत नव्हतें. 'राजहंस माझा निजला!' ही कविता प्रसिद्ध झाल्यानंतर 'गोविंदाग्रजां' च्या नांवाचा विल-क्षण बोलबाला झाला. मीं तर ती कविता तोंडपाठ करून टाकली. मीहि त्या सुमारास काव्यलेखनाशीं चांगल्याच कुस्त्या करूं लागलों होतों. पंचवीसतीस कविता एका वहीमध्यें लिहून मीं त्या संग्रहाला 'फुलबाग' असें नांव दिलें होतें. भालचंद्र किंवा 'भाक्या मामा' धडफळे नांवाचे आमचे एक आप्तसदृश मित्र होते. ते कधीं कधीं आमच्या घरीं येत. मी कविता करतों हें त्यांना माहीत होतें. माझ्या कांहीं कविता मासिकांकडून 'साभार परत' आल्याचेंहि त्यांना ठाऊक होतें. तेव्हां सहानुभूतीनें ते एकदां सहज मला म्हणाले, 'तुझी न् गडकऱ्यांची मी ओळख करून देतों–म्हणजे कविता करण्याच्या सर्व खुब्या तुझ्या लक्षांत येतील!' मीं विचारलें, 'गडकरी कोण?' त्यावर 'गोविंदाग्रज'

म्हणजेच ' गडकरी ' हें त्यांनीं मला सांगितलें. तेव्हां मागलें सर्व चित्र माझ्या डोळ्यांपुढें उभें राहिलें ! आणि गडकऱ्यांना भेटण्यासाठीं मी अतिशय उतावीळ झालों ! पण तो योग प्रत्यक्ष असा बऱ्याच दिवसांनीं आला.

● ● ●

' किर्लोस्कर थिएटर ' मध्यें कोठलें तरी एक नाटक पहावयाला मी गेलों होतों. नाटक संपल्यानंतर समोरच्या जोगळेकर हॉटेलांत मी चहा घेत असतां गडकरी आणि धडफळे हे चहा प्यायला म्हणून तेथें आंत आले. मला पाहतांच धडफळे यांनीं तावडतोब माझा हात ओढून मला गडकऱ्यांपुढें उभें केलें आणि माझी त्यांच्याशीं ओळख करून दिली. त्या वेळीं मी नुकताच कॉलेजांत गेलों होतों.

दुसऱ्या दिवशीं टांग्यांत बसून ते फर्ग्युसन कॉलेजकडे चालले होते. लकडी पुलाजवळ त्यांनीं मला पाहिलें. टांगा थांबवून त्यांनीं मला बोलावलें आणि दुसऱ्या दिवशींच कविता घेऊन घरीं यावयाला सांगितलें. त्याप्रमाणें 'फुलबाग' खिशांत घालून मी मोठ्या उत्सुकतेनें त्यांच्याकडे गेलों. माझ्या वहीचें आवरण वहीपासून वेगळें झालें होतें. त्याबरोबर, ' तुमच्या फुलबागेचें कुंपण नीट घाला कीं हो ! ' असें त्यांनीं मला वही हातांत घेतांच सांगितलें. माझ्या कविता वाचून ते कांहीं विशेष बोलले नाहींत. 'कविता पुष्कळ वाचीत जा !' एवढें मात्र ते म्हणाले. तेव्हां मला काय समजायचें तें मी मनांत समजलों; पण निराश मात्र मुळींच झालों नाहीं. गडकऱ्यांची आणि आपली ओळख झाली या विचारानें मी स्वतःवर बेहद्द खूष होऊन गेलों !

● ● ●

त्या दिवसापासून मीं गडकऱ्यांच्या घरीं जाण्याचा क्रम सुरू ठेवला ! गडकरी '१३६ कसबा पेठेंत' रहात होते. मीहि त्याच पेठेंत जवळपास रहात होतों. गडकऱ्यांचें घर म्हणजे पुण्यांतला एक अद्भुत इमला होता. त्याला तीन मजले होते आणि चारी बाजूंनीं तें मोकळें होतें. वर जायला एक अरुंद जिना होता. दुसऱ्या मजल्यावर गडकऱ्यांचें बिऱ्हाड म्हणजे त्यांची आई आणि भाऊ असत, आणि तिसऱ्या मजल्यावर केवळ गडकऱ्यांची बैठक असे. घरासमोर मुंजाबाचा पार होता आणि त्या पारावर उगवलेल्या उंच पिंपळाच्या फांद्या घराच्या तिसऱ्या मजल्याच्या खिडकीपर्यंत पसरलेल्या असत ! घराचा

रंग काळा होता आणि कसबा पेठेंतील धूळ त्याजवर नेहमीं उडत असल्यानें त्याला विलक्षण औदासिन्याची कळा प्राप्त झाली होती. तिसऱ्या मजल्याच्या खिडकींत गडकरी नेहमीं बसलेले असावयाचे. रस्त्यावरून जाणाऱ्यायेणाऱ्यांकडे त्यांचें सारखें अवधान असे. आपल्या घरांत वर कोण शिरतो याबद्दल ते सदा जागरूक असत. अगदीं सलगीच्या किंवा आवडीच्या माणसांशिवाय दुसऱ्यांनीं घरांत येऊन आपल्याला त्रास देऊं नये, याविषयीं त्यांचा फार कटाक्ष असे. नको असलेला मनुष्य खालून आपल्या रोखानें चालून येतो असें त्यांना दिसतांच ते वरून खिडकीमधून एकदम ओरडत, 'आतां येऊं नका तुम्ही; मी फार कामांत आहें!' या कामांत गडकरी कोणाचीहि भीडमुर्वत ठेवीत नसत. भेटायला येणाऱ्या माणसाच्या झटपट संभावनेचा हा प्रकार मीं सुरुवातीलाच दोनचार वेळ पाहिला होता. त्यामुळें प्रत्येक वेळीं त्यांच्याकडे जातांना मला फारच भय वाटत असे. न जाणो आपलीहि रवानगी खालीं रस्त्यावरूनच व्हायची! पण तसा प्रकार मात्र कधीं झाला नाहीं! चुकून एखादा माणूस खालचा जिना ओलांडून दुसऱ्या मजल्यापर्यंत पोहोंचलाच तर 'गडकरी कामांत आहेत. संध्याकाळीं या' अशी एक पाटी त्याला अडविण्यासाठीं तेथें टांगलेली होतीच. आणि जिन्यावर पावलें वाजलीं कीं, 'कोण आहे?' म्हणून गडकरी वाघासारखे वरून ओरडावयाचे तें निराळेंच! त्यामुळें गडकरी अतिशय माणूसघाणे आणि विक्षिप्त असावेत असें पुष्कळांना वाटे. पण तसें कांहीं नव्हतें. वाटेल त्या माणसानें येऊन आपल्याशीं चकाट्या पिटीत बसावें आणि आपला वेळ घ्यावा हें त्यांना मुळींच आवडत नसे.

● ● ●

चोवीस तास गडकरी विचारांत किंवा वाचनांत व्यग्र असत. एकसारखें त्यांच्या डोक्यांत कांहींना कांहीं तरी चक्र फिरत असे. चार मित्रमंडळी जमा झाली कीं, त्यांच्या गप्पा सुरू होत. पण या गप्पा हमखास वाङ्मयाबद्दल असत. बोलण्याचें सर्व काम अर्थात् ते स्वतःच करीत. त्यांच्यापुढें इतरांना बोलण्याची छाती नव्हे—पण इच्छाच होत नसे. त्यांच्या बोलण्याची मोहिनी अजब होती. काव्य आणि विनोद यांचा जिवंत झरा त्यांच्या वाणींतून सदैव खळखळत असे. कोट्या म्हणजे त्यांच्या हातचा मळ होता. ठराविक आणि मामुली बोलण्याची मात्र त्यांना अतिशय चीड होती. प्रत्येक

गोष्टीकडे पहाण्याची त्यांची दृष्टि अभिनव होती ! वाचलेल्या पुस्तकांतील कांहीं कल्पना घेऊन ते त्यांचें पृथक्करण अशा कांहीं चमत्कारिक तऱ्हेनें करीत कीं, त्यावर एकदम कांहीं तरी निराळा प्रकाश पडावा. गडकऱ्यांच्या गप्पांचे विषयहि तेच तेच नसत. आतां जें बोललें तें मग नसायचें. आज जें बोललें तें उद्यां नसायचें. नावीन्य हा त्यांच्या जीवनाचा आत्माच होता असें म्हटलें तरी चालेल. गडकऱ्यांच्या गप्पा म्हणजे वाङ्मयाचें एक विद्यापीठच होतें. केव्हांहि जा; हें विद्यापीठ आपलें उघडें असायचें ! मधून मधून गडकरी चहा पीत, विड्या ओढीत, भेळ खात किंवा पत्ते खेळत. तथापि त्यामुळें त्यांच्या डोक्यांतलें तंत्र कधींहि अडखळत नसे. त्यांचें काम तिकडे अहर्निश आपलें चालूच असे. गडकऱ्यांनीं आपलें सर्वस्व वाङ्मयाला वाहिलेलें होतें ! वाङ्मयाखेरीज त्यांना दुसरें जीवन नव्हतें.

● ● ●

गडकऱ्यांची वाचनपद्धति अतिशय बारकाव्याची होती. काय वाचावयाचें याची त्यांना पूर्ण कल्पना होती. भलतेंसलतें वाचण्यांत ते आपला वेळ घालवीत नसत. जें वाचलें तें त्यांच्या डोक्यांत पक्कें जाऊन बसे. ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव यांच्या काव्याचा त्यांनीं सूक्ष्म अभ्यास केलेला होता. वाचनांत ते मजकुराच्या बाजूला टीपा लिहून ठेवीत. त्या फारच मार्मिक असत. पोवाडे आणि लावणीवाङ्मय हें देखील त्यांच्या आवडीचें होतें. ऐतिहासिक बखरीहि त्यांनीं काळजीपूर्वक वाचून ठेविलेल्या होत्या. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांची ‘ निबंधमाला ’ मधून मधून वाचतांना पुष्कळ वेळां मीं त्यांना पाहिलें आहे. नाटकमंडळींत त्यांचीं पुष्कळ वर्षें गेलेलीं असल्यानें बहुतेक मराठी नाटकें त्यांना जवळ जवळ पाठच होतीं असें म्हणावयाला हरकत नाहीं. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर हे तर त्यांचे बोलून चालून गुरुच. तेव्हां त्यांचीं नाटकें आणि पद्यें तर त्यांच्या जिभेवर नाचत होतींच; पण किर्लोस्कर आणि देवल यांच्या नाटकांचींहि त्यांनीं भक्तिभावानें पारायणें केलेलीं होतीं. आधुनिक कवींपैकीं ‘केशवसुतां ’ चे तर ते सच्चे चेलेच होते. केशवसुतांच्या कवितांखेरीज ‘दत्त’ आणि ‘ बालकवि ’ ठोमरे यांच्या कविता त्यांना विलक्षण आवडत असत. इंग्रजी वाङ्मयाचाहि त्यांचा व्यासंग जबर होता. मार्क ट्वेन, जेरॉम के. जेरॉम यांचीं सर्व विनोदी पुस्तकें त्यांच्या संग्रहीं होतीं. आधुनिक नाटककारांपैकीं इब्सेन हा

त्यांच्या आवडीचा होता. त्याचीं बहुतेक सर्व नाटकें त्यांनीं काळजीपूर्वक वाचलेलीं होतीं. गडकऱ्यांच्या सर्व लिखाणांत अनेक वाङ्मयात्मक संदर्भ जे विखुरलेले आढळतात, त्याचें कारण त्यांचें सूक्ष्म आणि सतत वाचन हेंच होय. जुन्या अभिजात वाङ्मयांतील सर्व उत्तमोत्तम कल्पना आणि विचार यांच्यावर गडकऱ्यांनीं आपली प्रतिभा पोसलेली होती, म्हणून तिला विविध तऱ्हेचे विलास करतां आले !

● ● ●

प्रत्यक्ष लिहिण्याला असा गडकऱ्यांना फारच थोडा वेळ लागत असे. पण विचार पूर्ण व्हावयाला मात्र त्यांना वर्षानुवर्षें लागत. नाटक लिहिण्यापूर्वीं ते त्या नाटकाच्या कथाभागाचे निरनिराळे नकाशे आणि आराखडे काढून ठेवीत असत आणि पात्रांच्या स्वभाववैशिष्ट्याची अगदीं बारीकसारीक टिपणें ते करीत असत. कोणत्या पात्राच्या तोंडीं कोणती कोटी घालावयाची किंवा कोणती काव्यमय कल्पना उपयोगांत आणावयाची याची जंत्री ते आपल्या स्मरणवहींत करून ठेवीत असत. एवढी सारी तयारी झाल्यानंतर ते नाटक तोंडानें सांगत किंवा क्वचित् स्वतः हातांनींहि लिहीत. शेवटच्या अंकापासून ते बहुशः आरंभ करीत असत. नाटक तोंडानें बोलून लिहावयाला सांगतांना जणू कांहीं त्यांच्या अंगांत सरस्वतीचा संचार झाला आहे, असा भास होई. एकदां सांगितलेलें वाक्य पुन्हां त्यांना क्वचितच बदलावें लागे ! कविता देखील ते फारच द्रुत गतीनें लिहीत. कागदाच्या एका चतकोर तुकड्यावर पेन्सिलीनें भर भर कविता लिहून टाकीत आणि खालीं तारीख नि सही घालीत. पुष्कळ वेळां ते मोडींत सही करीत असत. ' चंद्रकांत राजाची कन्या ' ही चाल त्यांची अत्यंत आवडीची असे, आणि त्या चालीमध्यें ते वाटेल तितकीं कडवीं एकामागून एकएक झपाट्यानें रचीत जात. गडकऱ्यांना गाण्याचा गळा बिलकूल नसे. ' ड ' च्या बाराखडींत ते कवितेची चाल बहुशः गुणगुणत असत. तथापि संगीताची त्यांना उत्तम कल्पना होती.

● ● ●

गडकरी यांच्या स्वभावांत विलक्षण विक्षिप्तपणा भरला होता यांत कांहीं शंका नाहीं. पुष्कळ वेळां कांहीं कांहीं गोष्टी ते जाणूनबुजून करीत आहेत कीं काय, असा संशय येत असे. आपलें व्यक्तिमत्व ही एक समस्या किंवा कूट प्रश्न आहे असें

दुसऱ्यांना भासविण्याचा त्यांचा प्रयत्न असावा, असें कधीं कधीं वाटे! आपल्या भित्रेपणाचें ते वारंवार प्रदर्शन करीत असत. आपल्या घराचा डोलारा मधून मधून हलतो आहे असा त्यांना भ्रम होई! आणि 'बाहेर जाऊन जरा बघून या' असें ते कोणाला तरी सांगत असत. साथींच्या रोगांचें त्यांना अतिशय भय वाटे. खुनाच्या, आत्महत्येच्या किंवा अपघाती मृत्यूच्या बातम्या ऐकायची त्यांची मुळींच तयारी नसे. पण तसें म्हणावें तर कोणाच्या मर्तिकाची तयारी करण्याचा प्रश्न आला तर, गडकऱ्यांचा पाय सर्वांच्या पुढें असे. 'या गडकऱ्याला माणसें जाळायचा फार नाद आहे!' असें किर्लोस्कर मंडळीमधलि एक विक्षिप्त 'पेंटर' म्हणत असत, त्याचें कारण हेंच! पुण्यांतील ओंकारेश्वराच्या स्मशानाकडे फिरायला म्हणून गडकरी पुष्कळ वेळां जात असत. स्वभावानें गडकरी अत्यंत हट्टी, लहरी आणि शीघ्रकोपी असत. एकदां त्यांचें डोकें भडकलें म्हणजे त्यांना ताळ्यावर आणणें फार कठीण! कांहीं नाटकमंडळ्यांच्या मालकांचा गडकऱ्यांनीं पुष्कळच छळ केला! आज एकाला नाटक देतों म्हणतील आणि उद्यां दुसऱ्याला देऊन टाकतील! नाटकवाल्यांना ते अगदीं शेरास सव्वाशेर भेटले होते. त्याचप्रमाणें एखाद्याविरुद्ध गडकऱ्यांचें मन एकदां कलुषित झालें म्हणजे तें ताळ्यावर येणें कठीण. म्हणजे त्यांच्या मनांत कांहीं रहात असे असा प्रकार नाहीं. तथापि, एकदां गडकऱ्यांनीं ज्याला आपला म्हटलें त्याच्यासाठीं मात्र ते जिवाचें रान करावयाला तयार असत. चिंतामणराव कोल्हटकर यांच्याविरुद्ध एकानें त्यांना कांहीं सांगितलें, त्याबरोबर 'मी चिंतामणरावांबरोबर नरकांत जाईन; पण तुमच्याबरोबर स्वर्गांत येणार नाहीं!' असें खाडकन् गडकऱ्यांनीं त्यांना बजावून सांगितलें.

● ● ●

अभिमानाची बैठक गडकऱ्यांच्या मनांत एकदां बसली म्हणजे ती अगदीं वज्रकट असे. किर्लोस्कर नाटकमंडळी, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, फर्ग्युसन कॉलेज किंवा रँग्लर परांजपे यांच्याविषयींची गडकऱ्यांची भक्ति अगदीं अनन्यसाधारण होती. त्यामुळें या संस्थांवर कोणीं टीका केली कीं, गडकरी त्याच्यावर तुटून पडल्यावांचून रहात नसत! रँग्लर परांजपे हे मिशांचे आंकडे वळवितात म्हणून कोणी त्यांच्यावर टीका करतांच, 'रँग्लरांच्या मिशा टोचल्याची

तुमच्या घरांतून तक्रार आली आहे काय ? ' असा सरळ प्रश्न विचारून गडकऱ्यांनीं त्या माणसाचा 'निकाल' लावून टाकला ! आजारी पडले म्हणजे मात्र गडकऱ्यांच्या अंगांत साक्षात् सैतान संचारल्यासारखा वाटे ! त्या वेळीं ते कोणाचेंहि ऐकत नसत. या त्यांच्या हट्टीपणामुळेंच त्यांनीं आपलें मरण लौकर ओढवून आणलें. डॉक्टरांनीं त्यांना दांत अजिबात काढून टाकावयास सांगितलें होतें; पण गडकरी मुळींच कबूल होईनात. दांतांचा आणि बुद्धीचा निकट संबंध आहे असें त्यांनीं कोठें तरी वाचलें होतें. ते म्हणाले, ' मी बुद्धिजीवी माणूस आहें. दांत काढून माझ्या बुद्धीला अपाय झाला तर मी जागणार कसा ?'

● ● ●

तत्कालीन राजकीय बाबतींत गडकरी हे सर्वसामान्यपणें 'मवाळ' होते असें म्हणावयाला हरकत नाहीं. टिळकांपेक्षां त्यांना गोखल्यांबद्दल अधिक आदर वाटे. टिळकांच्या राजकीय चळवळीचा त्यांनीं अभ्यास केला होता असें मला मुळींच वाटत नाहीं. १९०८ च्या दडपशाहीच्या चळवळीनें त्यांच्या मनाला एक प्रकारची दडसच बसली होती असें म्हणाना ! टिळकांचा उल्लेख ते खाजगी बैठकींत 'बी. जी.' असा करीत असत. त्यांच्या सर्व लिखाणांत देशाच्या पारतंत्र्याबद्दलची चीड कोठेंहि व्यक्त झालेली नाहीं. 'राजसंन्यास' हें त्यांचें एकच नाटक असें आहे कीं, ज्यांत त्यांच्या राष्ट्रीय विचारांची तेजस्विता प्रकर्षानें प्रकट झालेली आहे. अच्युतराव कोल्हटकर तें वाचून त्यांना त्या वेळीं म्हणाले होते कीं, 'मी मुंबई प्रांताचा गव्हर्नर झालों तर प्रत्येक शाळेंत अभ्यास-पुस्तक म्हणून 'राजसंन्यास' नेमीन ! 'महाराष्ट्र गीत' हें ज्या वेळीं त्यांनीं लिहिलें, त्या वेळीं त्यांच्या राजकीय विचारांत कांहीं तरी चलबिचल होऊं लागल्याचीं चिन्हें दिसत होतीं. पण तें तेवढ्यावरच राहिलें.

● ● ●

गडकऱ्यांचा खरा पिंड हा समाजसुधारकाचा होता. लोकहितवादी, आगरकर, कोल्हटकर यांच्या विचारसरणीचा त्यांच्या मनावर परिणाम झालेला असल्यानें त्याचे प्रतिध्वनि त्यांच्या लेखनांत पदोपदीं उमटलेले आहेत. आतां त्यांना आधुनिक सुधारक म्हणावें तर ईश्वराच्या अस्तित्वावर गडकरी यांचा पूर्ण विश्वास होता. घरांतून बाहेर पडल्यानंतर रस्त्यावर भेटतील तेवढ्या सर्व देवांना आणि शेंदऱ्या दगडांना न चुकतां ते नमस्कार करीत असत. एवढेंच काय, पण पुरा-

णांतरींच्या सर्व अद्‌भुत चमत्कारांवर त्यांची श्रद्धा होती. ते एकादशी करीत असत, आणि एकादशी सोडतांना ते भाविकपणें कधीं कधीं 'अनामिकांचे अभंग' हि रचीत असत. तेव्हां एका बाजूनें पूर्ण श्रद्धाळू आणि दुसऱ्या बाजूनें थोडेसे विवेचक बुद्धिवादी असे दोन परस्परविरोधी प्रवाह त्यांच्या स्वभावांतून वहात होते. साहित्यदृष्ट्या पाहिलें तर ते सनातनी होते, आणि सामाजिकदृष्ट्या पाहिलें तर ते समाजवादी सुधारक होते. जुन्या साहित्यांतल्या ज्या उज्ज्वल परंपरा होत्या, ज्या तेजस्वी कल्पना होत्या, जे सामर्थ्यवान् संकेत होते, त्यांचा नव्या नवलाईनें पुरस्कार करण्यांत त्यांची कल्पना गुंतलेली असे. मानवी जीवनांतलीं जीं चिरंतन मूल्यें होतीं त्यांच्यावर आपल्या प्रतिभेची पूजा बांधण्यांत ते सदैव गुंग असत. कौटुंबिक जीवनांतलीं जीं भावनात्मक बंधनें आहेत, त्यांतील जिव्हाळा आणि भावना यांची अत्यंत भक्तिभावानें जपणूक करावयास ते जागरूक असत. त्यांच्या विचारांत आणि दृष्टिकोणांत अत्यंत आधुनिक कांहीं असेल तर तो त्यांचा विनोद. (अर्थात् विनोद हा नेहमींच आधुनिक असतो. तो सनातनी असूंच शकत नाहीं.) सामाजिक जीवनांतील विसंवाद, विसंगति आणि विकृति यांच्यावर त्यांची विनोदबुद्धि अत्यंत निर्दयतेनें तुटून पडत असे. त्या ठिकाणीं ते कोणाच्या सोवळेपणाची किंवा मतांची मुळींच पर्वा करीत नसत. म्हणून त्यांच्या काव्यावर बेहोष असलेले पुराणमतवादी त्यांच्या विनोदानें पुष्कळ वेळां बेफाम होत असत! तथापि त्यांचा विनोद वाटतो तेवढा निर्दय आणि निष्ठुर नव्हता! त्यांच्या पाठीमागें समाजसुधारणेची तीव्र तळमळ असे, हृदयभेदक भावना दडलेली असे. त्यामुळें हंसतां हंसतां मन अंतर्मुख होई आणि हास्यविषयाचें खरें स्वरूप लक्षांत येऊन, आंतड्यांना पीळ पडे! समाजसुधारणेचें एक प्रभावी शस्त्र म्हणूनच गडकऱ्यांनीं आपल्या वाङ्मयांत विनोदाचा प्रामुख्यानें उपयोग केला.

● ● ●

गडकरी हे पूर्णपणें बुद्धिजीवी होते. प्रतिभेच्या पंखांवर बसून ते विचाराच्या आकाशांत एकसारख्या भराऱ्या मारीत असत. शरीराच्या जगांत ते फार थोडा वेळ जगत किंबहुना शरीराचें त्यांना शब्दशः भानच नसे. शरीराची त्यांनीं अत्यंत हेळसांड केली आणि म्हणूनच त्यांचें शरीर दीर्घकाल जगूं शकलें नाहीं. गडकऱ्यांच्या सान्निध्यांत येणाऱ्या माणसांना प्रतिक्षणीं त्यांचीं

जीं नवनवीन रूपें प्रतीत होत असत, याचें कारण ते शरीरानें जगत नसून बुद्धीनें जगत होते. बुद्धीच्या जळत्या आगींत त्यांनीं आपल्या शरीराचा होम केला.

वाङ्मयाला त्यांनीं आपलें सर्वस्व वाहिलें म्हणूनच थोड्याशा आयुष्यांत अत्यंत प्रभावी असें कर्तृत्व त्यांच्या हातून घडून आलें. मराठी साहित्यांत ज्ञानेश्वर आणि तुकाराम यांच्यानंतर एवढें सामर्थ्यवान् साहित्य कोणत्याहि लेखकानें निर्माण केलेलें नाहीं. गेलीं पंचवीस वर्षें महाराष्ट्र त्यांच्या वाङ्मयाचा विचार करीत आहे; पण अजून त्याचें समाधान झालेलें नाहीं. त्यांच्या वाङ्मयकृति या सोन्याच्या खाणीसारख्या आहेत. जितकें अधिक खोल जावें तितकी अधिक संपदा त्यांतून बाहेर येऊं शकते. गडकऱ्यांच्या वाङ्मयीन महत्त्वाकांक्षा नेपोलीयनप्रमाणेंच गगनाला गवसणी घालण्याइतक्या उत्तुंग होत्या. त्यांना किती तरी लिहावयाचें होतें ! रोज निरनिराळ्या मित्रांपाशीं लेखनाचे ते इतके नवीन नवीन संकल्प सोडीत कीं, त्यामुळें ऐकणारी मंडळी अगदीं गांगरून जात ! आणि त्यांत एका मित्राला जें सांगत तें दुसऱ्याला सांगत नसत. त्यामुळें निरनिराळ्या मित्रांना त्यांच्याबद्दल वाटणाऱ्या आकर्षणांत इतकी विलक्षण विविधता निर्माण झालेली होती. ज्या काळांत वाङ्मयावर उपजीविका करणें अशक्य होतें, त्या काळांत केवळ वाङ्मयासाठीं आणि वाङ्मयावर जगण्याचा गडकऱ्यांनीं प्रयत्न केला. दारिद्र्याशीं आणि समाजनिंदेशीं त्यांना आमरण झगडावें लागलें. पण त्याची त्यांनीं पर्वा केली नाहीं. एवढा बुद्धिमान् आणि प्रतिभाशाली लेखक आपल्यामधून आपल्या डोळ्यांदेखत निर्माण होऊं शकतो, या गोष्टीवर विश्वास ठेवण्याला त्या वेळच्या निर्बुद्ध आणि मद्द समाजाची तयारी नव्हती ! म्हणून गडकऱ्यांच्या देदीप्यमान बुद्धीकडे पहाण्याचें सामर्थ्य नसलेले डोळे त्यांच्या दुबळ्या शरीराची विटंबना करण्यांत समाधान मानूं लागले. कीर्ति आणि निंदा यांचा गडकऱ्यांना एकाच वेळीं लाभ होत गेला. पण गडकऱ्यांचें कर्तृत्व ज्या वेळीं लोकांना कळून आलें, त्या वेळीं त्यांचें शरीर काळाच्या पडद्याआड अंतर्धान पावलेलें होतें. गडकऱ्यांच्या प्रतिभेचें तेजस्वी स्वरूप तेवढेंच आजच्या महाराष्ट्रापुढें राहिलेलें आहे. हें गडकऱ्यांचें वाङ्मयस्वरूप हेंच त्यांचें खरें स्वरूप आहे आणि या त्यांच्या वाङ्मयस्वरूपाची उपासना अनंत काळपर्यंत महाराष्ट्र करीत राहील यांत मुळींच संशय नाहीं !

## ‘ मुमुक्षु ’ साहित्यिकाचा वैकुंठवास

जुन्या पिढींतील एक श्रेष्ठ वाङ्मयमहर्षि, संतकाव्याचे नि चरित्राचे एक आमरण व्यासंगी आणि संशोधक, पंडित, भक्तिसंप्रदायांत रंगलेले एक प्रासादिक आणि रसाळ वक्ते ह. भ. प. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर हे गेल्या सोमवारीं वर्धा येथें वैकुंठवासी झाले. पांगारकर ही मागील पिढीच्या साहित्यक्षेत्रांत वावरणारीं एक अत्यंत प्रभावी आणि आकर्षक अशी विभूति होती. गेलीं तीन तपें महाराष्ट्रांत त्यांचें नांव ज्यांना माहीत नसेल असें बाळबोध वळणाचें एकहि कुटुंब नसेल. त्यांच्या ‘ भक्तिमार्गप्रदीपा ’ नें त्यांचें नांव प्रत्येक घरांत अगदीं मुलाबाळांपर्यंत नेऊन पोहोचवलें होतें. भक्तिमार्गप्रदीप ह्या त्यांच्या काव्यसंग्रहांत त्यांनीं निवडलेलीं संतवाङ्मयांतील रसाळ आणि भाविक गीतें महाराष्ट्रांतील आबालवृद्धांच्या तोंडीं गेलीं चाळीस वर्षें खेळत आहेत. ह्या पुस्तकाच्या अनेक आवृत्त्या आणि प्रती निघाल्या; तथापि त्याची लोकप्रियता अद्यापिहि कमी झालेली नाहीं. महाराष्ट्रीय कुटुंबांमध्यें सोज्वळ आणि भाविक वातावरण निर्माण करण्याचें श्रेय आम्ही पांगारकरांच्या ‘ भक्तिमार्गप्रदीपा ’ लाच देतों. लहानपणीं माझ्या मनावर ह्या पुस्तकानें जो परिणाम केला तो अद्यापिहि तसाच आहे. माझ्या ‘ पायाची दासी ’ ह्या बोलपटामध्यें ‘ भक्तिमार्गप्रदीप ’ जो मीं आणलेला आहे त्याचें कारण हेंच आहे. ‘ भक्तिमार्गप्रदीपा ’बरोबरच महाराष्ट्रांतील त्यांची लोकप्रियता वाढविण्यास कारणीभूत होणारें त्यांचें दुसरें कर्तृत्व म्हणजे त्यांनीं अनेक वर्षें चालविलेलें ‘ मुमुक्षु ’ हें पत्र ! ‘ मुमुक्षु ’ ह्या शब्दाचा अर्थ मला कळत नव्हता तेव्हांपासून मी त्या पत्राचा एकनिष्ठ वाचक होतों. संतवाङ्मयाचा आणि भक्तिसंप्रदायाचा ह्या पत्रामधून पांगारकरांनीं एवढा प्रचंड पुरस्कार केलेला आहे कीं, त्याला मर्यादा नाहीं. अनेक संतकवींच्या काव्यांचे उतारे, संतांचीं चरित्रें, त्यांच्या काव्यांतील आणि चरित्रांतील निरनिराळ्या प्रसंगांची रसाळ

चर्चा ह्यांचीं पेवेंच्या पेवें त्यांनीं आपल्या ‘ मुमुक्षु ’ मधून भाविकांना मोकळीं करून दिलेलीं आहेत. पांगारकर हे संतकाव्याचे नुसते व्यासंगी विद्यार्थीच नव्हे तर ते कै. राजवाडे ह्यांच्या वृत्तीचे अत्यंत कष्टाळू आणि निरलस असे एक संशोधक होते. संतकाव्याचें संशोधन करण्यासाठीं महाराष्ट्र , वऱ्हाड , मोंगलाई, इत्यादि विभागांत त्यांचा एकसारखा संचार चालू असे. त्यामुळें महाराष्ट्रांत अनेक ठिकाणच्या लोकांना त्यांच्या प्रासादिक निरूपणाचा, व्याख्यानांचा आणि प्रवचनांचा वेळोवेळीं लाभ मिळून त्यांची लोकप्रियता एकसारखी वाढत गेली. पांगारकरांच्या लोकप्रियतेला एक दुसरी बाजू होती. टिळक-आगरकरांच्या विद्यार्थ्यांपैकीं ते होते. ते शाळेंत असतांना आगरकरांचा आणि त्यांचा मतविरोध असूनहि आगरकरांचें त्यांच्यावर अत्यंत प्रेम होतें. पुढें टिळकांच्या जहाल राजकारणाच्या प्रभावी काळांत त्यांचें टिळकांच्याकडे येणें-जाणें असे. प्रत्यक्ष राजकारणांत त्यांनीं भाग घेतला नसला तरी, सामान्यत: टिळकांच्या प्रभावळींतले म्हणून समजले जात असल्यानें पुष्कळ दिवसपर्यंत गुप्त पोलिसांचा त्यांच्यामागें ससेमिरा लागलेला असे. ‘ रामदासीबुवा ’ नांवाचें त्यांनीं लिहिलेलें एक चोपडें त्याच काळांत सरकारजमा झाल्याचें ऐकिवांत आहे. एवढ्या साऱ्या कार्यव्याप्तीमधून ग्रंथलेखन आणि निर्मिति करण्याच्या कामीं त्यांनीं केव्हांहि आळस केलेला नाहीं. ह्यावरून त्यांची बुद्धिमत्ता काणि कार्यनिष्ठा केवढी प्रखर होती हें दिसून येतें. ‘ मोरोपंतांचें चरित्र आणि काव्य-विवेचन, ’ ‘ तुकाराम-चरित्र, ’ ‘मराठी वाङ्मयाच्या इतिहासाचे तीन खंड ’ असे एकापेक्षां एक तेजस्वी आणि प्रदीर्घ मौलिक ग्रंथ लिहून मराठी सारस्वताची त्यांनीं थोर सेवा केलेली आहे. मोरोपंतांच्या काव्याबद्दलचें त्यांचें वेड सुप्रसिद्ध आहे. ‘ मयूरभक्त पांगारकर ’ असें ते स्वत:ला संबोधीत असत. ‘ तुकारामा ’ वरील त्यांचा ग्रंथ अधिक चिकित्सक आणि मार्मिक आहे असें तज्ज्ञ मानतात. मराठी वाङ्मयाच्या इतिहासाचे त्यांचे सर्व खंड प्रकाशित होऊं शकले नाहींत ही दु:खाची गोष्ट आहे. ज्ञानेश्वर, एकनाथ आणि रामदास असे त्यांचे तीनच खंड प्रसिद्ध आहेत. हे ग्रंथ संतकवींच्या अभ्यासकांना मार्गदर्शक होणारे असे आहेत. त्या त्या कवींच्या काळांतील निरनिराळ्या कवींची नि काव्यांची जंत्री ह्या खंडांत बिनचूक देण्यांत आलेली आहे. ह्या ग्रंथांशिवाय लहानमोठीं अशीं त्यांनीं लिहिलेलीं किंवा संपादिलेलीं कितीतरी पुस्तकें प्रसिद्ध आहेत.

पांगारकरांएवढा विस्तीर्ण लेखनसंसार निर्माण करणारे फारच थोडे लेखक महाराष्ट्रांत होऊन गेले असतील. अलीकडे त्यांनीं आत्मचरित्रात्मक असा ' चरित्रचंद्र ' नामक ग्रंथ लिहिलेला होता. तोहि बराचसा मौजेचा आणि वाचनीय झालेला आहे. पांगारकरांचें लिखाण आधुनिक टीकाकारांच्या दृष्टीनें पाहिलें तर फारसें चिकित्सक आणि विश्लेषणात्मक नसे. चिकित्सापद्धतीपेक्षां श्रद्धाळू रहस्योद्ग्राही पद्धति त्यांना अधिक अभिप्रेत असे. बुद्धिवादी दृष्टिकोण असणें त्यांना शक्य नव्हतें. तथापि त्यांनीं जें जें म्हणून लिहिलें तें अत्यंत गोड भाषेंत लिहिलेलें असल्यामुळें वाचनीय झालेलें आहे. त्यांची लेखनशैली स्वतंत्र वळणाची, ठळक, बालबोध आणि प्रसादपूर्ण अशी आहे. संतवाङ्मया-च्या सतत अभ्यासानें त्यांच्या भाषेला एक प्रकारचें ओज प्राप्त झालेलें होतें. जुन्या पिढीमध्यें इतकी लालित्यपूर्ण नि पाणीदार लेखनशैली असलेला लेखक आमच्या डोळ्यांपुढें दुसरा नाहीं. त्यांच्या लेखणीप्रमाणेंच त्यांची वाणी अत्यंत रसाळ, ओजस्वी आणि प्रासादिक असे, किंबहुना पांगारकरांची महाराष्ट्रांतील लोकप्रियता वाढविण्यास त्यांचें प्रभावी वक्तृत्वच कारणीभूत होतें. " अमृता-तेंही पैजा जिंके ! " अशी त्यांची गोड आणि मधुर वाणी होती. व्याख्यान देत असतां ' ब्रम्हानंदीं लागली टाळी । कोण देहातें सांभाळी ' अशी स्थिति होण्याइतके ते विषयामध्यें रंगून जात असत. बाह्य जगाची त्यांना सुतराम् शुद्ध राहत नसे. कांहीं तरी दैवी शक्तीचा संचार त्यांच्या आंगांत झालेला आहे किंवा काय, असा भास होत असे. डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहत आहेत, मुखांतून एकामागून एक अभंग, ओव्या, कटाव ह्यांचा रसाळ धबधबा वाहतो आहे, खांदे एकसारखे उडत आहेत, धोतर अगदीं फिटण्याच्या बेतांत आलें आहे, तरी बुवांना त्याचा पत्ता नाहीं, असा तो पांगारकरी वक्तृत्वाचा भोळा-भाबडा पण प्रासादिक थाट ऐकणाराच्या विस्मरणांतून कदापिहि न जाणारा असा आहे. तासन् तास हजारों श्रोते त्यांच्या व्याख्यानामध्यें तल्लीन होऊन जात, हें दृश्य मीं स्वतः डोळ्यांनीं पाहिलेलें आहे. पाठांतर ही त्यांच्या वक्तृत्वा-मधील यशाची किल्ली आहे. एवढें प्रचंड आणि जिवंत पाठांतर असलेला एकहि वक्ता आम्ही आमच्या आयुष्यांत पाहिलेला नाहीं. ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत आणि भारूड, दासबोध, अनंतफंदी, रामजोशी नुसते त्यांच्या जिभेच्या टोंकावर थयथय नाचत असत. भोजनांच्या पंक्तीमधून देहभान विसरून गाणीं

म्हणत फिरण्याचा बुवांना फार नाद असे. पुण्याच्या शारदोपासक संमेलनाचे अध्यक्ष असतांना त्यांनीं भोजनप्रसंगीं ‘ दार उघड बया दार उघड ’ किंवा ‘ बोवड्या गवळ्या ’ चें ‘ कुल्ना, थमाल ले थमाल आपुल्या गाई ’ हीं गाणीं म्हणून तेथें जमलेल्या सर्व साहित्यिकांना डोलावयाला लावलें होतें. तें दृश्य अजूनहि आमच्या डोळ्यांसमोर आहे. पांगारकर हे साहित्यिक असूनहि लक्ष्मीची त्यांच्यावर भरपूर कृपा होती. पैशाची वाण त्यांना आयुष्याच्या उत्तरार्धांत तरी निदान कधींच भासलेली नाहीं. इंदूरचे माजी महाराज सर तुकोजीराव होळकर त्यांच्यावर बेहद्द खूष होते. ‘ज्ञानेश्वरी’ सांगण्यासाठीं कांहीं वर्षें त्यांनीं बुवांना इंदूर येथें आपल्या राजवाड्यांत मोठ्या पगारावर ठेवून घेतलें आणि पंचवीस हजार रुपयांची विदागी त्यांना जातांना बहाल केली. भक्तिमार्ग-प्रदीपावरहि त्यांनीं पुष्कळ पैसा मिळविला. त्यामुळें पांगारकरांनीं आपला संसार आजपर्यंत मोठ्या सुखासमाधानानें केला. अलीकडे कित्येक वर्षांपासून ते नाशिक येथें स्थायिक झाले होते. त्यामुळें त्यांचा कै. लक्ष्मीबाई टिळक, दत्तोपंत टिळक, सोपानदेव चौधरी आणि इतर आधुनिक कवींशीं संबंध आला होता आणि आधुनिक काव्याबद्दल व साहित्याबद्दल त्यांना थोडीशी दृष्टि आलेली होती. तथापि, एकंदरींत ते आधुनिक काव्याच्या विरुद्धच होते. संत-काव्य हेंच खरें, पुरोगामी काव्य आहे आणि संतांच्या मुखांतून निघालेलें अक्षर-न् अक्षर हें खरें, जिवंत आणि पुरोगामी साहित्य होय असें त्यांनीं शारदोपासक संमेलनाच्या अध्यक्षपदावरून सांगितलें होतें. आधुनिक साहित्य ‘ धष्टपुष्ट ’ नाहीं आणि भोजनप्रसंगीं श्लोक म्हणून म्हणण्याजोगें एकहि आधुनिक काव्य नाहीं अशी त्यांची आधुनिक वाङ्मयाविरुद्ध तक्रार होती. गोविंदाग्रजांचें ‘ गुलाबी कोडें ’ वाचून माझ्या बायकोनें जर त्या कवितेमधील पत्नीप्रमाणें फाजील प्रश्न केला असता, तर मीं तिच्या थोबाडींत मारून तिचें श्रीमुख गुलाबी केलें असतें असें ते म्हणाले होते. त्यांनीं स्वतः भक्तिपर अशी थोडीशी कविता केलेली आहे. जुन्या संतकवींमध्यें कधीं कधीं आढळून येणारा आढमुठा आणि गांवढळ विनोद आपल्या काव्यांत करतांना त्यांना संकोच वाटत नसे. पाऊस कसा पडतो असें एका मुलानें आपल्या वडिलांना विचारलें, तेव्हां परमेश्वर स्वर्गांत ‘ लघुशंका ’ करीत आहे, ती पावसाच्या रूपानें जमिनीवर पडते असें वडिलांनीं उत्तर दिलें, अशी ‘ विनोदी ’ कविता

पांगारकरांनीं लिहिलेली आहे. आधुनिक तऱ्हेच्या, पोषाखाच्या आणि शिक्षणाच्या विरुद्ध ते होते. भोर येथें ‘ शंकराजी नारायणा ’ च्या पुण्यतिथीच्या वेळीं विकच्छ लुगडें नेसून आलेल्या एका विदुषीवर भर सभेंत त्यांनीं ताशेरा झाडला. “ आम्ही लिहिणें शिकलों सद्गुरुपाशीं ’ ही ओळ घेऊन पूर्वीच्या विदुषी संतस्त्रिया बिनकासोट्याचीं लुगडीं नेसत नव्हत्या अशा अर्थाचें प्रवचन करून त्यांनीं त्या वेळीं सभेंत खूपच गंमत केली. बडोद्याचे वाकसकर ह्यांच्या घरीं दूधभात खाऊन नंतर बुवांनीं प्रायश्चित्त घेतलें आणि त्यामुळें खूपच वाद निर्माण झाला, हें प्रकरण प्रसिद्धच आहे. बुवांचें हें गमतीदार स्वभाववैशिष्ट्य आणि पुराणमतवादित्व आतां केवळ त्यांची आठवण म्हणूनच आम्ही उल्लेखीत आहोंत. मराठी साहित्यांत त्यांचें नांव आणि कर्तृत्व अमर आहे. संतकाव्याचा त्यांच्याएवढा ऊर्जस्वल उद्गाता आणि भक्तिसंप्रदायाचा प्रभावी प्रवक्ता आजपर्यंत दुसरा कोणी होऊन गेला नाहीं. लेखणी प्रासादिक, वाणी रसाळ, वागणें प्रेमळ, राहणी साधी आणि भोळीभावडी असें बुवासाहेबांचें थोडक्यांत वर्णन करतां येईल. बुवांच्या मृत्यूमुळें मराठी सारस्वताची जी मोठी हानि झाली आहे तिचें यथार्थ स्वरूप सध्यांच्या काळांतील जनतेला आकलन होणें कठीण आहे. मराठी साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदाचा मान त्यांना देण्यांत आलेला नाहीं ही फार दुःखाची गोष्ट आहे. विशेषतः नाशिक येथें बुवांच्या गांवीं आगामी साहित्यसंमेलन भरण्याचें ठरलें असतां बुवा हयात नसावेत हा योग हृदय व्याकुळ करणारा असा आहे. बडोदें सरकारनीं त्यांचा सन्मान करावयाचें ठरविलें होतें; पण सयाजीरावमहाराजांच्या मृत्यूमुळें तो प्रसंग तहकूब झाला. बुवांचें व्यक्तिमत्त्व त्यांच्या लेखनकर्तृत्वाइतकेंच आकर्षक होतें. त्यांची ती उंच आणि स्थूल शरीरयष्टि, डोक्याला कसावसा गुंडाळलेला बावळट रुमाल, बंदाचा सैल आणि लांब अंगरखा, करवतकांठी उपरणें, अर्ध्या गुडघ्यापर्यंत उचललेलें धोतर आणि पायांत जाड पुणेरी जोडा ही त्यांची मूर्ति अद्यापि डोळ्यांसमोर उभी राहते ! पांगारकरांचा निरलस व्यासंग, कार्यनिष्ठा, त्यांचा प्रेमळपणा, त्यांची श्रद्धा हे गुण आधुनिक साहित्यिकांत तितक्या प्रभावानें आढळून येत नाहींत. म्हणूनच पांगारकरांची आठवण महाराष्ट्राला पुष्कळ काळपर्यंत झाल्यांवाचून राहणार नाहीं !

## महाराष्ट्राला स्वातंत्र्याचा संदेश देणारा

## लढवय्या पत्रकार !

अच्युतराव कोल्हटकरांना जाऊन आज तेरा वर्षें झालीं ! तेरा वर्षें म्हणजे पुरीं दहा वर्षें आणि वर आणखीन तीन वर्षें. तब्बल एक तप आणि एक वर्ष.. अरेरे! इतकीं वर्षें झालीं ना अच्युतरावांना जाऊन ! बरोबरच आहे, काळाला त्याचें काय होय ? काळीज नसलेल्या दरोडेखोराप्रमाणें अच्युतरावांच्या प्राणांवर डल्ला मारून तो एकसारखा लांब लांब टांगा टाकीत पुढेंच चाललेला आहे. तो कसचा थांबणार आणि मागें वळून पाहणार ? अच्युतरावांना जाऊन तेरा वर्षें झालीं काय किंवा तेराशें वर्षें झालीं काय, निर्दय काळाला त्यांची आठवण कशी होणार आणि दुःख तरी कसें वाटणार ? अच्युतरावांची आठवण आम्हांला. अच्युतरावांचें दुःख आम्हांला. अच्युतरावांच्या लेखणींतून कडाडणारी वीज बघून ज्यांचे डोळे दिपले, अच्युतरावांच्या वाणींतील मेघगर्जना ऐकून ज्यांचे कान तृप्त झाले, अच्युतरावांच्या निधड्या छातींत धगधगणाऱ्या देशसेवेच्या कुंडांतल्या आगीनें ज्यांच्या जीवनांत उष्णता उत्पन्न झाली, त्या महाराष्ट्रांतल्या आम्हां कांहीं लोकांनाच काय ती अच्युतरावांची आठवण आणि अच्युतरावांचें दुःख. काळाला त्याचें काय होय ? म्हणूनच अच्युतरावांना जाऊन तेरा वर्षें लोटलीं ही जाणीव होतांच आमच्या डोळ्यांत एकदम अश्रू उभे राहतात आणि मस्तक क्षणभर सुन्न होतें. तेरा वर्षें झालीं तरी मूर्तिमंत चैतन्याप्रमाणें एकसारखी नाचणारी ती अच्युतरावांची हंसतमुख आकृति डोळ्यांपुढून पुसली जात नाहीं. तेरा वर्षें झालीं तरी अच्युतरावांच्या लेखणीचा कैफ जो एकदां डोक्यामध्यें चढून बसलेला आहे तो उतरत नाहीं, किंवा त्यांच्या प्रतिभाशाली रसवंतीच्या, कानांमधून निनादणाऱ्या गोड गोड ललकाऱ्या अजून विरत नाहींत.

### त्यांच्यासारखे तेच

अच्युतरावांना ज्यांनीं पाहिलें ते धन्य होत. अच्युतरावांना ज्यांनीं ऐकलें ते धन्य होत. अच्युतरावांचा ‘ संदेश ’ ज्यांनीं रोजच्या रोज वाचला त्यांच्या

ग्रं. क्र. ८०९६८

धन्यतेला तर पारावारच नाहीं. आम्ही अच्युतरावांना पाहिलें, ऐकलें आणि त्यांनीं लिहिलेलें अक्षरन् अक्षर वाचलें–नव्हे त्या त्या वेळीं तें घटाघटा पिऊन टाकलें. आम्ही त्रिवार धन्य आहोंत! अच्युतरावांची मूर्ति ज्यांना पहावयाला मिळाली नाहीं, अच्युतरावांची तेजस्वी वाणी ज्यांना ऐकावयाला मिळाली नाहीं, ते खरोखरीच अभागी होत. ते खरोखरीच दुर्दैवी होत. अच्युतरावांसारखी विभूति शतकामध्यें एकादीच जन्माला येते. अच्युतरावांसारखा खंद्या लेखणीचा लेखक आणि फर्ड्या वाणीचा वक्ता लाखांमधून एकादाच निर्माण होऊं शकतो. मागील शंभर वर्षांत या महाराष्ट्रांत डोंगराएवढ्या बुद्धीचीं आणि पहाडाएवढ्या पराक्रमाचीं अनेक माणसें होऊन गेलीं. आजच्या उद्यांच्या या महाराष्ट्रांत फिरून अशीं माणसें पहायला देखील मिळायचीं नाहींत अशी भीति वाटते; मग अच्युतरावांसारखा अलौकिक माणूस पुन्हां चारदोन शतकांत अवतीर्ण होण्याची तर गोष्टच बोलायला नको. कारण अच्युतरावांचें सारेंच विलक्षण आणि अद्भुत होतें. अच्युतरावांची कोणाशीं तुलना करावयाची झाली तर ती त्यांच्या स्वतःशींच करावी लागेल. महाराष्ट्रांत पुन्हां अनेक अद्वितीय विभूति निर्माण होऊं शकतील. पण, फिरून अच्युतरावांसारखा माणूस जन्माला येणें कठीण–खरोखरच कठीण.

कारण अच्युतराव म्हणजे सामान्य माणसांच्या जगामध्यें वावरणारी एक असामान्य व्यक्ति होती. आणि अच्युतराव म्हणजे सामान्य माणसांच्या जगाला धाब्यावर बसविणारी एक बेछूट शक्ति होती. अच्युतराव म्हणजे आकाशांतून पृथ्वीवर सांडलेली एक विक्षिप्त वल्ली होती. अच्युतराव म्हणजे ग्रहगोलांच्या घोळक्यांतून पृथ्वीवर उनाडत आलेला एक तेजस्वी धूमकेतु होता. तुमच्या आमच्या आयुष्याला लागू पडणारे नियम आणि कायदे अच्युतरावांच्या बाबतींत सर्व झूट होते! समाजाच्या कोणत्याहि बंधाऱ्यांनीं किंवा धरणांनीं न अडविला जाणारा असा अच्युतराव म्हणजे एक महापूर होता. अच्युतराव म्हणजे एक लोंढा, अच्युतराव म्हणजे एक धबधबा, अच्युतराव म्हणजे एक तुफान वादळ, अच्युतराव म्हणजे एक बेफाम वणवा, अच्युतराव म्हणजे सदैव जागा असलेला एक ज्वलन्त ज्वालामुखी. अच्युतराव चालूं लागले कीं, सारा समाज हादरून जायचा. अच्युतराव लिहूं लागले कीं, हजारों लोक मोहून जायचे. अच्युतराव बोलूं लागले कीं, शेंकडों लोक वाहून जायचे.

## लेखनी पराक्रमाचा कुतुबमिनार

अच्युतरावांची लेखणी म्हणजे एक यक्षिणीची कांडी होती. अच्युतरावांची लेखणी म्हणजे एक जादू होती. अच्युतरावांची लेखणी म्हणजे एक किमया होती. अच्युतरावांच्या लेखणीनें जे जे पराक्रम केले, जे जे चमत्कार दाखविले आणि जे जे रंग खेळले, ते ते कोणत्याहि वीराच्या तरवारीनें किंवा तिरंदाजाच्या शरसंधानानें अथवा चित्रकाराच्या कुंचलीनें केले नाहींत किंवा खेळले नाहींत. लेखणी म्हणजे अच्युतरावांच्या हातची एक लीला होती. लेखणी म्हणजे अच्युतरावांच्या करांगुलीची एक क्रीडा होती. अच्युतरावांची लेखणी एकदां चालूं लागली, अच्युतरावांची लेखणी एकदां बोलूं लागली म्हणजे हिमालयाच्या कड्यावरून वेगानें फेसाळणाऱ्या गंगेच्या ओघाप्रमाणें साक्षात् देवी सरस्वती त्यांच्या मागून धांवूं लागायची, त्यांच्या लेखणीमधून वाहूं लागायची किंवा त्यांच्या लेखनाला जर गोलंदाजीची उपमा दिली तर त्यांची लेखणी म्हणजे एक महांकाळी तोफच होती असें म्हणावें लागेल. अच्युतरावांनीं ही आपल्या लेखणीची तोफ एकदां डागली कीं, एकामागून एक हजारों शब्दांचे, वाक्यांचे आणि टप्प्यांचे रसरशीत गोळे एकसारखे धडाडत जावयाचे. लिहिण्याची बैठक घालून वीरासारखे अच्युतराव एकदां बसले आणि त्यांच्या लेखणीची घोडदौड एकदां सुरू झाली कीं, एक वेळ एकादा डोंगर तळापासून हलवतां आला असता, किंवा एकादी पंजाब मेल थांबवितां आली असती; पण त्यांच्या मांडीचें आसन कधींहि कोणाला ढळवतां आलें नसतें कीं त्यांच्या लेखणीचा झपाटा कधींहि कोणाला अडवितां आला नसता. लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर आपल्या 'संदेश' पत्राचा जो प्रचंड 'लोकमान्यमय विशेष अंक' त्यांनीं एका बैठकींत आणि एका टाकांत लिहून काढला तो एकाद्या कुतुबमिनाराप्रमाणें त्यांच्या लेखनिक परक्रमाची साक्ष देऊं शकेल.

## उदात्त रसाचा उत्तुंग हिमालय

अच्युतरावांची बुद्धि म्हणजे प्रतिभेचा अहोरात्र खळखळणारा एक जिवंत झराच होता. या झऱ्याला पाण्याचा तुटवडा असा कधींच माहीत नव्हता. उन्हाळा असो, पावसाळा असो किंवा हिंवाळा असो; या झऱ्यांतून विचारांचीं कारंजीं आणि भावनांचे फवारे एकसारखे उचंबळत रहावयाचे. साहित्यांतला असा

कोणताहि एक रस नव्हता, लेखनामधला असा कोणताहि एक प्रकार नव्हता कीं, जो अच्युतरावांना शरण नव्हता. हिंदुधर्मावर किंवा साधुसंतांवर अच्युतराव लिहूं लागले कीं, डोक्यावर साक्षात् भागीरथीचा प्रवाह सांडतो आहे असें वाटावयाचें. महाराष्ट्राच्या मावळलेल्या स्वराज्याचे, छत्रपति शिवाजी महाराजांचे किंवा मराठ्यांच्या पराक्रमाचे पोवाडे अच्युतराव गाऊं लागले कीं, ऐकणारांच्या शरीरांतील नसानसांमधलें रक्त उसळ्या मारूं लागायचें. लोकमान्य टिळकांचें संकीर्तन अच्युतराव करूं लागले म्हणजे उदात्त रसाचा उत्तुंग हिमालयच वाचकांच्या डोळ्यांसमोर उभा रहावयाचा. स्वातंत्र्याच्या भूपाळ्या अच्युतरावांची रसवंती आळवूं लागली म्हणजे जगांतील पारतंत्र्याचा काळोख नाहींसा होऊन उद्यांच्या क्षितिजावर स्वातंत्र्याची पहांटच फटफटते आहे किंवा काय असा ऐकणारांना भास होत असे. 'मराठी काव्याची प्रभात वर्णन करितांना किंवा मराठी लावणीकार यांचा गौरव गातांना अच्युतरावांची लेखणी जितकी रंगून जाई, तितकीच 'शेवटली वेल सुकली' म्हणून शेवटच्या बाजीरावांच्या कन्येच्या निधनावर अश्रुसिंचन करतांना पाशवी बलात्काराला बळी पडलेल्या अनाथ जिजाला 'जिजा, तूं कां रडतेस?' म्हणून परोपरीनें समजावतांना त्यांच्या लेखणींतून कारुण्यरसाचे पाट वाहूं लागत. हास्यरस तर मारुतीप्रमाणें हात जोडून त्यांच्यापुढें सदैव उभा असे. किंबहुना श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांपेक्षांहि अधिक सामर्थ्यवान् विनोदाची सिद्धि अच्युतराव कोल्हटकरांना प्राप्त झालेली होती. विनोद हा अच्युतरावांच्या लेखनाचा स्थायीभाव होता असें म्हटलें तरी चालेल. अच्युतरावांच्या प्रत्येक शब्दाशब्दावर आणि वाक्यावाक्यावर विनोदाचें गुलाबपाणी शिंपडलेलें असे. अच्युतरावांच्या विनोदाचा झपाटा एकदां सुरू झाला कीं पळतां पळतां शत्रु आणि हंसतां हंसतां मित्र बेजार होऊन जात. त्यांच्या विनोदामधील लक्षणा आणि उपरोध तर काळजाला चिमटा घेणारे होते. 'माधवाश्रमांत शिवाजी' किंवा 'बोंबाबोंब' हे त्यांच्या उपरोधी विनोदाचे दोन तेजस्वी नमुने होत. लिहावयाचें असें अच्युतरावांनीं कांहींहि बाकी ठेवलें नाहीं. अच्युतरावांनीं वर्तमानपत्राचे तर हजारों स्तंभच्या स्तंभ लिहिले आणि इतकेंहि करून अच्युतरावांनीं नाटकें लिहिलीं, कादंबऱ्या लिहिल्या, लघुकथा लिहिल्या, पोवाडे आणि काव्यें लिहिलीं, आणि वेदांचीं भाषांतरेंहि करून टाकलीं. एवढें विश्व अच्युतरावांनीं लिहिलें; पण तें केवळ लिहावयाचें म्हणून लिहिलें नाहीं तर

लोकांनीं तें वाचावें म्हणून लिहिलें. लिखाणाचे भारे लिहून काढणारे लेखक महाराष्ट्रांत काय कमी होऊन गेले? पण त्यांचा काय उपयोग? लोकांनीं लांबून देखील त्यांच्याकडे पाहिलें नाहीं. पण अच्युतरावांचें मात्र तसें झालें नाहीं. अच्युतरावांनीं लिहिलेलें अक्षरन् अक्षर महाराष्ट्रानें वाचलें. नुसतें असें तसें वाचलें नाहीं पण अगदीं मिटक्या मारीत वाचलें. कारण अच्युतरावांचा एक एक शब्द किंवा एक एक वाक्य म्हणजे घणाचा घाव होता. अच्युतराव लिहूं लागले म्हणजे तें न वाचणें अशक्य होतें. अगदीं निरक्षर माणसालाहि साक्षर होऊन तें वाचण्याची इच्छा उत्पन्न होत असे; मग इतरांची तर गोष्टच कशाला?

## थोरापेक्षां थोर—थोराहून पोर

अच्युतराव जसें लिहीत तसें बोलत. किंवा असेंहि पाहिजे तर आपण म्हणूं कीं, ते जसें बोलत तसेंच लिहीत. त्यांच्या लिखाणावर लोक जसे तुटून पडत तसेच त्यांच्या व्याख्यानासाठीं हपापलेल्या श्रोत्यांचे थवेच्या थवे जमत. अच्युतरावांचें व्याख्यान म्हणजे वीररसाची किंवा विनोदाची भरपूर मेजवानी असे. एकाद्या धवधब्याप्रमाणें वक्तृत्वाचा प्रवाह तासन् तास त्यांच्या वाणीमधून धबाधब वहात असे, आणि त्या प्रवाहांत भान विसरून श्रोते कोठल्या कोठें वहात जात, त्याचा व्याख्यान संपेपर्यंत कोणालाहि पत्ता लागत नसे. खडा आवाज आणि आकर्षक आकृति या दोन गोष्टींची अच्युतरावांना अतिशयच अनुकूलता होती. अच्युतरावांची सभा म्हणजे आनंद, हर्ष, किंकाळ्या, टाळ्या यांचा प्रचंड उरूसच असे. सभास्थानीं अच्युतराव नुसते प्रगट झाले कीं सभा नाचायला लागायची—सभा खदखदायला लागायची आणि मग खिशांत हात घालून व्यासपीठावर एकाद्या वाघाप्रमाणें ते संचार करूं लागले आणि श्रोत्यांकडे बघून वीरश्रीच्या गर्जना करूं लागले कीं, श्रोत्यांच्या अंगावर कांटा उभा रहात असे. श्रोत्यांच्या भावना काळजापर्यंत कशा आणि केव्हां पिरगाळीत न्यावयाच्या आणि कोणत्या वेळीं श्रोत्यांना गुदगुल्या करून त्यांचे 'मुडदे' पाडावयाचे ही कला अच्युतरावांना स्वभावतःच अवगत होती. रंगभूमीवरील गणपतराव जोशींचें काम आणि व्यासपीठावरील अच्युतराव कोल्हटकरांचें व्याख्यान ज्यानें ऐकलें नसेल, ज्यानें पाहिलें नसेल, तो खरोखरच अभागी, तो खरोखरच कपाळकरंटा.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ७३५५८ दि: ७/१/६१
क्रमांक १८६३ नोंद दि:

## बंड, पुंड, आणि गुंड

अच्युतराव जेवढे मोठे होते, जेवढे थोर होते, जेवढे श्रेष्ठ होते, तेवढेच ते विक्षिप्त आणि माथेफिरूहि होते. एकदां त्यांचा डोक्यांत वारें शिरलें, कीं ब्रह्मदेवाच्या बापालाहि ते ऐकणारे नव्हते; तर मग स्वतःच्या बापाचें ते कोठून ऐकणार ? राजकीय मतभेदावरून भडकून जाऊन ज्यांनीं स्वतःच्या नांवामधलें जन्मदात्या पित्याचें नांव पुसून टाकलें आणि त्या जागीं चुलत्याचें नांव घातलें. त्यांच्या विक्षिप्तपणाचें वर्णन आणखीन् तें काय करायचें ? बापानें मुलाला दत्तक घेणें ही गोष्ट नेहमींच्याच रिवाजांतली आहे. पण बापाला दत्तक घेणारा हा मुलगा हिंदुसमाजांत तरी पहिलाच असावा असें वाटतें. जन्मदात्या बापाविरुद्ध अच्युतरावांनीं जें बंड पुकारलें तेंच त्यांनीं आपलें राजकीय पिते लो. टिळक यांच्याहि विरुद्ध शेवटीं पुकारलें. ज्या देवाला फुलांची लाखोली वाहतां वाहतां अच्युतरावांचा जन्म गेला, त्याच देवाला शेवटीं शिव्यांची लाखोली वाहण्यासाठीं अच्युतरावांना पुढें यावें लागलें. तथापि, लोकमान्य वाळंतीण झाले ! असे उद्गार काढण्यापर्यंत उन्मत्त आणि अमर्याद झालेली अच्युतरावांची लेखणी लोकमान्यांच्या मृत्यूनंतर मात्र 'संदेश' चीं पानेंच्या पानें धाय मोकलून रडूं लागलीं ! थोरापेक्षांही थोर असलेले अच्युतराव कधीं पोरापेक्षांहि पोर होत, म्हणूनच लोक त्यांना विक्षिप्त म्हणत. अच्युतराव 'बंड' होते तसे ते पुंड होते आणि गुंडहि होते. ज्या फंडगुंडांचें कांडांत बाह्या मागें सारून अच्युतरावांनीं मोठ्या हिरिरीनें काढलें, त्या फंडगुंडांना लाजविण्याइतकी गुंडगिरी खुद्द अच्युतरावांच्याहि अंगामध्यें होती. या त्यांच्या गुंडगिरीमुळेंच त्यांनीं हातीं घेतलेल्या प्रत्येक उद्योगाची आर्थिक दृष्ट्या वाताहत झाली आणि शेवटीं दिवाणी तुरुंगांत जाऊन बसण्याची त्यांना पाळी आली. पण, त्याचीहि त्यांनीं कधीं पर्वा केली नाहीं ! राजकीय तुरुंगांत जातांना ते ज्या ऐटीनें गेले, त्याच मिजाशीनें ते दिवाणी तुरुंगांतहि जाऊन बसले ! अशा तऱ्हेनें अच्युतरावांच्या अंगांतले दोष त्यांच्या गुणांएवढेच ढोबळ असले, तरी एक गोष्ट मात्र मान्य करावयास पाहिजे; आणि ती ही कीं, अच्युतराव हे भ्याड नव्हते. अच्युतराव निधड्या छातीचे मर्द होते. सिंहाच्या गुहेंत जाऊन त्याची दाढी दोन्ही हातांनीं गदगद हलवण्याएवढी मस्ती आणि

हिंमत त्यांच्या अंगांत होती. टिळकांवर केलेल्या शिवीगाळीमुळें चिडलेले शेंकडों लोक अच्युतरावांना मारण्यासाठीं जेव्हां त्यांच्या अंगावर धांवून गेले तेव्हां मागें वळून "या, मारा; एकट्या असहाय्य माणसावर शेंकडों लोक हल्ला करताहेत हा पराक्रम जगाच्या इतिहासांत एकदां रुजूं होऊं या!" असा जेव्हां अच्युतरावांनीं भुभुःकार केला तेव्हां त्या जमावांतील मी: मी म्हणणारे मर्द शेंपट्या घालून मागच्या मार्गें पसार झाले.

अच्युतरावांनीं अनेक वर्तमानपत्रें काढलीं आणि अनेक बुडविलीं हें खरें. अच्युतरावांनीं बहुजनसमाजाला प्रथम वृत्तपत्रें वाचायला शिकविलें आणि टिळकांच्या राजकीय शिकवणुकीचा तेल्यातांबोळ्यांपर्यंत प्रसार केला हेंहि खरें. पण अच्युतरावांच्या आयुष्याचें तें कांहीं मर्म नव्हे. अच्युतराव हे स्वातंत्र्याचे खरे भाट होते. स्वातंत्र्याचें अच्युतरावांना वेड लागून राहिलेलें होतें. पारतंत्र्याचा आणि गुलामगिरीचा निःपात होऊन देशांतील चाळीस कोटी जनता स्वतंत्र व्हावी म्हणून अच्युतरावांचा आत्मा रात्रंदिवस तळमळत होता. अच्युतरावांचें प्रत्येक लिखाण स्वातंत्र्याच्या जयजयकारानें दुमदुमतें आहे. 'स्वातंत्र्याचा प्रथम उच्चार मीं केला' असें सावरकर आज सांगत आहेत. खरेंहि असेल तें; पण अच्युतराव मात्र स्वातंत्र्याचा एकदांच उच्चार करून थांबले नाहींत. आपल्या प्रत्येक निश्वासाबरोबर त्यांनीं जनतेमध्यें स्वातंत्र्याचाच प्रसार केला. "राज्यकर्त्यांनो, तुम्ही आपल्या तोफा आणवा नाहीं तर बंदुका आणवा, मी तुम्हांस भिणार नाहीं. अधिकाऱ्यांनो, तुरुंगाचे दरवाजे खोला नाहीं तर पायांत लोखंडी बेड्या घाला, मी तुम्हांला भिणार नाहीं. मी स्वातंत्र्याचा शिपाई गडी आहें. जिव्हेंतून शेवटचें अस्पष्ट वाक्य निघेपर्यंत मी देशबांधवांना स्वातंत्र्याचाच उपदेश करीन" असें म्हणतच अच्युतरावांनीं आपला देह ठेवला.

## ज्वलन्त देशभक्ताला पुनश्च वंदन

स्वातंत्र्याच्या इतकेंच अच्युतरावांना हिंदुधर्माचेंहि वेड होतें. सर्व जगभर हिंदुधर्माचा प्रसार व्हावा असें त्यांना वाटे. पण हिंदुधर्माविषयींच्या त्यांच्या कल्पना आजच्या 'हिंदुत्वनिष्ठा' च्या धर्मविषयक कल्पनांप्रमाणें मूर्खपणाच्या किंवा वेडगळपणाच्या नव्हत्या. हिंदुधर्म म्हणजे स्वातंत्र्य; अगदीं पूर्ण

स्वातंत्र्य अशीच त्यांची हिंदुधर्माची व्याख्या होती. त्यांच्या हिंदुधर्मावरील प्रेमामध्यें अन्यधर्मीयांचा तिरस्कार करणें किंवा पूर्वींच्या अन्यायांबद्दल त्यांच्यावर सूड घेणें या द्वेषमूलक कल्पनांचा अंश देखील नव्हता. धर्मसहिष्णुता आणि मतस्वातंत्र्य हींच हिंदुधर्माचीं खरीं लक्षणें आहेत असें अच्युतरावांचें स्पष्ट मत होतें. अच्युतरावांचें हिंदुधर्मावर जेवढें प्रेम होतें, अच्युतरावांचें स्वातंत्र्यावर जेवढें प्रेम होतें, अच्युतरावांचें लोकमान्य टिळकांवर जेवढें प्रेम होतें, तेवढेंच महात्मा गांधींवरहि अच्युतरावांचें जबरदस्त प्रेम होतें, हें आजकालच्या हिंदुसभावाल्यांनीं नीट लक्षांत ठेवावें.

" हिंदुस्थानास स्वतंत्र करण्याकरितां महात्मा गांधींनीं जन्म घेतलेला आहे. हिंदुस्थानास स्वतंत्र करण्याकरितां महात्मा गांधी हिंदभूमींत आले आहेत, " असाच महात्माजींचा जयजयकार अच्युतराव नेहमीं करीत आले. लोकमान्य टिळक आणि महात्मा गांधी यांचें जीवनकार्य एकमेकांना पूरक आहे असें अच्युतरावांचें ठाम मत होतें.

> " जेथें टिळकांचा मार्ग तेथेंच गांधींचा मार्ग सुरू होतो. गांधी हे टिळकांच्या रत्नरेषेचें दीर्घीकरण आहे. गांधी हे राजकारणांतलि थकलेल्यांचा उत्साह आहेत, निराशेची आशा आहेत, निरुपायाचे सदुपाय आहेत. "

असें अच्युतरावांनीं गर्जून सांगितलेलें आहे, तें महात्मा गांधींचा द्वेष करणाऱ्या मूर्ख हिंदुमहासभावाल्यांनीं ध्यानांत धरावें आणि आपले डोळे उघडावेत. स्वातंत्र्याच्या प्रेमासाठीं आपल्या सर्वस्वाचा आणि संसाराचा होम करून आजन्म फकिरीपेशा पत्करणाऱ्या या प्रतिभाशाली, ज्वलन्त आणि विक्षिप्त देशभक्ताला आणि निधड्या छातीच्या लढवय्याला आमचें पुनश्च वंदन असो.

## पुण्याचा तेजस्वी ब्राह्मण—प्रो. दत्तो वामन पोतदार

पुण्यांत ब्राह्मण नाहींत अशी घोषणा श्री. पुरुषोत्तम मंगेश लाड ह्यांनीं करून पुण्यपत्तनस्थ ब्रह्मवृंदाला धरणीकंपाचा धक्का दिलेला आहे. विद्येचे उपासक, विद्येचे व्यासंगी, अहर्निश आणि आमरण ज्ञानसाधनाच्या पवित्र कार्याला ज्यांनीं वाहून घेतलेलें आहे; चिंतन, मनन आणि संशोधन ह्यांच्यासाठीं ज्यांनीं आपल्या व्यावहारिक जीविताचा होम केलेला आहे, अशाच विभूतींना ब्राह्मण्याची पदवी प्राप्त होऊं शकते. आईबाप ब्राह्मण म्हणून मुलगा ब्राह्मण ही समजूत आजच्या घटकेला तरी आईबाप डॉक्टर म्हणून मुलगा जन्मतःच डॉक्टर, आईबाप मास्तर म्हणून मुलगा मास्तर, आईबाप शिंपी म्हणून मुलगा शिंपी,या समीकरणांइतकीच हास्यास्पद आहे. लाडांनीं केलेल्या ब्राह्मण्याच्या व्याख्येच्या चौकटींत बसण्यास लायक असे फारच थोडे ब्राह्मण महाराष्ट्रांत सांपडतील.मग पुण्यांत ते कितीसे सांपडणार !एवंगुणविशिष्ट पुण्यांतील ब्राह्मणांची नामावळी आठवण्यासाठीं डोक्याला हात लावतांक्षणींच पहिलें नांव प्रामुख्यानें डोळ्यांसमोर जें येतें तें म्हणजे **राजवाडे** होय. अर्थात् हे राजवाडे म्हणजे डोक्याचें क्षौर करून आणि वर ' लाल शालजोडी जरतारी ' गुंडाळून आपल्या अग्निक्षेत्रांतील विझलेला विस्तव फुगीर गालांनीं फुंकीत बसणारे आहिताग्नी राजवाडे नसून, ज्यांच्या वयाला ऐशीं वर्षें पुरीं होऊन गेलीं आहेत, ज्यांचे चर्मचक्षू अंध झालेले आहेत तरी वैदिक वाङ्मयाच्या ज्यांच्या दीर्घ तपश्चर्येंत एका क्षणाचाहि खण्ड पडलेला नाहीं आणि सर रामकृष्ण भांडारकर ह्यांच्यानंतर **महाराष्ट्राचे महर्षि** म्हणून ज्यांना खरोखरच संबोधतां येईल ते प्रो. वैजनाथ काशिनाथ राजवाडे हे होत ! ' हॅम्लेट ' नाटकांतील भाषा वापरून म्हणावयाचें झाल्यास असें म्हणतां येईल कीं, कुणीकडे हे राजवाडे आणि कुणीकडे **ते राजवाडे** ! महर्षि राज-

वाडे ह्यांच्यानंतर निदान माझ्यासारख्या 'ब्राह्मणेतरा' च्या डोळ्यांसमोर दुसऱ्या तेजस्वी ब्राह्मणाचें नांव उभें राहतें तें म्हणजे प्रोफेसर दत्तो वामन पोतदार यांचें !

## सुरेख संगम किती !

दत्तोपंत म्हणजे जुनें आणि नवें यांचा मोठा हृदयंगम संगम आहे ! जुन्याचा भरीवपणा आणि नव्याची लकाकी, जुन्याचा पौष्टिकपणा आणि नव्याची लज्जत, जुन्याचा सुगंध आणि नव्याचा सुरंग, जुन्याचें गांभीर्य आणि नव्याचें लालित्य, जुन्याचें सोनें आणि नव्याची नकशी ह्यांचा नयनमनोहर समन्वय म्हणजे दत्तोपंत ! दत्तोपंतांइतका शुचिर्भूत आणि प्रसन्न मुद्रेचा ब्राह्मण सबंध महाराष्ट्रांत आढळून यावयाचा नाहीं ! मात्र त्यांच्या शुचिर्भूतपणामागें सनातनी रूढीचा ढोंगीपणा नाहीं कीं त्यांच्या प्रसन्नतेमागें आधुनिकत्वाचा उथळ छचोरपणा नाहीं ! म्हणूनच दत्तोपंतांच्या सनातनी आकाराबद्दल आणि आचाराबद्दल तिरस्कार वाटत नाहीं; किंवा त्यांच्या कल्पनेच्या आणि धडाडीच्या पुरोगामित्वाबद्दल भयहि वाटत नाहीं ! शिवाय दत्तोपंतांचें जें 'सनातनी'त्व आहे तें देखील इतकें आधुनिक आणि बुद्धिवादावर आधारलेलें आहे, कीं त्याच्या जीर्णत्वाची शंकाहि कोणाला यावयाची नाहीं ! दत्तोपंत डोक्याला रुमाल बांधतात, गळ्याभोंवतीं उपरणें लपेटतात, अंगांत गळेबंद शेरवानी घालतात-पण त्यांतहि त्यांची 'दत्तोपंती' फॅशन आहे. रुमाल बांधणारीं आणि उपरणीं गुंडाळणारीं शेंकडों 'पात्रें' पुण्यांतून वावरतांना दिसून येतात. पण रुमालाच्या आणि उपरण्याच्या पिढीजात बावळटपणावर आधुनिकत्वाची 'इस्त्री' फिरवून त्यांत एक प्रकारची ऐट आणि ठाकठिकी केवळ दत्तोपंतांनीं उत्पन्न केलेली आहे ! दत्तोपंत डोक्याची हजामत करतात—गोटा करतात आणि त्यांचें बुद्धिमान् गंडस्थळ आणि भालप्रदेश हा नेहमीं चंदनानें चर्चिलेला असतो; आणि त्या चंदनाच्या सुवासांत त्यांच्या बुद्धीचा सुवास मिसळला जातो; त्यामुळें त्यांच्या भोंवतालचें वातावरण सदैव सुगंधमयच असतें ! पण त्यांच्या कपाळाला आणि डोक्याला फांसलेलें गंध हें खऱ्याखुऱ्या चंदनाचें असतें. देवघरांत सांठविलेल्या सनातनी गंधगोळ्यांचें नसतें ! तुम्ही जर त्यांना त्याबद्दल विचारलेंत तर चटकन् त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण स्मितासह ते

सांगतील, "–म्हणजे–अहो, चंदन हें Anti-sceptic आहे—आरोग्यासाठीं म्हणून मी तें लावतों, उगीच लावायचें म्हणून नव्हे !"

## बॅगमध्यें सोवळें-भांडें

भर बारा वाजतां दत्तोपंत उन्हांतून जातांना दिसले आणि त्यांच्या हातांत जर खाकी रंगाची एखादी कल्याण बॅग दिसली तर त्या 'बॅग' मध्यें काय असेल अशी तुमची कल्पना आहे ? आश्चर्यानें थक्क व्हाल, मीं जर तुम्हांला सांगितलें आंत काय आहे तें तर ! त्या कल्याण बॅगमध्यें दत्तोपंतांचें 'सोवळें-भांडें' तुम्हांला आढळून येईल–अन् दत्तोपंत कुठल्या तरी मित्राच्या घरच्या लग्नसमारंभांतील शेवटची पंगत गांठायला चाललेले असतील ! कल्याण बॅगमधून सोंवळें–भांडें नेणारा दत्तोपंतांखेरीज दुसरा आधुनिक सनातनी कोणीहि आढळणार नाहीं ! जुन्यांतल्या ज्या गोष्टी राखण्यासारख्या आहेत त्या दत्तोपंत निश्चित राखतील; पण त्यांचा निष्कारण बकंवा करणार नाहींत, किंवा दुसऱ्याच्या सुधारकी बाडगेपणामुळें आपला सोवळेपणा विटाळण्याची तक्रार ते कधींहि करणार नाहींत. कृष्णराव मराठे जर पंगतीला जेवायला बसले तर काटकोन करून बसतील, निदान पाण्याची एक रेघ तरी शेजाऱ्यामध्यें आणि स्वतःमध्यें शिंपडल्याखेरीज ते राहणार नाहींत; जेवण्यास श्रीखंड-पुरीचा बेत असला तर स्वतःला एकादशी किंवा एखादा 'वार' असल्याचा बहाणा करून इतरांपेक्षां निराळे खाद्य-पदार्थ मागवतील; पण दत्तोपंतांमध्यें हें ढोंग आढळावयाचें नाहीं. ते पितांबर नेसून पाटलोणवाल्याच्या शेजारीं बसतील ! शेजारचा माणूस मटणाचा रस्सा ओरपीत असला तरी दत्तोपंत निःसंकोचपणें आपल्या कढीचे भुरके घेत असतांना तुम्हांला दिसतील. आपल्या मतभेदामुळें किंवा आचारभेदामुळें दुसऱ्याला संकोच वाटेल किंवा अडचण उत्पन्न होईल असें दत्तोपंतांच्या हातून केव्हांहि घडणार नाहीं.

## नैष्ठिक ब्रह्मचारी

दत्तोपंत ब्रह्मचारी आहेत ! अगदीं नैष्ठिक ब्रह्मचारी आहेत ! त्यांच्या ब्रह्मचर्याबद्दल संशय येणार नाहीं ! पण इतर धंदेवाईक ब्रह्मचाऱ्यांप्रमाणें त्यांनीं आपल्या ब्रह्मचर्याचें प्रदर्शन किंवा स्तोम कधींहि केलेलें नाहीं; किंवा आपण

आयुष्यांत कांहीं तरी अपूर्व साधलें आहे असा अभिमानहि त्यांच्या अंगांत उत्पन्न झालेला नाहीं. कारण ब्रह्मचर्याकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन अगदीं व्यावहारिक आणि कोणालाहि पटण्यासारखा आहे. "माझ्यापुढें इतकीं महत्त्वाचीं कामें आहेत कीं लग्नाचा विचार करायला मला वेळच नाहीं!" हे त्यांचें अविवाहित राहण्याचें समर्थन कोणालाहि पटण्यासारखें आहे. आणि खरोखरच त्यांनीं गेलीं अडीच तपें अंगावर घेतलेले कामाचे अजस्र डोंगर बघितले, म्हणजे खरोखरच त्यांच्या डोक्यांत लग्नाचा विचार चुकून देखील येणें शक्य नाहीं अशी कोणाचीहि खात्री होईल. मी पुष्कळ वेळां विनोदानें स्वतःशींच म्हणत असतों, कीं खरोखरच दत्तोपंतांचें लग्न ठरलें असतें तर त्यांच्या कामाच्या गर्दीमुळें स्वतःच्या लग्नालाहि हजर रहायला त्यांना वेळ मिळाला असता कीं काय याची शंका आहे! त्यांनीं भटजीला असें निश्चित सांगितलें असतें कीं, 'हें पहा, आज आमच्या भारत इतिहास-संशोधक-मंडळाचा वार्षिक उत्सव आहे. मला वेळेवर यावयाला मिळायचें नाहीं. तुम्ही आपलें तुमचें मंततंत्र काय तें उरकून टाका, मी शेवटच्या घटकेला येईन! अन् नाहींच आलों तर संध्याकाळीं तरी येईन!' सगळ्यांत महत्त्वाची गोष्ट सांगायची म्हणजे ही कीं, दत्तोपंत ब्रह्मचारी असले तरी स्त्रीपुरुषमिश्रित समाजांत मिसळतांना त्यांना 'कसेंसें'च वाटत असल्याचें कधींहि दिसून येत नाहीं, इतक्या मोकळेपणानें आणि आनंदानें स्त्रियांशीं ते बोलूं शकतात. इतर ब्रह्मचाऱ्यांची स्त्रियांशीं बोलतांना जी तिरपीट होते, विशेषतः डोळ्याला डोळा भिडतांना त्यांची जी धांदल होते ती लक्षांत घेतां दत्तोपंतांच्या या समशीतोष्ण वृत्तीबद्दल कौतुक वाटतें. तसेंच त्यांच्या ब्रह्मचर्यामुळें त्यांच्या सांसारिक प्रेमालाहि मुरड बसलेली नाहीं. त्यांच्या धाकट्या बंधूंच्या मुलाला–'टोम्या' ला–अंगाखांद्यावर खेळवतांना दत्तोपंतांना पाहिलें म्हणजे कोणत्याहि प्रेमळ पित्याच्या वात्सल्यापेक्षां त्यांचें अपत्यप्रेम कांकणभर जास्तच आहे असें आढळून येईल.

## आल्हाददायक मूर्ति

दत्तोपंत म्हणजे शुचिर्भूतता, प्रसन्नता आणि समाधान यांची अत्यंत आल्हाददायक मूर्ति! दत्तोपंतांच्या चेहेऱ्यावर मालीन्य, औदासीन्य आणि

थकवा औषधाला देखील कधीं सांपडावयाचा नाहीं. केव्हांहि तुम्ही त्यांच्याकडे जा, मुद्रेवर प्रसाद नुसता नाचतो आहे—कधीं कंटाळा नाहीं—आळस नाहीं—आजार तर नाहींच नाहीं ! दत्तोपंत आजारी पडल्याचें मीं कधीं पाहिलें नाहीं—किंवा ऐकलें नाहीं ! पडसें, खोकला, पोटदुखी असल्या मामुली तक्रारींनीं त्यांना कधीं तकलीफ दिल्याचें मला कधीं दिसलें नाहीं. केव्हांहि अगदीं सकाळीं जा; स्वच्छ आंघोळ करून, धावळीचें जाकीट घातलेली, डोक्याला गंध फासलेली, अशी प्रसन्नमुख मूर्ति तुम्हांला आढळून येईल—कदाचित् पावलोणी, टोमाटोची अत्यंत आधुनिक अशी ' ब्रेकफस्ट ' घेतांना तुम्हांला स्वारी दिसेल !

## फडकेगिरीचा धुव्वा उडविणारे दत्तोपंत !

दत्तोपंत म्हणजे गडबड आणि बडबड ! त्यांच्या तोंडाची टकळी एकसारखी अत्यंत सफाईनें चाललेली असते ! महाराष्ट्रांत त्यांच्याइतका बडबड्या ( चांगल्या अर्थानें मी हा शब्द वापरतों आहें ! ) गृहस्थ मीं पाहिला नाहीं. एकसारखे अहर्निश आपले बोलताहेत ! शब्दांच्या पलटणी हात जोडून त्यांच्यापुढें खड्या आहेत. भाषेचें वैपुल्य तर विचारूं नका. एका शब्दाला पंचवीस विशेषणें वापरतांना मीं मोजलेलीं आहेत ! इतक्या लवकर कृत्रिम दांत त्यांना वापरावे लागले ह्याचें कारण देखील त्यांना पडलेला अतिरिक्त व्यायाम हेंच असावें असें मला वाटतें. इतकेंहि असून त्यांच्या बडबडीचा ऐकणाराला कंटाळा वाटत नाहीं. पुण्याच्या नव्या पुलावर उभे राहून मुठेला आलेला पूर पाहतांना जी मौज वाटते तीच मौज तासन् तास, दत्तोपंतांच्या रसवंतीचा दुथडी भरून वाहत असलेला ओघ ऐकून श्रोत्यांना वाटते. उफर्डें आणि ऐटबाज बोलावें असें दत्तोपंतांनींच ! त्यांचें वक्तृत्व अगदीं जन्मसिद्ध आहे ! त्यांच्या वक्तृत्वांत जो एक तेजस्वीपणा आणि जी एक धार आहे तशी महाराष्ट्रांतील फारच थोड्या वक्त्यांत आढळून येईल. कोणताहि विषय असो, त्यावरील त्यांचें म्हणणें अगदीं आत्मप्रतीतीचें आणि आत्मप्रत्ययाचें म्हणून निश्चित असावयाचें ! त्यामुळें विषयाशीं ते एकदम तादात्म्य पावतात आणि त्यांच्या भाषणाला पहिल्या वाक्यापासून रंग चढतो ! तासचे तास रंगत कायम ठेवून ते अस्खलितपणें बोलूं शकतात ! विशेषत: एखादा वादविवाद

ऐन रंगाला आला असला आणि उत्तरपक्ष करावयाला दत्तोपंत उठले म्हणजे मात्र त्यांच्या वक्तृत्वाची प्रखरता अत्यंत देदीप्यमान् असते. फड जिंकायचें आणि सभा मारायचें काम करावें दत्तोपंतांनींच ! अपयश म्हणून कधीं यायचेंच नाहीं ! आज गांधींना शिव्या देणारे प्रो. फडके हे १९२० च्या असहकारिते--च्या चळवळीच्या वेळीं कॉलेजांतील विद्यार्थ्यांना कॉलेजें सोडण्याविषयीं व्याख्यानबाजी करून राहिले होते. विशेषत: ज्या कॉलेजच्या संस्थापनेंत खुद्द त्यांचा भाग होता तें 'न्यू पूना कॉलेज' बंद पाडण्यासाठीं त्यांनीं स्वत:च हत्यार उचललें. प्रो. फडके हे त्या वेळीं विद्यार्थिवर्गात अत्यंत प्रिय ! ते काय म्हणतील तें ऐकायला विद्यार्थी एका पायावर तयार ! त्यामुळें विद्यार्थी अगदीं हवालदिल होऊन गेले आणि कॉलेज आतां जवळ जवळ बंद पडतें आहे अशी वेळ येऊन ठेपली. अशा आणीबाणीच्या वेळीं त्या कॉलेजचें संरक्षण दत्तोपंतांनीं केवळ आपल्या प्रभावशाली वक्तृत्वामुळेंच केलें. त्यांनीं मोठ्या धाडसानें आणि चिकाटीनें विद्यार्थ्यांना एकत्रित करून त्यांच्या प्रत्येक शंकेला समाधानपूर्वक उत्तर दिलें, त्यांची खात्री पटविली आणि फडकेगिरीचा धुव्वा उडविला ! १९३१ च्या कोल्हापूरच्या साहित्य-संमेलनांत दहा हजार श्रोत्यांपुढें अगदीं सुरुवातीला दत्तोपंतांनीं जें भाषण केलें तें ह्या हयातींत तरी मी विसरणें शक्य नाहीं. त्या सभेचें स्वरूपच इतकें विराट् होतें कीं, कोणताहि दुसरा वक्ता ऐन आघाडीला इतक्या दिमाखानें बोलूं शकला नसता ! नगर साहित्य-संमेलनाच्या अध्यक्षस्थानावरून त्यांनीं केलेलें भाषण तर त्यांच्या वक्तृत्वाचा परमोत्कर्षच होय ! मराठी भाषेबद्दलच्या अभिमानानें, तळमळीनें आणि कळकळीनें त्यांतील शब्दन् शब्द ओथंबलेला आहे ! विचार आणि भाषाशैली ह्या दोन्ही दृष्टींनीं हें भाषण म्हणजे 'दत्तोपंती' वक्तृत्वाचा एक तेजस्वी नमुना होय ! अत्यंत महत्त्वाचीं भाषणें दत्तोपंत जितक्या जबाबदारीनें बोलूं शकतात तितकींच अगदीं मामुली स्वरूपाचीं भाषणेंहि ते मनोरंजक करूं शकतात. आभाराचें भाषण करावें असें दत्तोपंतांनींच ! मात्र दहा मिनिटांच्या आंत खुर्चीवरून अर्धवट उठलेली श्रोते मंडळी पुन्हां खालीं बसून मनापासून हंसत असलेली दिसलीच पाहिजेत ! भाषण करतांना दत्तोपंत जितके खेळकर होऊं शकतात तितकेच रागावले म्हणजे त्यांच्या संतापाला सीमा राहत नाहीं ! मात्र तो संताप इतका सात्त्विक असतो, कीं कसलाहि अवखळ

श्रोतृवृंद असला तरी तो चपापून स्तब्ध बसल्याविना राहत नाहीं. भाषाप्रभुत्व हें दत्तोपंतांच्या अंगीं आनुवंशिक आहे. त्यांचे वडील श्री. बाबासाहेब पोतदार हेहि मोठे ओघवान् आणि बहुश्रुत वक्ते म्हणून त्यांच्या वेळीं प्रसिद्ध होते. केवळ मराठीमध्येंच नव्हे तर दत्तोपंत इंग्रजी, संस्कृत, उर्दूमध्येंहि अस्खलित बोलूं शकतात. मराठी बोलण्यांत जो ठसका आणि जी ऐट तीच इंग्रजीमध्यें ! मराठी जितकें द्रुतगतीनें बोलतात तितकेच ते संस्कृतमध्येंहि बोलूं शकतात. एखाद्या महामहोपाध्याय पाठक किंवा अभ्यंकरशास्त्र्याप्रमाणें दत्तोपंत सबंध व्याख्यानच्या व्याख्यान संस्कृतमध्यें देऊं शकतात. नागपूरचे श्री. कृष्णशास्त्री घुले त्यांचें संस्कृत वक्तृत्व पाहून थक्कच झाले ! तसेंच हैदराबादमध्यें त्यांनीं आपल्या उर्दू भाषणांनीं तेथील लोकांनाहि चकित करून सोडलें ! एरवीं देखील दत्तोपंतांची मुळीं पद्धतच आहे कीं किंजवडेकर शास्त्री भेटले तर त्यांच्याशीं संस्कृतमध्यें ते गप्पा मारतील—अन् खानबहादूर महंमद हिदायतुल्ला भेटले कीं त्यांच्याशीं उर्दूमध्यें बातचीत करतील !

## विसराळूपणाचे नमुने

दत्तोपंतांचा व्याप आणि धांदल ह्यांना कांहीं माप नाहीं. गडबड, धडपड, गोंधळ ह्या गोष्टी त्यांच्या पांचवीला पुजलेल्या आहेत. एखाद्या गांवीं साहित्य-संमेलनाला गेले असतील तर बरोबर चारपांच अर्धवट लेखांचीं हस्तलिखितें झोळींत असतील, कांहीं प्रुफें असतील, साहित्यसंमेलनाच्या ऐन धांदलींत गांवांत चारपांच ठिकाणीं कार्यक्रम असतील, कुठें एखाद्या मोफत वाचनालयांत समारंभ असेल, कुठें कऱ्हाडे ब्राह्मणसंघाची एखादी बैठक असेल, कुठें एखादा जुना ऋणानुबन्धी दाढीवाला म्हातारा आजारी असेल त्याच्या प्रकृतीची तेवढ्यांत चौकशी करून येतील, कुठें एखाद्या देशपांड्यांच्या किंवा बोकिलांच्या घराण्याचा एखादा वंशज राहात असेल आणि त्याच्या घरीं एखादा ऐतिहासिक कागदपत्रांचा गठ्ठा किंवा सनदा असतील तर त्याच्याकडूनहि एवढ्यांत ते चक्कर मारून येतील; आणि तेवढेंहि करून विषयानियामक मंडळीच्या बैठकीच्या वेळीं महत्त्वाच्या ठरावांवर बोलण्यासाठीं अर्धवट घामाघूम झालेल्या परिस्थितींत घाईघाईनें येऊन उपस्थित होतील ! दत्तोपंतांच्या जिवाची अन् मनाची एकसारखी धांदल चाललेली असते—नाहीं असें नाहीं—पण

त्यामध्यें कोठल्याहि तऱ्हेचा धांदरटपणा चुकून देखील आढळून यावयाचा नाहीं. दत्तोपंतांचें वागणें आणि बोलणें इतक्या धकाधकीच्या मामल्यांतहि अगदीं सतबंद असल्यामुळें,कोणत्याहि कामांत पडतें खाण्याचा, ओशाळण्याचा प्रसंग त्यांना कधींहि आला नाहीं. उलट दत्तोपंत आपलेच दोन शब्द वर ठेवून दिल्याशिवाय राहणार नाहींत ! नूतन मराठी विद्यालयाचे ते व्यवस्थापक असतांना, हिशेबाच्या बाबतींत शाळेच्या एका ऑडिटरनें त्यांच्या हिशेबांत कांहीं महत्त्वाचे आक्षेप काढले. सदर ऑडिटर त्याच्या हुशारीबद्दल आणि चोखपणाबद्दल फारच प्रसिद्ध होता. पण दत्तोपंतांच्या चुका दाखवून देण्याचा उपद्व्याप त्यानें केल्याबरोबर दत्तोपंतांनीं त्याच्या पदरांत सव्याज माप घालून त्याच्या शहाणपणाची अशी भंबेरी उडविली, कीं त्याला दत्तोपंतांची सपशेल माफी मागावी लागली ! एवंच, दत्तोपंत बाहेरून थोडेसे धांदरट दिसले तरी त्यांच्यासारखा हिशेबी आणि पक्का माणूस क्वचितच आढळून येईल. दत्तोपंतांच्या गडबडीचे आणि विसराळू स्वभावाचे नमुने अगदीं नाहींत असें नाहीं. आगगाडींतून प्रवास करीत असतांना, खिडकींतून बाहेर थुंकतांना त्यांनीं आपली दांतांची कवळी गमावली. घरीं येऊन ती कवळी पुन्हां करावयाला दंतवैद्याला सांगितलें तर शौचकूपांत शिंक येऊन उरलेली कवळी त्यांनीं कशी गमावली त्याबद्दलची मनोरंजक गोष्ट सुप्रसिद्धच आहे. तसेंच बाहेरगांवचा एक पाहुणा दत्तोपंतांच्या घरांत एक महिनाभर जेवत होता. दत्तोपंतांना वाटे कीं हा वडिलांचा पाहुणा आहे; तर त्यांच्या वडिलांना वाटे कीं हा दत्तोपंतांचा पाहुणा आहे. दोन्ही घरचा पाहुणा उपाशी राहतो असें म्हणतात; पण दोन माणसांचा पाहुणा एका घरांत महिनाभर पोटभर जेवूं शकतो हें त्या वेळीं आम्हांला पाहावयास सांपडलें ! दत्तोपंतांचा स्वभाव वरकरणी सैल आणि ढिला दिसत असला तरी, त्यांच्या स्वभावाची बैठक अगदीं कडक आहे ह्यांत शंका नाहीं. कोणत्याहि सभेचे किंवा कमिटीचे अध्यक्ष त्यांना करा; मग त्यांच्या स्वभावांतली मख्खी ध्यानांत येते. सभेचें काम इतकें झपाट्यानें, कडकपणानें आणि निष्ठुरतेनें ते करतात कीं, अगदीं त्यांचे जवळचे मित्रदेखील त्यांच्यावर नाखूष होतील ! मुद्द्याबाहेरचा एक शब्द ते कोणाला बोलूं द्यावयाचे नाहींत–अगदीं तोडून आणि फटकळपणानें अनावश्यक बोलणाऱ्यास ते खालीं बसवतील ! एखाद्या कामाची वकिली ते जितकी आर्जवानें आणि जबाबदारीनें

करतील, तितकेंच न्यायाधीशाचें काम ते निष्ठुरतेनें आणि निःपक्षपातीपणानें करतील. त्यांच्या बरोबरीचा एक प्राध्यापक मित्र, जो लहानपणापासून त्यांचा संवगडी होता आणि त्यांच्याबरोबरच ज्यानें ब्रह्मचर्याची प्रतिज्ञा केली होती ( पण पुढें ती ज्याला कांहीं पाळतां आली नाहीं !) असा, एका जबाबदारीच्या जागेवर त्यांच्याच संस्थेंत काम करीत होता. ह्या मित्रावर पैशाच्या आणि व्यवहाराच्या बाबतींत कांहीं आक्षेप आले आणि त्याची चौकशी करावयास नेमलेल्या कमिटीवर त्या मित्राच्या सांगण्यावरूनच दत्तोपंतांची नेमणूक झाली. दत्तोपंतांनीं त्या मित्राला त्याच वेळीं सांगितलें कीं, " तूं माझें नांव सुचवूं नकोस. तुझें चुकलें असेल तर तुझ्या वर्तनाचें समर्थन मी कालत्रयीं करणार नाहीं !" पण मित्रानें ऐकलें नाहीं. पुढें चौकशींत त्या मित्राचें वर्तन दत्तोपंतांच्या दृष्टीनें आक्षेपार्ह ठरलें व त्यांनीं स्पष्टपणें तसें आपल्या प्रतिवृत्तांत नमूद केलें. त्या मित्राला सेवानिवृत्त व्हावें लागलें आणि इतक्या वर्षांच्या दोघांच्या मैत्रींत अंतराय उत्पन्न झाला ! ' प्रतिभासाधन ' कमिटीचे दत्तोपंत अध्यक्ष होते. प्रो. फडके त्यांचे शिष्य; पुढें सहकारी. पण त्यांची भीडमुर्वत न बाळगतां दत्तोपंतांनीं फडक्यांच्या उसनवारीचें माप बरोबर त्यांच्या गळ्यांत अडकवलें. 'प्रतिभासाधन' चौकशीचा सर्व वृत्तान्त स्वतः दत्तोपंतांनीं लिहिलेला आहे. त्यांत दत्तोपंतांच्या लेखनशैलीचा उन्मेष मोठ्या तेजस्वितेनें चमकलेला दिसून येईल. दत्तोपंतांच्या ह्या कडकपणाची बैठक त्यांच्या तत्त्वनिष्ठेवरच झालेली आहे. काय वाटेल तें झालें तरी दत्तोपंत आपलें तत्त्व म्हणून कधींहि सोडणार नाहींत. दत्तोपंतांनीं राजकारणांत जर का भाग घेतला असता तर ते फारच मोठ्या दर्जाचे पुढारी झाले असते ! ते कॉंग्रेसमन नसले तरी त्यांची राष्ट्रीय वृत्ति फारच जाज्वल्य आहे ! ते हिंदुत्वाचे अभिमानी असले तरी ते हिंदुसभावले खास नाहींत ! सावरकरांची उर्दू-द्वेषावर उभारलेली मराठीकरणाची चळवळ त्यांना मुळींच पसंत नाहीं ! मराठी इतिहासाचा सावरकरांनीं चालविलेला दुरुपयोग त्यांना सुतराम् मान्य नाहीं ! महाराष्ट्र साहित्य-परिषदेच्या घटनेबद्दल अनेक वर्षें वाद चाललेला सुप्रसिद्धच आहे. त्यांत दत्तोपंत एका वादस्तंभाचे नेते होते. बहुमत जरी त्यांच्या विरुद्ध गेलें तरी त्यांची तात्त्विक भूमिका त्यांनीं सोडली नाहीं. ऐतिहासिक संशोधनाच्या बाबतींत त्यांचा सर जदुनाथ सरकार, रा. ब. सरदेसाई, वाकसकर ह्यांच्याशीं मूलभूत

मतभेद आहे. विशेषतः शिवाजीमहाराजांच्या जन्मतिथीबाबत हा वाद तर विकोपाला गेला होता. पण दत्तोपंतांनीं आपल्या प्रतिपक्षाची हड्डी नरम केल्याशिवाय सोडलें नाहीं. विश्वविद्यालयांत कोणत्याहि परीक्षकाच्या जागेसाठीं आपण अर्ज म्हणून करणार नाहीं; आपली विद्वत्ता आणि व्यासंग विश्वविद्यालयाला मान्य असल्यास त्यानें आपणांस परीक्षक होण्याबद्दल आमंत्रण द्यावें असा दत्तोपंतांचा हट्ट होता. त्याप्रमाणें दत्तोपंत आमंत्रणानेंच परीक्षक झाले —अर्जानें नव्हे! विश्वविद्यालयाच्या एका निवडणुकीसाठीं हेडमास्तरांच्यातर्फें ते उभे राहिले. पण 'कॅन्व्हासिंग' करण्याच्या ते विरुद्ध! त्यांच्या शाळेच्या समोर असलेल्या मुलींच्या शाळेच्या मुख्य अध्यापिकेलाहि ते स्वतः-बद्दल सांगायला गेले नाहींत! ते म्हणत, "माझ्याबद्दल मी अधिक तें काय सांगणार! हेडमास्तर लोक काय मूर्ख आहेत? त्यांना मी लायक वाटल्यास त्यांनीं जरूर आपापलीं मतें मलाच द्यावयास पाहिजेत!" शेवटीं त्याचा परिणाम असा झाला कीं दत्तोपंत निवडून येऊं शकले नाहींत. त्यांच्या एका अत्यंत परिचित, पूर्वीं त्यांचाच विद्यार्थी असलेल्या एका हेडमास्तरानें त्यांना मत देतों असें वचन देऊन अखेर त्यांच्याच प्रतिपक्षाला जेव्हां मत दिलें तेव्हां ते अगदीं चिडून म्हणाले, "महामूर्ख आहेत हे हेडमास्तर!" फिरून अर्थातच ते कोणत्याहि निवडणुकीला उभे राहिले नाहींत—आणि उभे राहिलेच तर 'कॅन्व्हासिंग'च्या अभावीं आजच्या परिस्थितींत ते निवडून येणेंहि कठीण!

## अनेक संस्थांचे चालक

महाराष्ट्र साहित्य-परिषद्, साहित्य-संमेलन, भारत इतिहास-संशोधक-मंडळ, महाराष्ट्र शारदा-मंदिर, शिक्षण-प्रसारक-मंडळी, महाराष्ट्र युनिव्हर्सिटी, गडकरी-पुण्यतिथि, इत्यादि संस्था आणि कार्यें अगदीं धार्मिक नियमितपणानें इतकीं वर्षें दत्तोपंत चालवीत आले आहेत. यांपैकीं कित्येक संस्थांसाठीं तर त्यांनीं आपल्या जिवाचें रान केलेलें आहे-आपलें रक्त ओतलेलें आहे-आपला पैसा खर्च केला आहे. कित्येकांना आज त्यांच्या श्रमाची किंमत वाटत नसेल, कित्येकांना दत्तोपंतांनीं आपला वेळ निष्कारण दवडला असेंहि वाटत असेल; पण दत्तोपंतांच्या निष्ठेची, कर्तृत्वाची आणि उद्योगाची जोड जर वरील कार्याला

नसती, तर महाराष्ट्राचें केवढें नुकसान झालें असतें ह्याची कल्पनाच केलेली बरी !

## दत्तोपंत व लफडीं

नसत्या हजारों लफड्यांत दत्तोपंत आपला वेळ निष्कारण घालवितात असा त्यांच्यावर त्यांच्या मित्रांचा आणि हितचिंतकांचा आक्षेप आहे. गोव्यापासून बडोद्यापर्यंत आणि हैद्राबादपासून नागपूरपर्यंत, गणेशोत्सवांत आणि अनेक सामान्य उत्सवांत व्याख्यानें द्यावयास त्यांची नेहमीं तयारी असते. ह्या बाबतींत त्यांच्या उत्साहाला सीमा नाहीं ! ऐन उन्हाळ्यांत जाकोबाबादला एकाद्या मोफत वाचनालयाच्या उद्‌घाटन-समारंभाला हे जातील असें मी प्रो. श्री. नी. चाफेकरांबद्दल एकदां बोललों होतों; पण मला वाटतें हें विधान दत्तोपंतांना अधिक लागू होईल. केव्हांहि जा, दत्तोपंतांच्या भोंवतालीं कुठल्या तरी अलबत्या-गलबत्यांचें कोंडें पडलेलें असावयाचेंच आणि दत्तोपंत न कंटाळतां तासन् तास त्यांच्याशीं बोलत बसलेले आढळून येतील. उलट त्यांना असेंहि सांगत असतील कीं, “मला फार काम आहे—मला तुमच्याशीं बोलायला सुद्धां वेळ नाहीं—अगदीं डोकें खाजवायलाहि सवड नाहीं—” इ. इ. एकदां मॅट्रिकच्या वर्गांतील एक विद्यार्थी पूर्वपरीक्षेंत नापास होऊनहि दत्तोपंतांकडे ‘फॉर्म’ मागावयाला आला. दत्तोपंत तीन तासपर्यंत त्याला व्याख्यानाचे डोस पाजीत होते. “आयुष्य हें असें आहे. जगाची परिस्थिति अशी आहे” इ. इ. तीन तासांनंतर दत्तोपंतांनीं त्याला विचारलें कीं “बोल, अशा परिस्थितींत तुला कसा फॉर्म देतां येणें शक्य आहे ?” त्यावर तो विद्यार्थी अगदीं निर्ढावलेल्या माणसाप्रमाणें शांतपणें म्हणाला, ‘जाऊं द्या–देऊन टाका मला फॉर्म झालं !’ त्यावर दुसरा एखादा माणूस दत्तोपंतांच्या जागीं असता तर त्यानें त्या विद्यार्थ्याच्या मुस्कटांतच भडकविली असती. पण दत्तोपंत एखाद्या स्थितप्रज्ञाप्रमाणें त्याला म्हणाले, “आतां फिरून पहिल्यापासून तुला मला तीन तास सांगावें लागेल.” अशा ह्या वातावरणांत दत्तोपंतांच्या हातून भरीव ‘लिखाण’ होऊं शकलें नाहीं असा त्यांच्या मित्रांचा आक्षेप आहे—अर्थात् दत्तोपंतांना ही गोष्ट

मान्य नाहीं तें निराळें! दत्तोपंतांजवळ 'ग्रंथसंग्रहा'चा डोंगरच्या डोंगर पडलेला आहे! सर्व दुर्मिळ हस्तलिखितें, पुराणग्रंथ दत्तोपंतांजवळ हमखास सांपडावयाचेच. एवढा प्रचंड ग्रंथसंग्रह एका व्यक्तीजवळ असा महाराष्ट्रांत क्वचितच आढळेल. ह्या ग्रंथसंग्रहाकडे बोट दाखवून दत्तोपंत म्हणतील, कीं "पुढील दहा वर्षांचा माझा लेखनकार्याचा कार्यक्रम तयार आहे!" आतां हा कार्यक्रम त्यांच्या हातून केव्हां पार पडेल तो पडो! 'मराठी गद्याचा इंग्रजी अवतार' हा उत्कृष्ट संदर्भग्रंथ त्यांनीं लिहिलेला आहेच. तथापि मराठी भाषा व इतिहास ह्या दोन विषयांवर कांहीं तरी मौलिक ग्रंथरचना त्यांच्या हातून व्हावी अशी महाराष्ट्राची त्यांच्यावद्दलची अपेक्षा आहे. दत्तोपंत ग्रंथ-रचना करोत वा न करोत; विद्येच्या व्यासंगांत त्यांनीं आपलें सारें आयुष्य खर्च केलेलें आहे. अध्ययन व अध्यापन ह्या दोन कार्यांमध्यें ते नेहमीं निमग्न अस-तांना, मराठी भाषा, संस्कृति आणि इतिहास ह्यांबद्दल त्यांच्याइतका जाज्वल्य अभिमान इतरांना क्वचितच असेल! आणि ह्या अभिमानाचा प्रसार महारा-ष्ट्रांत त्यांनीं अगदीं पोटतिडीक घेऊन केलेला आहे. आपल्या आदर्शभूत चारित्र्यानें, निर्मळ विचारानें आणि सामर्थ्यवान कर्तृत्वानें दत्तोपंतांनीं महारा-ष्ट्रांतील हजारों तरुणांना स्फूर्ति दिलेली आहे, आणि त्यांच्या आयुष्याला योग्य तें वळण लावलें आहे. म्हणूनच आम्ही त्यांना उत्कृष्ट शिक्षक आणि अतएव 'उत्कृष्ट ब्राह्मण' समजतों! इतिहास-संशोधनांत आजपर्यंत त्यांनीं आपला सर्व काळ घालविलेला आहे. म्हणून सकृद्दर्शनीं ते 'जुनाट पुरुष' आहेत असें वाटतें. तथापि भूतकाळाच्या रद्दींत ते लोळत असले तरी त्या रद्दीमधून रत्नें हुडकून काढण्याची त्यांची दृष्टि व मनोभूमिका पाहिली म्हणजे त्यांचें महत्त्व लक्षांत येतें.

### बत्तिसगुणी दत्तोपंत

विष्णुशास्त्री चिपळूणकरांपासून ते मराठी भाषेचा अभिमान शिकले, विश्वनाथ काशीनाथ राजवाडे ह्यांच्यापासून त्यांनीं इतिहाससंशोधनाची आणि ब्रह्मचर्याची दीक्षा घेतली, लोकमान्य टिळकांपासून त्यांनीं निर्भीड वृत्तीचा राष्ट्रीय बाणा पत्करला, न्यायमूर्ति रानडे ह्यांच्यापासून मराठ्यांच्या संस्कृती-

विषयींचा अभिमान त्यांच्या मनावर बसला आणि विनायकरावजी आपटे ह्यांच्यापासून साधेपणा, चिकाटी, आणि प्रसिद्धिपराङ्मुखता ते शिकले. एवढ्या श्रेष्ठ महापुरुषांच्या अंगांतले गुण अंशतः एकत्र करून त्यांच्यावर आपल्या वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्वाचा ' दत्तोपंती ' छाप मारावयाला त्यांनीं कमी केलें नाहीं. म्हणूनच आम्ही त्यांना पुण्यांतले एक ' तेजस्वी ब्राह्मण ' समजतों. असा प्रतिभाशाली ब्राह्मण शतकांत एकदांच जन्माला येतो असें आमचें ह्या क्षणाला स्पष्ट मत आहे. त्यांतील सत्यता काळ पटवून दाखवीलच.

पुण्यांतील ह्या तेजस्वी ब्राह्मणास आमचें वंदन असो.

## मराठी वृत्तपत्राचे काका

काकासाहेबांची आणि माझी पहिल्यानें कधीं ओळख झाली हें आज मला आठवत नाहीं. त्यांची माझी पहिली भेट केव्हां झाली, कुठें झाली, कां झाली किंवा कोणीं करून दिली, ह्यांपैकीं एकहि गोष्ट मला आतां स्मरत नाहीं. मला माझी स्मरणशक्ति अत्यंत तीक्ष्ण आहे असें वाटतें; तथापि काकासाहेबांच्या आणि माझ्या मैत्रीच्या आरंभिचें चित्र रेखाटण्याच्या कामीं तिनें एवढें कां रुसून बसावें हें मला कळत नाहीं ! आज मला असेंच वाटतें कीं, काकासाहेबांची आणि माझी अनेक वर्षांची मैत्री आहे. जणुं कांहीं आम्ही एकाच गांवचे, एकाच आळींतले, एकाच कुटुंबांतले आहोंत, इतका जिव्हाळा, इतका आपलेपणा मला काकासाहेबांबद्दल वाटतो.

मी इंग्लंडहून १९२८ सालीं परत आल्यानंतर माझ्या विशिष्ट पद्धतीनें जाहीर व्याख्यानें देण्यास सुरवात केली. इंग्लंडमध्यें डॉ. बॅलार्ड ह्या नांवाचे एक विख्यात शिक्षणशास्त्रज्ञ आहेत. त्यांचीं शिक्षणशास्त्र आणि मानसशास्त्र ह्यांजवरचीं व्याख्यानें ऐकण्याची मला संधी मिळाली. डॉ. बॅलार्ड हे कोणत्याहि विषयावर बोलोत; त्यांचीं व्याख्यानें विनोदी उदाहरणांनीं आमूलाग्र भरलेलीं असावयाचीं. त्यामुळें श्रोत्यांच्या हंसून हंसून मुरकुंड्या वळत. त्या व्याख्यान-पद्धतीनें माझ्या मनाची पकड घेतली. श्रोत्यांच्या गळीं आपले विचार आणि कल्पना उतरविण्यास विनोदासारखें रामबाण शस्त्र नाहीं याची मला खात्री पटली, आणि परत इकडे आल्यानंतर मीं त्या पद्धतीनें व्याख्यान देण्यास सुरुवात केली. माझ्या व्याख्यानांबद्दल काकांनीं कुठें ऐकलें कोणास ठाऊक, पण त्यानंतर माझ्या व्याख्यानांचीं प्रतिवृत्तें ‘ ज्ञानप्रकाश ’ मध्यें ‘ हंशा आणि टाळ्या ’ ह्या कंसांतल्या सुप्रसिद्ध जोडगोळीसह प्रसिद्ध होऊं लागलीं. माझीं व्याख्यानें जितकीं लोकप्रिय होऊं लागलीं, त्यापेक्षांहि मुद्रित स्वरूपांत तीं

जास्त लोकप्रिय झालीं. व्याख्याता म्हणून माझा लौकिक महाराष्ट्रांत पसरविण्यास काकासाहेबच कारणीभूत झाले. आणि हाच लौकिक माझ्या पुढील वाङ्मयीन यशाला साहाय्यक ठरला. माझी आणि काकांची तोंपर्यंत प्रत्यक्ष अशी मुळींच ओळख नव्हती. तेव्हां दोस्तीच्या पोटीं माझी जाहिरात करण्यास काका प्रवृत्त झाले असें जर कोणी म्हणेल तर तें खोटें आहे. पण काकांची जी विशिष्ट संपादकीय शैली आहे तिचा हा 'उद्योग' आहे. समाजांत जें जें कांहीं नवीन, चटकदार, आकर्षक असें निर्माण होईल, त्याची सर्वांच्या आधीं दखलगिरी घेण्यांत काका जागरूक असत. माझी व्याख्यानपद्धति ही अभिनव असून ती समाजांत लोकप्रिय होण्यासारखी आहे, एक निराळीच 'गंमत' समाजापुढें यामुळें येण्यासारखी आहे, महाराष्ट्राच्या एरवींच्या गंभीर जीवनाला कलाटणी देण्यास हा एक चांगलाच उतारा आहे, ह्या भावनेनें काकांनीं माझीं शेंकडों भाषणें सविस्तरपणें 'ज्ञानप्रकाशां'त छापलीं. अर्थात् प्रश्न माझ्या भाषणांचा नाहीं. ती एक निमित्तमात्र गोष्ट होती. पण त्यामुळें व्याख्यानांचीं प्रतिवृत्तें वृत्तपत्रांत छापण्याची एक अभिनव पद्धति काकांनीं महाराष्ट्रांत सुरू केली ह्यांत शंका नाहीं. काकांच्या 'ज्ञानप्रकाश'च्या ह्या वैशिष्ट्याचें यशस्वी अनुकरण अद्यापि एकाहि वृत्तपत्राला करतां आलें नाहीं, ह्यांतच काकांच्या प्रतिभेचें मर्म आहे. भालाकार भोपटकर, श्री. काकासाहेब गाडगीळ, श्री. मोरे, कै. बागडे, अशा अनेक वक्त्यांचीं भाषणें, पुणें म्युनिसिपालिटीच्या आणि इतर अनेक जाहीर सभांचे अहवाल, ह्याच पद्धतीनें छापून 'मुद्रित व्याख्यान' हा एक अभिनव वाङ्मयप्रकार काकांनीं मराठी साहित्यांत रूढ केलेला आहे.

काकांनीं व्यक्तिशः माझ्यावर उपकार केले—आणि म्हणून त्यांच्याबद्दल माझ्या मनांत आपलेपणा आहे, हें जसें मला तसेंच महाराष्ट्रांतल्या अनेक लोकांना वाटतें. गेल्या बारापंधरा वर्षांत सार्वजनिक जीवनामध्यें कोणत्या ना कोणत्या तऱ्हेनें ज्या ज्या प्रसिद्ध वा अप्रसिद्ध व्यक्ती डोकावल्या असतील, त्यांची दखलगिरी काकांनीं घेतली नाहीं असें कधींच झालें नाहीं. कोणतीहि पुण्यांतली सभा असो, हजर राहणाऱ्या लोकांची 'मे. बापूसाहेब जठार' तों 'श्री. (किंवा प्रो.) बापूराव पोंक्षे' येथपर्यंत यादी ही यावयाचीच. कोणताहि समारंभ असो, नाटक असो, खाजगी ट्रायल असो, 'बाबूराव श्रोत्री किंवा श्री. ओक

ह्यांनीं निमंत्रितांची व्यवस्था उत्कृष्टपणें ठेवली होती' हा मजकूर असावयाचाच. वडोद्याचे प्रो. चिं. वि. जोशी, प्रो. दांडेकर, नागपूरचे डॉ. पेंडसे किंवा प्रो. बेहरे हे पुण्यांत आले कीं, ' थोरामोठ्यांच्या हालचालीं 'त त्यांची वर्दी लागावयाचीच. डॉ. अण्णा नवले असो, प्रज्ञानेश्वर यति असो, राजभोज असो वा तात्याबा गायकवाड असो, जो जो माणूस आपापल्या मतीनें आणि शक्तीनें कांहीं ना कांहीं करीत असेल, त्यानें लिहून पाठविलेला मजकूर ' ज्ञानप्रकाश ' मध्यें हा यावयाचाच. कोणी नाटककार असो, कवि असो, लघुकथाकार असो, त्याच्या कृतीचा सत्कार काकांनीं सहानुभूतीनें केला नाहीं असें कधींहि व्हावयाचें नाहीं. कित्येक प्रसंगीं तर ह्या कामीं त्यांनीं अग्रलेखहि खर्च केलेले आहेत. काकांचें पत्र एका विशिष्ट राजकीय पक्षाचें असलें तरी, उत्तेजनाचें आणि सहानुभूतीचें जें अन्नछत्र काकांनीं उघडलें होतें. त्यामध्यें त्यांनीं कधींहि पक्षभेद वा पंक्तिप्रपंच केला नाहीं. राजकीय निवडणुकीच्या अगदीं प्राणघातक धामधुमींतहि प्रत्येक पक्षाचे उमेदवार प्रसिद्धीसाठीं आणि मदतीसाठीं काकांच्याकडेच धांव घेत. स्वतःच्या पक्षाच्या वर्तमानपत्रापेक्षां काकांचा 'ज्ञानप्रकाश' च त्यांना जवळचा वाटत असे. त्यामुळें कॉंग्रेस, हिंदुमहासभावाले, आंबेडकर-पंथीय, समाजसत्तावादी, सत्यशोधक, सनातनी, नवमतवादी अशा निरनिराळ्या पक्षांतील लोकांना काकांची संपादकीय कचेरी म्हणजे स्वतःच्या घरासारखी वाटे. आणि मौजेची गोष्ट अशी कीं, काका अमुक एका पक्षांतील माणसाला मदत करीत आहेत म्हणून दुसऱ्या पक्षांतील माणसाला काकांबद्दल बिलकुल राग येत नसे. उलट त्यामुळें त्यांचा काकांबद्दलचा आदर दुणावतच जाई.

गेल्या दीड तपांतल्या सर्व राजकीय, सामाजिक, वाङ्मयात्मक वा शैक्षणिक चळवळी आणि त्या चळवळींत प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष भाग घेणाऱ्या व्यक्ती ह्यांचा सहानुभूतिपूर्वक आणि उत्तेजनपूर्वक समाचार घेऊन काकांनीं महाराष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीला फारच मोठें साहाय्य केलें आहे. ह्या कामीं त्यांनीं कधींहि गय केली नाहीं किंवा आळस दाखविला नाहीं कीं दिरंगाई केली नाहीं. एवढेंच नव्हे तर त्या त्या व्यक्तींना त्या त्या वेळीं खाजगी पत्रें देखील न चुकतां लिहून त्यांचें त्यांनीं अभिनंदन केलेलें आहे. म्हणून आजच्या घटकेला काका हे ' **महाराष्ट्राचे आवडते काका** ' झालेले आहेत. आणि

'जगन्मित्र काका' म्हणून त्यांचा चोहोंकडे गौरव होत आहे. ह्या सर्व गोष्टींना एकच कारण म्हणजे काकांचा अत्यंत गोड स्वभाव होय. काकांच्या इतका गोड आणि मजेदार माणूस उभ्या महाराष्ट्रांत आढळणार नाहीं. केव्हांहि काकांच्याकडे जा, त्यांच्या चेहऱ्यावर हास्य हें चमकत असावयाचेंच. कांहीं विचारा, त्याला त्यांचें उत्तर 'होय !' हें ठरलेलें. दुसऱ्याच्या मनाला लागेल असा शब्द त्यांच्या तोंडून कधीं निघावयाचा नाहीं, अशी कृति त्यांच्या हातून कधीं व्हावयाची नाहीं. कोणीहि घरीं येवो, त्याच्याशीं मनमोकळेपणानें बोलल्याशिवाय काका राहावयाचे नाहींत. कसलीहि अडचण त्यांच्यापुढें मांडा—त्यांनीं त्यामधून वाट कशी काढावी हें चटकन् सुचविलें नाहीं असें व्हावयाचेंच नाहीं. कोणत्याहि गोष्टीचा काकांना कधीं आळस नाहीं कीं कंटाळा नाहीं. प्रत्येक गोष्टीबद्दल काकासाहेबांना जबरदस्त हौस ! किंबहुना दुसऱ्याच्या हौसेपेक्षां काकासाहेबांचीच हौस जास्त आणि त्यांनाच त्या कामाची जास्त जरूरी ! त्यामुळें प्रत्येकाला काका आपले खाजगी मित्र आहेत असें वाटे. प्रत्येकाला ते हवेसे असत. नुसता शाब्दिक सल्ला देऊन काका थांबत नसत, तर अनेक प्रसंगीं स्वतःचा कोणत्याहि तऱ्हेचा फायदा नसतांना स्वतःच्या पदराला खार लावून, स्वतःचा वेळ गमावून आणि पुष्कळशी पायपीट करून त्यांनीं अनेक व्यक्तींना मदत केलेली आहे. वृत्तीची ही लोकसंग्रहात्मकता, भाषणाचा हा गोडवेपणा आणि स्वभावाचें हें सौजन्य ह्या गुणांमुळें 'संपादक—काकासाहेब' ह्यांच्यापेक्षां 'काकासाहेब—व्यक्ति' हीच पुष्कळांना अतिशय थोर वाटेल ! आणि काकासाहेबांचें व्यक्तिमत्व आणि चारित्र्य इतकें श्रेष्ठ नसतें, तर त्यांचें संपादकत्व इतकें यशस्वी कधींहि होऊं शकलें नसतें.

मात्र लोकसंग्रह करतांना लोकाराधनेसाठीं काकांनीं आपलें विचारस्वातंत्र्य कधींहि गमावलें नाहीं. प्रत्येकाचें समाधान व्हावें म्हणून जो भेटेल त्याला खूष करण्यासाठीं काकासाहेबांनीं तोंडदेखली भाषा कधींच केली नाहीं. दुसऱ्याला न दुखवतां आपलीं स्वतःचीं मतें त्याच्या गळीं उतरवण्यांत आणि आपली छाप त्याच्यावर टाकण्यांत काकासाहेब फार कुशल आहेत. काकांचा स्वभाव आग्रही नसल्यानें त्यांच्या सूचनांचा स्वीकार करण्यास कोणाला यत्किंचितहि संकोच वाटत नाहीं. उलट कांहीं वेळानें त्या काकांच्या सूचना नसून आपल्याच डोक्यांतून निघालेल्या कल्पना आहेत असेंच प्रत्येकाला वाटूं

लागतें. काकासाहेबांची टीका करण्याची पद्धत फार बारकाव्याची आणि मर्मभेदी आहे, हें त्यांचे अग्रलेख ज्यांनीं बारकाईनें वाचले असतील त्यांना सांगायला नको. दुसऱ्याच्या जिव्हारीं लागेल असा एकच शब्द किंवा शब्द-सांप्रदाय अवतरण चिन्हांत ते वापरतील; पण त्यामुळें प्रतिपक्षी चीत झाल्या-शिवाय राहणार नाहीं. नुसत्या मथळ्यानेंच विरोधी माणसांना गारद करण्यांत त्यांचा हातखंडा आहे. त्यांच्या अग्रलेखाचे मथळे वाचा किंवा सभेच्या वृत्तांताला त्यांनीं दिलेले मथळे पाहा ! मथळ्यावरून स्वतः काकांचें त्या त्या बाबतींत काय मत असावें हें जाणणाराला चटकन् कळून येतें. काकांची वाणी जरी गोड असली, तरी त्यांच्या लेखणीची धार फार तिखट आहे ह्यांत शंका नाहीं. काका आज 'नेमस्त पक्षां'त असले आणि राजकीय दृष्ट्या ते घटनावादी असले तरी, त्यांची विचारसरणी काँग्रेसच्या राष्ट्रीय विचारसरणीशीं जास्त जुळणारी आहे. अर्थात् काँग्रेसचें धोरण एखादे वेळीं चुकत असलें तर त्यावर कडकपणें टीका करावयास ते कधींहि मागेंपुढें पाहणारे नाहींत. समाजसत्ता-वादाचें व्यावहारिक स्वरूप जरी सर्वस्वीं त्यांना मान्य नसलें तरी वैचारिक दृष्ट्या ते साम्यवादी असून भांडवलवाले आणि मजूर ह्यांच्या झगड्यांत मजुरांची बाज उचलण्यास ते कधींहि मागें राहणार नाहींत. म्हणूनच श्री. ना. म. जोशी किंवा श्री. शामराव परुळेकर ह्यांच्याबद्दल त्यांची सहानुभूतिहि पुष्कळशी वैचारिक आहे. सावरकरांची 'हिंदुमहासभा' त्यांना मान्य नसली तरी समतेच्या भूमिकेवर घडवून आणलेलें 'हिंदुसंघटन' त्यांना मान्य आहे. सावरकरांच्या 'मराठी शुद्धीकरणा'च्या चळवळीला त्यांच्याइतकें सक्रिय साहाय्य कोणींच केलें नसेल. सामाजिक आणि वाङ्मयीन बाबतींत तर ते कट्टे पुरोगामी आहेत. पुरोगामी विचारांचा त्यांच्याइतका पुरस्कार दुसऱ्या कोणत्याहि संपादकानें केलेला नसेल. फडके-खांडेकर ह्यांच्या प्रतिगामी विचारसरणीवर एवढ्याचसाठीं त्यांना प्रहार करावे लागले. नाहीं तर त्यांच्या वाङ्मयाबद्दल काकांना किती तरी आदर आहे.

काकासाहेबांचें वाचन आणि अवलोकन फारच मार्मिक असलें पाहिजे. ते केव्हां वाचतात आणि विचार करतात हें कळण्यास मार्ग नाहीं. कारण चोवीस तास त्यांच्याभोंवतीं माणसांचा गराडा पडलेला असतो. असा कोणताहि विषय नाहीं कीं दोनतीन तासांचे अवधींत त्यांनीं त्यावर एखादा उत्कृष्ट अग्रलेख

तयार केलेला नाहीं ! प्रत्येक लेखांत त्यांचा अभ्यास आणि व्यासंग दर्शविणारे भरपूर संदर्भ आणि उतारे भरलेले असावयाचेच. काकासाहेबांची लेखनशैली अत्यंत ओघवती, प्रसादपूर्ण आणि प्रभावी आहे. त्यांचें सर्व स्फुट लेखन एकत्र झालें म्हणजे मग त्यांच्या शैलीचें सामर्थ्य प्रत्यक्षपणें पाहावयास मिळेल. त्यांच्या लिहिण्यांत एक प्रकारचा जिवंतपणा आणि जिव्हाळा आहे; ह्याचें कारण आपल्या कचेरींतल्या खुर्चीवर बसून लेख लिहिणारे ते संपादक नाहींत, तर आपल्याभोंवतीं चाललेल्या सामाजिक जीवनांत प्रत्यक्षपणें भाग घेऊन, तें जीवन जगून—अभ्यासून मग लेखन करणारे ते संपादक आहेत. गेल्या दीड तपांत महाराष्ट्रांतली अशी एकहि चळवळ झालेली नसेल, कीं जिच्यांत काकासाहेबांनीं प्रामुख्यानें नसला तरी अंशतः भाग घेतलेला नसेल ! अनेक चळवळींचीं तर मागें राहून त्यांनीं सूत्रें हलविलेलीं आहेत. अनेक भानगडींची चर्चा आणि निकाल खुद्द त्यांच्या घरीं व कचेरींत लागलेला असेल ! जीवनाकडे पहाण्याची त्यांची वृत्ति फारच व्यापक आहे ! बोलपट असो, नाटक असो, सहभोजन असो, मिश्रविवाह असो, हरिजन-चळवळ असो वा सर्वपक्षीय परिषद् असो, काकासाहेबांना ज्यांत गति नाहीं असा एकहि विषय नाहीं ! काकासाहेबांना ज्याबद्दल जिज्ञासा नाहीं अशी एकहि बाब नाहीं ! काकासाहेब सर्वांत आहेत आणि कशांतहि नाहींत ! एखाद्या माणसाची एखादी गोष्ट काकांना आवडत नसली तर तेवढ्यामुळें ते त्या माणसाचा तिरस्कार करीत नसत. ज्याच्यामध्यें जें आवडण्यासारखें आहे त्याचाच आस्वाद घेण्याची आणि त्याचा गौरव करण्याची त्यांची प्रवृत्ति ! त्यामुळें प्रत्येक माणसालाहि असेंच वाटतें कीं काकांना आपली अमुक एक गोष्ट माहीत नाहीं; एवढेंच फक्त त्यांना माहीत आहे ! औदार्य व समजूतदारपणा हा काकांच्या रसिकतेचा आत्मा आहे. काकासाहेब कृतीनें किंवा आकृतीनें जरी फारसे रसिक नसले, तरी त्यांच्या वृत्तींत आणि स्वभावांत रसिकपणा नुसता ओतप्रोत भरलेला आहे. फारसे बोलत नसले तरी त्यांना सगळें ठाऊक आहे; त्यांना सगळें कळतें आणि ते सगळें ओळखून आहेत ! जीवनाबद्दलची त्यांची ही जाणीव असल्यानें त्यांच्या लेखनशैलींत जिवंतपणा आला आहे ! आणि त्यामुळें गेल्या दीड तपांत 'ज्ञानप्रकाश' हा महाराष्ट्रीय जीवनाचें एक प्रभावी व्यासपीठ होऊन बसलेला आहे. ह्या काळांतील महाराष्ट्राचा राजकीय, सामाजिक वा वाङ्मयात्मक

इतिहास जर कोणाला लिहावयाचा असेल तर त्याला काकासाहेबांच्या 'ज्ञानप्रकाश'च्याच फायली चाळव्या लागतील ! पुरोगामी महाराष्ट्रीय जीविनाशीं काका समरस होऊं शकले, म्हणूनच 'ज्ञानप्रकाश' हें तरुणांचें पत्र झालें, आणि 'ब्रह्मवृंदाच्या सर्वारिष्टशांत्यर्थ चाललेल्या जपजाप्याच्या' बातम्या छापण्याच्या धोरणामुळेंच केसरी हें कुचकामी म्हाताऱ्यांचें पत्र होऊन बसलें !

काकासाहेबांना स्वतःची स्तुति आवडत नाहीं–त्यांना स्वतःची प्रसिद्धि आवडत नाहीं—स्वतः अंधारांत राहून दुसऱ्यावर प्रकाश टाकणें हें त्यांच्या जीवितार्चें ध्येय आहे. त्यांची राहणी अगदीं साधी आणि वागणें अगदीं सरळ आहे. केंव्हांहि त्यांच्या घरीं जा. बाहेरून फाटकांतून हांक मारा. 'काकासाहेब आहेत काय ?' त्यांच्या खोलीचें दार लोटलेलें असेल. त्यांची मुलगी किंवा मुलगा धांवत येईल आणि क्षणानें काकासाहेबांची मूर्ति हंसत हंसत दरवाजांत प्रकट होईल. खोलींत गेलें तर सभोंवार पुस्तकांचे, वृत्तपत्रांचे ढीग अस्ताव्यस्त पडलेले आहेत–निळे सरकारी रिपोर्ट आहेत, ताज्या वर्तमानपत्रांचे गठ्ठे पडलेले आहेत, एक आरामखुर्ची आहे आणि एक सतरंजी आहे. काकासाहेब अरामखुर्ची किंवा सतरंजीवर बसून मांडीवर चतकोर कागदावर मिळेल त्या लेखणीनें किंवा फाउन्टन पेननें अग्रलेख लिहीत आहेत व मधून मधन प्रुफें तपाशीत आहेत;–वर्षानुवर्षें हा आपला काकासाहेबांचा खाक्या चाललेला आहे. दुपारीं तास दीड तासांत त्यांचें लेखन पुरें झालें म्हणजे मग त्यांचा लेखणीला हात कधींहि लागावयाचा नाहीं. त्यानंतर मग ते फिरून आपल्या मित्रमंडळींच्या गराड्यांत सामील झालेच म्हणून समजा. आज श्री. रामभाऊ तटणीस आले, त्यांच्याबरोबर जा. उद्यां भाऊसाहेब गडकरी म्हणताहेत शिकारीला दौंडच्या रानांत चला, काकासाहेब चालले त्यांच्याबरोबर ! परवां अत्रे म्हणाले, चला मुंबईच्या चित्रमंदिराच्या उद्‌घाटनाला; काका चालले मुंबईला ! संध्याकाळीं मात्र काकांचा मुक्काम श्री. शामराव भोळे ह्यांच्या मिनर्व्हा थिएटरवर. त्या ठिकाणीं पुण्यांतील निरनिराळ्या व्यक्ती येऊन काकासाहेबांना हजेरी देऊन गेल्या नाहींत असें कधीं व्हावयाचें नाहीं. साऱ्या दिवसांतल्या घडामोडींची आणि राजकारणाची चर्चा तेथें चालावयाची. इंग्लंडमध्यें जॉन्सनच्या वेळीं प्रसिद्धीस आलेल्या 'कॉफी-हाऊस'प्रमाणें 'मिनर्व्हा'ला काकांच्यामुळें

वाङ्मयात्मक स्वरूप आलेलें होतें. रात्रीं ११॥ वाजेपर्यंत हा कार्यक्रम चालावयाचा. नंतर फिरून मध्यरात्रीच्या सुमारास 'ज्ञानप्रकाश'च्या छापखान्यांत चक्कर मारून एखादी बातमी असेल तर शेवटच्या घटकेला ती अंकांत घालावयाची, आणि मग घरीं जाऊन झोंपावयाचें. काकांची प्रकृति जागरणामुळें मध्यंतरीं पुष्कळच खालावलेली होती. सामान्यतः ते संध्याकाळीं जेवत नाहींत. चिकणी सुपारी एवढें एकच त्यांना व्यसन ! जेवण अगदीं साधें. त्यामुळें त्यांना जेवावयाला बोलावल्यानें कोणलाहिं अडचण पडत नाहीं किंवा संकोच वाटत नाहीं.

दीड तपाच्या दीर्घ कालांत महाराष्ट्राचीं जीवनसूत्रें अंधारांत राहून हलवणारी, पुण्यामधलि अनेक संस्थांच्या, चळवळींच्या आणि व्यक्तींच्या जीवनामधील महत्त्वाच्या घटना घडवून आणणारी ही प्रभावशाली मूर्ति म्हणजे डोक्यावर काळी टोपी, अंगांत पिवळसर लांब कोट, धोतर, पायांत वहाणा आणि हातांत छत्री घेऊन न बोलतां गंभीरपणें चालणारी एक व्यक्ति आहे असें सांगितलें तर पुष्कळांना खरेंहि वाटणार नाहीं. काकासाहेबांच्या ह्या नम्र व विनयशील स्वभावामुळें 'काकासाहेब लिमये' हें नांव 'काकासाहेब लिमये' ह्या व्यक्तीपेक्षां महाराष्ट्राला जास्त माहिती आहे. 'वृत्तपत्र हें व्यापक सामाजिक जीवनाशीं जितकें समरस होईल तितकें तें जास्त लोकप्रिय आणि प्रभावी होईल,' हें काकासाहेबांच्या संपादनाचें रहस्य आहे. ह्या त्यांच्या धोरणामुळें त्यांनीं गेलीं पंधरा वर्षें 'ज्ञानप्रकाश' हें पत्र अत्यंत लोकप्रिय करून वृत्तपत्रव्यवसायाला नवीन दिशा दाखविलेली आहे. महाराष्ट्रांतील बहुजनसमाजाला प्रिय असलेल्या वृत्तपत्रपरंपरेचे कै. अच्युतराव कोल्हटकर हे जनक असले तर श्री. काका लिमये हे त्या परंपरेचे पितृतुल्य प्रेमानें संगोपन आणि संवर्धन करणारे 'काका' आहेत हें कोणीहि मान्य करील !

## महाराष्ट्राचे शैलीकार साहित्यिक—माटे !

माट्यांची आणि माझी गेल्या अठरा वर्षांची ओळख आहे. म्हणजे माटे मला ओळखूं लागल्यापासून अठरा अधिक वर्षे तरीं झालेलीं आहेत. पण मी त्यांना मात्र गेलीं तीस वर्षें पहात आहें आणि ओळखत आहें. पुण्यांत नानाच्या हौदापाशीं जेव्हां ' भावे स्कूल ' होतें तेव्हां त्या शाळेंत मी इंग्रजी चवथीपासून तों सातवीपर्यंत चार वर्षें विद्यार्थी होतों.. आमच्या शाळेसमोर न्यू इंग्लिश स्कूलची भव्य इमारत होती, आणि अजूनहि आहे. भव्य म्हणावयाचें कारण कीं, त्या वेळीं तरी पुण्यांत एवढी मोठी आणि टोलेजंग अशी शाळेची दुसरी इमारत नव्हती. एका जुनाट रहात्या घरांत कसेबसे दिवस कंठीत असलेल्या गरीब ' भावे स्कूल 'मधील आम्हां विद्यार्थ्यांना ' न्यू इंग्लिश स्कूल 'च्या त्या इमारतीचा आणि इमारतींत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा भारी हेवा वाटायचा. सदर शाळेची इमारत बांधणाऱ्या कंत्राटदारानें चुन्यामध्यें वाळू कमी घातली असल्यामुळें ही इमारत कधीं कोसळून पडेल याचा नेम नाहीं अशी एक ' गटारगप्प ' आम्ही त्या वेळीं उठवून मत्सरानें व्याकुळ झालेल्या आमच्या मनावर फुंकर घालीत होतों. त्या शिक्षकांबद्दल मात्र आम्हांला फार भय आणि आदर वाटत असे. कारण ' फर्ग्युसन कॉलेज 'मधील कांहीं प्रोफेसर अधूनमधून येऊन त्या शाळेंत शिकवीत असत. आणि म्हणून विद्वान् प्रोफेसरांच्या संगतीनें त्या शाळेमधील शिक्षकहि फार विद्वान् झाले होते असें आम्हांला कोणीं तरी त्या वेळीं सांगितलें होतें. माटे हे त्या वेळीं त्या शाळेंत शिक्षक होते. तेव्हां ते ' विद्वान् ' होते कीं नाहीं हें आम्हांला ठाऊक नव्हतें. पण मधल्या सुटींत त्या शाळेंतले कांहीं चावट विद्यार्थी आमची शाळा 'बघण्यासाठीं ' म्हणून जेव्हां आंत येत, तेव्हां त्यांच्या तोंडून माटे मास्तरांचें नांव पुष्कळ वेळां आम्हीं ऐकत असूं. आणि माटे मास्तरांचा त्यांच्या तोंडून होणारा हा उल्लेख आदरार्थी होता हें मात्र मला नक्की आठवतें.

पुढें योगायोग असा आला कीं, आमच्या सासवडचे एक गोखले म्हणून वकील होते. त्यांनीं पुण्याच्या सदाशिव पेठेंत एक टुमदारसें दुमजली घर बांधलें. या घराच्या वरच्या मजल्यावर माटे हे बिऱ्हाडकरू म्हणून रहावयाला आले. गोखले वकिलांचा मुलगा शंकर हा माझ्या बरोबरीचा. आम्ही दोघे सासवडच्या इंग्रजी शाळेंत एकाच वेळीं नि एकाच वर्गांत शिकत होतों. पुण्याला आल्यावर मी भावे स्कूलमध्यें गेलों आणि शंकर न्यू इंग्लिशमध्यें गेला. कारण, त्याचे वडील टिळकांचे आणि गोखल्यांचे अभिमानी होते; आणि फिरून त्या शाळेचे माजी विद्यार्थीहि होते. ते स्वतः सासवडला रहात आणि त्यांनीं शंकरला मात्र पुण्याला अभ्यासाला ठेवलें होतें. ते स्वतः शिस्तीचे मोठे भोक्ते होते. तेव्हां पुण्यांत एकट्या रहाणाऱ्या आपल्या पोराला चांगली जरब बसावी म्हणूनच कीं काय त्या घराच्या दुसऱ्या मजल्यावर माटे मास्तरांचें बिऱ्हाड आणून ठेवण्याची त्यांनीं योजना केलेली होती! सुट्टीच्या दिवशीं पुण्याला आलेलीं आम्ही सासवडचीं कांहीं मुलें शंकरच्या घरांत जमत असूं. दोनचार तास आरडाओरड करावी, दंगा करावा, आणि गप्पा मारून चालते व्हावें, हा त्या ठिकाणीं एकत्र जमण्याचा आमचा हेतु असे. कारण, शंकरच्या बिऱ्हाडांत वडील माणूस कोणीच नसे. आम्हांला पाहिजे होती तसली मोकळीक शंकरच्या त्या घरांत आम्हांला कधींच मिळूं शकली नाहीं. जरा आम्ही आवाज केला किंवा मोठ्यानें बोललों कीं शंकर दांत खाऊन आमच्यावर डोळे वटारायचा, 'वरती माटे मास्तर आहेत, तुम्हांला कळत कसं नाहीं!' त्याबरोबर वर्गांत मास्तर शिरावेत तसे आम्ही गप्प बसावयाचे. माटे मास्तरांच्यावर त्या वेळीं मनांतल्या मनांत आम्ही असे चिडायचे कीं कांहीं विचारूं नका! मी शंकरला पुष्कळ वेळां रागावून म्हणायचा देखील कीं शाळेंतल्या मास्तरांचा सासुरवास हा घरांत काय म्हणून! तेव्हां शंकर घाबरल्यासारखा चेहरा करून पुटपुटायचा कीं, कां कोण जाणें, माटे मास्तरांचें मला भय वाटतें–मग ते शाळेंत असोत, रस्त्यावर दिसोत कीं घरांत बसोत!'

अशा तऱ्हेनें सुट्टीच्या दिवशीं आम्हां मुलांच्या मौजेवर माटे मास्तरांच्या भयामुळें बहुधा विरजण पडत असल्यामुळें, आमचें माटे मास्तरांच्याबद्दलचें 'मत' त्या वेळीं एकदमच वाईट होऊन बसलें! शंकरच्या मनांत माटे मास्तरांच्याबद्दल जो एक भयाचा 'गंड' होऊन बसला होता, तो माटे मास्तरांचें शिष्यत्व न पतकरतां शंकरच्या सोबतीनें आमच्याहि मनांत निर्माण होऊन बसला.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ

अनुक्रम ........५३५५ दि: ......
क्रमांक ........१६६३ नों: दि: २१०

गंमतीची गोष्ट अशी कीं, हें सर्व होत असतांना पुष्कळ दिवस मास्त्यांना प्रत्यक्ष असें मीं मुळींच पाहिलें नव्हतें. एक दिवस शंकर आणि मी रस्त्यानें जात असतांना समोरून माटे मास्तर येतांना त्यानें पाहिलें. वाघाचा वास येतांच दावें तोडून गाय जशी एकदम उसळी मारते, तशा तऱ्हेचा चेहरा करून शंकर शेजारच्या बोळांत सटकला! मी त्याचा कोट ओढून म्हणालों, 'अरे काय रे !' तो मागें तोंड न वळवतां म्हणाला, 'माटे मास्तर !' मी दचकून एकदम वळलों, तोंच माटे माझ्यापासून चार हातांच्या अंतरावरून चालले होते. त्यांचा त्या वेळचा तो चेहरा आणि तें चालणें अजून मी विसरलों नाहीं. त्या वेळीं त्यांचें वय मला वाटतें सत्तावीस किंवा अठ्ठावीस वर्षांचें असावें. तथापि, त्यांच्या मिशांची ढब आज जशी आहे तशीच त्या वेळींहि होती. निदान माझा समज तरी आज तसा आहे. त्यांचा चेहरा मला गंभीर, करारी आणि तेजस्वी असा वाटला. त्यांच्या चालण्यांत वेग होता आणि तेजहि होतें. शंकराच्या भित्रेपणामुळें ते जितके 'भयंकर' असावेत अशी जी मीं माझी समजत करून घेतली होती, ती त्यांना प्रत्यक्ष बघून मात्र पुष्कळच कमी झाली. भय कमी झालें अन् आदर वाढला. कांहीं तरी हें निराळेंच प्रकरण आहे असें मनाला आंतून वाटलें.

त्यानंतर कांहीं वर्षांनीं मी कॉलेजांत गेलों. या सुमारास गडकऱ्यांची आणि माझी ओळख झाली, आणि गडकऱ्यांच्या साहित्याचा आणि संगतीचा माझ्या संस्कारक्षम मनावर अतिशयच परिणाम झाला. गडकऱ्यांचें काव्य आणि लिखाण त्या वेळीं ऐन भराला आलेलें होतें. त्यांच्या तेजस्वी प्रतिभेच्या नवनवीन उन्मेषानें महाराष्ट्राचे डोळे त्या वेळीं अगदीं दिपून गेले होते. त्यांच्या कविता, त्यांचे विनोदी लेख आणि त्यांचीं त्या वेळीं रंगभूमीवर आलेलीं दोन नाटकें यांचा महाराष्ट्रांत एवढा बोलबाला झाला होता कीं, त्यांचें वाङ्मय अभिमानानें डोक्यावर झेलणारा तरुणांचा एक प्रभावी पक्ष निर्माण होऊं लागला होता. मी अर्थातच या पक्षामध्यें होतों. गडकऱ्यांचे विरुद्ध–त्यांच्या वाङ्मयाच्या विरुद्ध–त्यांनीं लिहिलेल्या एका शब्दाच्या विरुद्ध कोणी 'ब्र' म्हणून बोललें, किंवा 'ब्र' म्हणून लिहिलें तरी आमच्या तळपायाची आग मस्तकाला पोहोंचल्यावांचून रहात नसे ! गडकऱ्यांविषयींचा आमचा हा अभिमान अगदीं आंधळा असला तरी तो निरर्थक होता असें कांहीं नाहीं. गडकरी हे आधुनिक कवींचे कुलगुरु केशवसुत यांचे 'सच्चे चेले' असे

ग्रंथ संग्रहालय ठाणें
दा. क्र. ७१६७

त्यानें गडकऱ्यांच्या काव्याबरोवर आधुनिक कवींच्या काव्याचेही आम्ही विलक्षण अभिमानी बनलों. आधुनिक काव्यांतील प्रतिभा, त्या काव्यांचें सौंदर्य, त्या काव्यांचें सामर्थ्य, त्या काव्यांत प्रकट होणारा कवींचा दुर्दम्य आशावाद आणि प्रखर सामाजिक जाणीव या गुणांमुळें प्राचीन काव्यापेक्षां आधुनिक काव्य किती तरी पटीनें प्रभावी आणि प्रेरक आहे, असें आम्हांला वाटूं लागलें! आधुनिक काव्याची तरफदारी करण्यासाठीं पुष्कळसे 'वीर जसे' वीरश्रीनें त्या वेळीं पुढें आले, तसें आधुनिक कवींचें निष्कारण माजलेलें ' स्तोम ' कमी करण्यासाठीं कांहीं जुन्याचे अभिमानी टीकाकारहि लेखण्या परजून पुढें सरसावले. योगायोग असा कीं माटे हे त्यांपैकींच एक होते. पुण्याला त्या वेळीं कृष्णाजी नारायण आठले यांचें ' केरळकोकिळ ' मासिक अच्युतराव भट चालवीत असें मला आठवतें. या ' केरळकोकिळ ' मासिकामध्यें माटे यांनीं एक लेखमाला सुरू केली. या लेखमालेचें नांव ' अडाणी कवीचा अधिकारातिक्रम ' असें होतें. माटे हे नुसतेच मास्तर नसून लेखकहि आहेत असें त्या वेळीं मला प्रथम कळून आलें. ' लेखक ' म्हटला कीं आदर वाढला अशी त्या वेळीं माझ्या मनाची स्थिति होती. तेव्हां माटे यांच्याबद्दल पूर्वीं जो किंचित् भययुक्त आदर वाटत होता त्यांतलि भय जाऊन त्यांच्याबद्दल थोडासा आपलेपणा वाटूं लागला. माटे यांनीं लिहिलेला तो पहिलाच लेख होता कीं नाहीं हें मला माहीत नाहीं, पण मी त्यांचें मुद्रित स्वरूपांत पहिल्यानें वाचलेलें असें तसें लिखाण होतें. तथापि, मास्यांची लेखमाला वाचून मात्र माझें डोकें अगदींच भडकून गेलें आणि माटे हे आधुनिक कवींचे एक शत्रु असावेत अशी त्या वेळीं माझी प्रामाणिक समजूत झाली. सुरुवातीला मास्यांच्याबद्दल आमचें जें ' वाईट मत ' झालें होतें तें या वेळीं माझ्या साहाय्याला धांवून आलें. आणि खरेंच हा कोणी तरी वाईटच माणूस आहे अशी मनाशीं मीं खूणगांठ बांधून ठेविली. ' अडाणी कवीचा अधिकारातिक्रम ' या मास्यांच्या लेखमालेचे एकंदर किती लेखांक तयार झाले, ते सगळेच्या सगळे प्रसिद्ध झाले किंवा नाहीं, हें कांहीं मला आज आठवत नाहीं कारण ' केरळकोकिळ ' मासिक हें कोकिळाच्या आवाजाप्रमाणें अधूनमधून कधीं तरी प्रकट होत असे, मास्यांचे तीन लेखांक वाचलेले मला अंधुक अंधुक आठवतात. मास्यांची लिहिण्याची पद्धत त्या वेळीं अगदींच बाल्यावस्थेंत होती हें मात्र नक्की आठवतें. हा लेखक कांहीं

वर्षांनंतर महाराष्ट्रांतला एक पट्टीचा शैलीकार लेखक होईल असें भविष्य त्यांच्या त्या लिखाणावरून एखादा ज्योतिषी देखील करूं शकला नसता ! माट्यांनीं या लेखनमालेमध्यें पुष्कळशा आधुनिक कवींवर अडाणीपणाचा आणि अधिकारातिक्रमाचा आरोप केला होता. हा आरोप सिद्ध करतांना त्यांनीं बऱ्याचशा आधुनिक काव्यांतील कांहीं त्रोटक उतारे दिलेले मला आठवतात. आधुनिक कवींचें माट्यांना नेमकें काय आवडलें असावें याचा कांहीं एक बोध माट्यांच्या त्या लेखमालेवरून होण्यासारखा नव्हता. आधुनिक कवितेचें केवळ दोषदर्शन करण्यासाठींच माट्यांनीं ती लेखमाला लिहिली होती एवढा मात्र माझा ग्रह झाला. मीं ती लेखमाला गडकऱ्यांच्या निदर्शनाला आणली. त्यांनीं ती आधीं थोडीशी वाचलीच होती. मी गडकऱ्यांना माट्यांच्याबद्दल विचारतांच किंचित् स्मित करून, ' शिष्ट आहे लेकाचा ! ' असें ते पुटपुटले आणि त्यांनीं तो विषय तसाच तोडून टाकला. माट्यांच्या त्या लेखमालेवरून त्यांच्या लेखनगुणाचें किंवा मर्मग्राही बुद्धिमत्तेचें मोजमाप करणें चुकीचें होईल. तथापि माट्यांच्या मनाची ठेवण मात्र त्या लेखामध्यें मला चांगली उमटलेली दिसून आली. ही ठेवण आतां तर त्यांच्या स्वभावाचें आणि साहित्याचें एक ठळक वैशिष्ट्य होऊन बसलेलें आहे. ही ठेवण अशी कीं, माटे हे जुन्याचे अभिमानी आहेत असें नाहीं; तथापि नव्याचा फारच उदो उदो होऊं लागला तर मात्र नव्याचें स्तोम थांबविण्यापुरता ते जुन्याचा कैवार घ्यावयाला कधींच मागेंपुढें पहावयाचे नाहींत ! नव्याचे ते शत्रु नाहींत. नव्याचा त्यांना हव्यास आहे; पण नव्याची फाजील टुरटुर चालवून देण्याची मात्र त्यांच्या मनाची तयारी नाहीं. नव्याचा त्यांना हव्यास आहे असें मी कां म्हणतों ? तर आधुनिक कवितेला नांवें ठेवणारे हेच माटे त्या वेळीं कवितालेखनाचे अल्पस्वल्प प्रयोग करून पहात होते. त्यांच्या कविता फारशा कांहीं प्रसिद्ध झालेल्या मला आठवत नाहींत. 'अभिनव काव्यमाले'चा जो एक भाग त्या वेळीं प्रसिद्ध झाला होता, त्यामधील त्यांच्या दोनतीन कविता मीं वाचल्या होत्या आणि एक कविता ' चित्रमय जगत् ' मध्यें प्रसिद्ध झालेली माझ्या अवलोकनांत होती. माटे हे कविता देखील लिहितात हें ऐकून मला पुष्कळच आश्चर्य वाटलें. कारण माटे यांची मुद्रा पाहून ते काय करूं शकतील याविषयीं मीं जे ठोकताळे स्वतःशीं बसविले होते, त्याच्याशीं शिक्षक आणि

टीकाकार या त्यांच्या दोन भूमिका सुसंगत आहेत असें मला वाटत होतें. पण ते कवि आहेत हें ऐकण्याची माझी तयारी नव्हती. माटे हे 'आधुनिक कवितेचे शत्रु' आहेत अशी जी त्यांच्याविषयीं आम्हीं कल्पना करून घेतली होती त्यामुळें त्यांच्या कवितेमधला कसल्याहि तऱ्हेचा चांगुलपणा दिसण्यापलीकडच्या स्थितींत आम्ही होतों; इतकीं त्यांच्याबद्दल आमचीं मतें त्या वेळीं कलुषित झालीं होतीं. तथापि, अगदीं निःपक्षपाती दृष्टीनें माटयांच्या त्या कवितांचा विचार करायचें आतां ठरविलें तरी त्यांच्या कवितेमध्यें कांहीं विशेष प्रसाद किंवा गुण होता असें मला वाटत नाहीं. 'ऊठ अहिल्ये, प्रभात झाली राम वनीं आला!' ही त्यांच्या भूपाळीची एक ओळ अजूनही माझ्या लक्षांत राहिलेली आहे. ती अर्थात्च गोड आहे. ती मला आवडते. त्या भूपाळीची रचना सोपी होती इतकेंही मला आठवतें. तथापि त्यांच्या त्या वेळच्या टीकालेखाप्रमाणें त्यांचें काव्यलेखनही अगदींच सामान्य होतें यांत शंका नाहीं. ही जाणीव त्यांना झाल्यामुळेंच कीं काय पुढें आयुष्यांत त्यांनीं काव्य लिहिण्याचें सोडून दिलें. पद्यावरचा त्यांचा विश्वास अजिबात उडून गेला आणि काव्यमय गद्याचे ते कट्टे पुरस्कर्ते बनले.

आधुनिक कवींवरील माटयांच्या टीका-लेखाबद्दल बोलतांना गडकऱ्यांनीं त्यांच्याबद्दल जे उद्‌गार काढले असें मीं आतांच सांगितलें, त्याचा खरेपणा खुद्द गडकऱ्यांच्या बाबतींतच प्रत्ययाला येण्यासारखा एक प्रसंग माटे यांच्या एका कवितेमुळें आला. गडकरी आणि माटे न्यू इंग्लिश स्कूलमध्यें एकाच वेळीं शिक्षक होते. गडकरी अर्थात् फार थोडा वेळ शिक्षक म्हणून राहिले. त्या थोडक्या काळांत गडकऱ्यांचे आणि माटयांचे संबंध काय असावेत याची मला माहिती नाहीं आणि कल्पनाहि नाहीं. तथापि हे संबंध फारसे सलगीचे नसावेत अशी माझी अटकळ आहे. माटे कुर्रेबाज आणि अबोल; गडकरी लहरी आणि फटकळ. तेव्हां दोघांचें फारसें जमण्यासारखें नव्हतें. शाळा सोडल्यानंतर गडकऱ्यांची लेखनकीर्ति एकाद्या वावडीप्रमाणें सरसर चढत वर गेली. माटयांना वाङ्मयांत त्या वेळीं कांहींच नांव नव्हतें; किंबहुना ते वाङ्मयांत कोणीच नव्हते. असें असतां गडकऱ्यांच्या एका काव्याला उत्तर देण्याच्या मिषानें, त्यांच्या वैयक्तिक जीवनावर शिंतोडे उडविण्याचें माटयांना कांहींच कारण नव्हतें. तो प्रसंग असा. गडकरी हे स्वभावानें अत्यंत देवभोळे आणि भाविक होते. महादेवाची आणि पांडुरंगाची

अशा दोन तसविरी नेहमीं त्यांच्या उशागत असत. तुकारामाची आणि नामदेवाची गाथा पुष्कळदां त्यांच्या हातालगत असे. ते एकादशी करीत असल्याचें मला माहीत आहे. कांहीं एकादशीच्या दिवशीं निदान एक तरी अभंग रचण्याचा त्यांचा नियम होता. असे रचलेले पांचपंचवीस अभंग एकत्रित करून त्यांनीं "अनामिकाचे अभंग' या मथळ्याखालीं ते 'चित्रमय जगत्' मध्यें प्रसिद्ध केलेले होते. दर अभंगाच्या शेवटच्या ओळीची सुरुवात 'राम म्हणे' अशी होती. पण 'राम' हा शब्द प्रत्यक्षपणें तेथें न छापतां त्या ऐवजीं दोन फुल्या छापलेल्या होत्या. त्याविषयीं गडकऱ्यांनीं आरंभीं मोठ्या विनम्र भावनेनें खुलासा केलेला होता, कीं ज्या अभंगांची रचना तुकारामनामदेवांसारख्या संत महात्म्यांनीं केली, त्यांच्यानंतर अभंगरचना करण्याची आपली खरोखरच पात्रता नाहीं. तेव्हां या ठिकाणीं नांवाचा नसता अभिमान बाळगण्याचें काय कारण आहे? गडकऱ्यांचे हे अभंग इतके रसाळ आणि गोड आहेत कीं, तुकारामनामदेवांच्या अभंगांत ते कोणीं घुसडून दिले तर एकाद्या पांगारकराला किंवा आजगांवकराला त्यांचा पत्ता देखील लागावयाचा नाहीं. गडकऱ्यांचा मत्सर किंवा हेवादावा बाळगणाऱ्यांखेरीज करून दुसऱ्या कोणाच्याहि पोटांत गडकऱ्यांचे ते अभंग वाचून दुखण्याचें कांहींच कारण नव्हतें. पण माटे मात्र गडकऱ्यांवर खवळून उठले ! तुकाराम महाराजांवर एकादा सालोमालो किंवा मंबाजी देखील इतका उसळून उठला नसेल. माट्यांनीं अभंगांमधूनच गडकऱ्यांवर हल्ला केला! माट्यांचे हे अभंग माझ्या आतां स्मरणांत नाहींत. पण गडकऱ्यांसारख्या 'पतित' माणसानें अभंग रचण्याच्या भानगडींत पडूं नये; कुठें ते पूर्वीचे संत आणि कोठें हा क्षुद्र व्यसनी माणूस अशा अर्थाचा कांहीं तरी भाग त्या अभंगांमध्यें होता. माट्यांचे हे अभंग गडकऱ्यांच्या अंतःकरणाला फार झोंबले. त्यांच्या कोमल हृदयाला ती गोष्ट पुष्कळ वेळ लागून राहिली. एवढेंच नव्हे तर त्याविषयीं बोलतांना गडकऱ्यांचे डोळे क्षणभर ओले झालेले मीं पाहिले आहेत. याच व्याकुळ मनोवृत्तीमधून "शहाजहाना आधीं मेली ख्यालीखुशाली ती त्याची !' या त्यांच्या कवितेचा उद्भव झाला होता असें मला वाटतें. गडकऱ्यांच्या 'व्यसना'ची किंवा 'पतित' पणाची माटे यांची माहिती निव्वळ ऐकीव आणि अतिशयोक्त होती. आणि गडकऱ्यांच्या लोकोत्तर प्रतिभेचें मापन करण्याच्या दृष्टीनें या माहितीचा उपयोग करणें ही गोष्ट गैरलागू होती. तथापि, ज्या मनोवृत्तीच्या पोटीं

माटे यांची ही टीका जन्माला आली ती मनोवृत्ति हा माटे यांचा एक महत्त्वाचा स्वभावविशेष आहे. माटे यांना स्वतःच्या चारित्र्याचा आणि सद्वर्तनाचा अभिमान आहे. अर्थात् त्यांच्या चारित्र्याच्या आणि सद्वर्तनाच्या कल्पना 'विनायक कोंडदेव ओकां' नीं रचलेल्या शालेय पुस्तकांतील धड्यामधल्या कल्पनांना धरून आहेत ती गोष्ट निराळी. तथापि, माटे यांना हा जो कांहीं अभिमान वाटतो तो योग्यच आहे; त्यांत दोष काढण्यासारखें कांहींहि नाहीं. त्यामुळें त्यांच्याशीं वैयक्तिक संबंध येणारांचा त्यांच्याबद्दलचा आदर खात्रीनें दुणावेल ! पण शुद्ध चारित्र्याच्या या अभिमानाला नुसत्या घमेंडीचें स्वरूप आलेलें इतरांना दिसतें यांत शंका नाहीं. आणि या घमेंडीच्या जोरावरच ते अधून-मधून इतर लेखकांवर गुरकावून त्यांच्याशीं दमदाटी करतांना दिसतात हें मात्र खरें. गडकऱ्यांवर माटे यांनीं अभंगांतून जी निर्दय टीका केली ती माटे यांच्या हातून एक अत्यंत वाईट गोष्ट घडली असें मला राहून राहून वाटतें. माटे यांना त्याबद्दल काय वाटत असेल हें कांहीं मला ठाऊक नाहीं. वास्तविक गडकऱ्यांच्या वाङ्मयाबद्दल माटे यांना अत्यंत आदर वाटतो, गडकऱ्यांची योग्यता त्यांनीं पुरेपूर ओळखलेली आहे, गडकऱ्यांबद्दल बोलतांना ते आतां इतक्या जळजळीत जिव्हाळ्यानें बोलत असतात कीं, ऐकणाराला तो जिव्हाळा जाणवल्यावांचून रहात नाहीं. हें मला स्वतःला माहीत आहे. तथापि, 'अनामिकाच्या अभंगा' वर माट्यांनीं जी टीका केली ती करावयाला नको होती हें माझें मत मात्र अजूनही कायमच आहे.

याच सुमारास माटे यांनीं एक नाटकही लिहिलेलें होतें आणि तें 'बसविण्या' साठीं 'ललितकलादर्श' नाटक मंडळीचे केशवराव भोसले यांच्याकडे गेलेहि होते असें आम्हीं त्या वेळीं ऐकलें. त्या नाटकाचें नांव 'केवळ देशासाठीं हाच खरा प्रेमसंन्यास' असें होतें असें मला आठवतें. माट्यांच्या नाटकाचें हें मालगाडीसारखें लांबलचक नांव फिरून फिरून उच्चारीत आम्ही पोट धरधरून किती तरी वेळां हंसलों असूं ! हें नाटक ऐतिहासिक होतें असें म्हणतात. गडकऱ्यांच्या प्रेमसंन्यासाला उत्तर देण्याचा हा एक प्रयत्न तर नसावा अशी मला राहून राहून शंका येते. या नाटकाबद्दल 'ललितकला' मंडळीमध्यें पुष्कळच थट्टामस्करी चालत असे. विशेषतः, शिवाजी आपला तरवार कमरेला लटकावून हिरव्यागार गवतावरून चाललेला आहे, आणि त्या गव-

तावर पडलेले दंवबिंदू तरवारीच्या तेजस्वी पात्यामध्यें चमकत आहेत असें किंवा अशासारखें कांहीं वर्णन त्या नाटकांत आलें होतें असें म्हणतात. त्याबद्दल एक गोष्ट अशी सांगण्यांत येत असे कीं, केशवराव भोसल्यांनीं मास्त्यांना म्हणे विचारलें कीं, 'रंगभूमीवर हे दंवबिंदू तलवारीच्या पात्यांत चमकतांना दाखवायचे कसे ?' तर त्यावर मास्त्यांनीं उत्तर असें दिलें म्हणे कीं, 'हें मी काय सांगूं ! काय कसें दाखवायचें हा तुमचा धंदा आहे !' ही गोष्ट नाटक-मंडळीच्या गप्पाष्टकांमधून निर्माण झालेली असल्यानें तिच्या खरेखोटेपणा-बद्दल खात्री देववत नाहीं.

काव्यावरील टीका, कविता किंवा नाटक लिहिण्याची मास्त्यांच्या आयुष्यां-तली ही अवस्था फार वेळ टिकूं शकली नाहीं. मास्त्यांचें महत्त्वाकांक्षी मन त्यामध्यें अधिक काळ रमणें शक्य नव्हतें. उत्तम शिक्षक–विशेषत:, वरच्या वर्गांत उत्तम इंग्रजी शिकवणारे–म्हणून पुण्यांत त्यांचा लौकिक वाढत चाल-लेला होता. मॅट्रिकच्या विद्यार्थ्यांना शिकवण्याचा एक खाजगी वर्ग त्यांनीं उघडला होता. या वर्गांत प्रवेश मिळवण्यासाठीं विद्यार्थ्यांची झुंबड पडत असे ! आणि या वर्गापासून पुष्कळशी पैशाची प्राप्तीहि त्यांना होत असे. न्यू इंग्लिश स्कूलच्या त्या वेळच्या अधिकाऱ्यांच्या डोळ्यांवर ही गोष्ट आल्याकारणानें ती शाळा सोडून 'नूतन मराठी विद्यालया'मध्यें माटे यांना जावें लागलें, असें मीं त्या वेळीं ऐकलें होतें. मॅट्रिकच्या खाजगी वर्गावर माटे यांना जेवढे पैसे मिळत तेवढे ते शहरांतील हरिजन विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर खर्च करीत असत. माटे यांच्या आयुष्यांतला हा एक महत्त्वाचा कालखंड होता. समाजसेवक या नात्यानें माटे यांनीं ह्या वेळीं जें कार्य करून दाखविलें त्याला तोड नाहीं. माटे यांनीं आपल्या जुन्या विद्यार्थ्यांच्या साहाय्यानें गांवांतील निरनिराळ्या विभागांत हरिजन विद्यार्थ्यांसाठीं रात्रीच्या मोफत शाळा उघडल्या. या शाळेंत येणाऱ्या विद्यार्थ्यांना पाट्या, पुस्तकें आणि इतर लेखनसाहित्य ते स्वतःच्या खर्चानें पुरवीत असत. या कामीं माटे यांनीं अविश्रांत मेहनत घेतली आणि स्वतः-च्या द्रव्याचा पुष्कळसा खरावा केला. पुण्यांतील हरिजनांच्या शिक्षणाचा खरा पाया माटे यांनीं घातला हें आज ती मंडळी मान्य करण्याच्या मनोवृत्तीमध्यें नसली तरी हें सत्य आहे. यामुळें अधिक सनातनी मंडळींचा रोष माटे यांना

पत्करावा लागला. ‘ महार माटे ’ म्हणून त्यांची अवहेलना करण्याचा पुष्कळ वेळां प्रयत्न झालेला आहे.

समाजशास्त्राच्या दृष्टीनें अस्पृश्यांच्या प्रश्नाचा विचार करण्यास या वेळेपासूनच माटे यांनीं सुरुवात केली. ‘ अस्पृश्यविचार ’ या मथळ्याखालीं ‘ केसरी ’-मध्यें त्यांची एक लेखमाला सुरू झाली. ही लेखमाला वाचतांना माटे यांच्या लेखनशैलीचें नवें जागृत स्वरूप मला प्रथम पहावयाला मिळालें. लेखांची भाषा थोडीशी क्लिष्ट आणि क्वचित् दुर्बोधहि होती. तथापि माट्यांच्या लेखनशैलीचें आज जें मनोहर आणि तेजाळ स्वरूप दृष्टीस पडतें, त्याचे पाय या लेखमालेच्या पाळण्यांत स्पष्टपणें दिसून आले यांत शंका नाहीं. ‘ अस्पृष्टांचा प्रश्न ’ हा माटे यांचा ग्रंथ त्यांच्या दीर्घ व्यासंगाचा आणि प्रत्यक्ष अनुभवांचा एक सुंदर परिपाक आहे. हरिजनांविषयीं माटे यांना इतकी आपुलकी वाटते, त्यांच्यासाठीं त्यांनीं एवढा त्याग आणि परिश्रम केलेले आहेत ! इतकेंहि असून या बाबतींत माटे यांच्या वांट्याला कांहीं एक श्रेय आलें नाहीं ! याचें कारण माटे यांचा विशिष्ट स्वभाव आणि जीवनाकडे पहाण्याचा त्यांचा विशिष्ट दृष्टिकोण ! समाजांतील अन्याय माट्यांच्या काळजाला तीव्रतेनें बोचत होते. ते दूर करण्यासाठीं स्वतः वाटेल त्या खस्ता खाण्याची त्यांची तयारी होती ! पण ते अन्याय दूर करण्यासाठीं ते समाजांतील सनातनी वर्गावर कोणत्याहि प्रकारची अन्यायमूलक जबरदस्ती करावयाला तयार नव्हते ! हरिजन विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याच्या अनिवार्य हव्यासानें त्यांनीं सनातनी वर्गाकडून स्वतःला ‘ महार माटे ’ ही पदवी मिळवून ठेविली, तर हरिजनांच्या मंदिरप्रवेशाबाबत होणाऱ्या सत्याग्रहाच्या चळवळीला कसून विरोध करण्यासाठीं सनातन्यांमध्यें ते सामिल झाले आणि त्यामुळें ‘ सनातनी सुधारक ’ ही पदवी त्यांनीं कायमची संपादून ठेविली !

माटे खरोखरच सनातनी आहेत का सुधारक आहेत, की दोन्हीहि अर्धे अर्धे आहेत का दोन्हीहि मुळींच नाहींत आणि तिसरेंच कांहीं तरी आहेत याचें महाराष्ट्रांत पुष्कळांना कोडें आहे ! माटे यांना स्वतः मात्र अतिशय घमेंड आहे कीं, आपली विचारांची बैठक अगदीं ठाम आहे. त्यांत ढिलेपणा असा कांहीं नाहीं. म्हणूनच ‘ संशयात्म्या ’ वामनराव जोशींना ‘ मंत्रचळे ’ म्हणून थोडेंसें हिणवायला त्यांनीं कमी केलें नाहीं. तथापि नानातऱ्हेनें मीं पुष्कळ विचार करून पाहिला; पण माट्यांना ‘ सुधारक ’ म्हणायला माझा कांहीं धीर होत नाहीं !

कांहींहि केलें आणि कांहींहि म्हटलें तरी त्यांच्या मनाची मूळची बैठक ही सनातन्याचीच आहे याविषयीं मला तरी शंका नाहीं. हरिजनांच्या उद्धारासाठीं तळमळणारे माटे हे जातिभेद मानीत नाहींत अशी जर कोणी समजूत करून घेईल तर ती अगदीं चुकीची ठरेल ! माटे यांना आपण ब्राह्मण आहोंत–किंबहुना आपण चित्पावन (चित्तपावनांनो, क्षमा करा !) ब्राह्मण आहोंत याचा विलक्षण अभिमान आहे. टिळकांच्या राष्ट्रीय राजकारणाच्या परंपरेंत ज्यांचें बाळपण आणि तारुण्य गेलें, ते माटे निव्वळ विचारानें तरी राष्ट्रीय राजकारणाचे पुरस्कर्ते असतील अशी कोणी कल्पना करील तर तीही बरोबर नाहीं ! जातीय दृष्टीनें देशकारण करणाऱ्या हिंदुमहासभेला आज त्यांचा पाठिंबा आहे ! सावरकर हे साधारणत: त्यांचे समकालीन असल्यानें त्यांचें पूर्वीचें सारें अलौकिक कर्तृत्व त्यांनीं आपल्या डोळ्यांनीं पाहिलेलें आहे. त्यामुळें सावरकरांवर आज ते इतके बेहद्द खूष आहेत कीं, त्यांच्या आजच्या राजकारणाकडे बुद्धीची डोळेझांक करून ते त्यांच्याकडे आपली प्रज्ञा गहाण टाकायला तयार झाले आहेत ! 'विज्ञानबोधा' ची व्यासंगपूर्ण आणि विद्वत्तापूर्ण प्रस्तावना लिहिणाऱ्या मास्त्यांचा जीवनाकडे पाहाण्याचा दृष्टिकोण शास्त्रीय आणि बुद्धिवादी असेल अशी कोणी कल्पना करील ! पण तसें नाहीं ! गणपतीची आपण थट्टा केली म्हणून कोल्हटकरांना आपलें तोंड मरण्यापूर्वी वांकडें झालें असावें असें वाटलें ही गोष्ट 'पावित्र्यविडंबना' वरील व्याख्यानामध्यें आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ त्यांना सांगावीशी वाटली !

मास्त्यांनीं समाजशास्त्राचा फार सखोल अभ्यास केलेला आहे. आपण समाजशास्त्री आहोंत या गोष्टीचा त्यांना अभिमान आहे. पण त्यांच्या समाजशास्त्रीय कल्पना एकोणिसाव्या शतकांतल्या आहेत. 'साम्यवादा' च्या अभ्यासाचे संस्कार त्यांच्या विचारावर आणि लेखनावर झालेले आढळून येत नाहींत. यामुळें 'साम्यवादा' च्या अभ्यासानें जागृत झालेल्या महाराष्ट्राच्या ताज्या तरुण पिढीवर त्यांचें कांहींच वजन नाहीं. तरुण विद्यार्थ्यांमध्यें अत्यंत प्रिय असतांनाहि त्यांच्या हातांतून आणि त्यांच्या डोळ्यांदेखत तरुण पिढी निसटून पुढें गेली ! हिंदु युवकांचें भगवें वर्तुळ काय त्यांच्याभोंवतीं शिल्लक उरलें असेल तेवढेंच. तरुण पिढीला आपण पारखे झालों आहोंत या गोष्टीचा त्यांच्या अंत:करणाला धसका बसल्यासारखा दिसतो. म्हणूनच 'तरुणांचें पुढारीपण पत्करणें हें धोक्याचें

असतें. कधीं तें अंगलट येईल याचा नेम नसतो.' असें त्यांनीं आतां आपलें मत बनविलेलें दिसतें.

माटेयांची वाङ्मयीन विचारसरणी ही देखील सनातनीच आहे. म्हणून पुरोगामी वृत्तीच्या लेखकांपेक्षां कृष्णराव मराठ्यांच्या 'संस्कृतिसंरक्षका'शीं त्यांचें अधिक मेतकूट जमतें. 'कामक्रोधमदमत्सर' हे आपले शत्रु नाहींत, मित्र आहेत. शृंगाराची योग्य दखलगिरी वाङ्मयांत घेतली पाहिजे अशीं मतें असलेल्या माट्यांना माझ्या 'ब्रँडीच्या बाटलीं' तलें 'कृष्णराव, आम्हांला चान्स द्या!' हें शृंगारिक वाक्य किंवा त्या वाक्यांतला 'चान्स' हा शब्द कांहीं खपला नाहीं. हमरीतुमरीवर येण्यासारखें भयंकर असें कांहींच त्यांत नव्हतें! पण तेवढ्यावर मराठ्यांची कड घेऊन त्यांनीं माझ्याशीं रण लढविलें! याबाबत आम्हां दोघांमध्यें जी धुमश्चक्री झाली ती 'अत्रे–माटे' या नांवानें इतिहासांत जमा आहे. या वादांत आपण जय मिळविला अशी माट्यांना घमेंड आहे. कारण सनातन्यांच्या अर्जाप्रमाणें सरकारनें माझ्या बोलपटामधला शंभर फुटांचा तुकडा उडवून टाकला! सनातन्यांची अब्रू सावरावयाला सरकारला धांवून यावें लागलें! या 'विजया' चें माट्यांना मनांतून खरोखरच समाधान वाटत असेल किंवा नाहीं याबद्दल मला शंका आहे! या वादांत माझा जय झाला अशी माझी घमेंड आहे! पंचवीस तीस हजारांच्या विराट जनसमुदायापुढें या निमित्तानें दोनअडीच तासभर मीं एक प्रचंड व्याख्यान देऊन माझी बाजू श्रोत्यांना पटवून दिली! माझ्या आयुष्यांतील एक अविस्मरणीय प्रसंग माट्यांच्यामुळें निर्माण झाला म्हणून त्यांच्याबद्दल मला नेहमीं कृतज्ञता वाटेल.

या वादांतली जयापजयाची गोष्ट सोडून द्या. त्यांत कांहीं फारसें तथ्य नाहीं. पण या वादामुळें माट्यांचें एक स्वाभाववैशिष्ट्य मला कळून चुकलें. माटे यांचा स्वभाव रागीट आणि हट्टी आहे. एकदां ते हट्टाला पेटले म्हणजे स्वतःच्या मनावर त्यांचा फारसा ताबा रहात नाहीं ही गोष्ट मला या वेळीं पुरती कळून चुकली. यशवंत कवीशीं त्यांचा मागें एकदां वाद झाला. त्या वेळीं ते इतके रागावले कीं, 'तुमचीं हाडें मऊ करीन' किंवा तुमच्या 'कानशिलांत भडकवीन' अशी भाषा बोलण्यापर्यंत त्यांची मजल गेली! 'अत्रे–माटे' वादाचे वेळीं एका भाषणांत आपण म्हातारे झालों नाहींत हें श्रोत्यांना पटवून देण्यासाठीं 'अत्रे जें जें

कांहीं करतील तें तें मी करून दाखवीन ! ' असें अंगविक्षेपासह त्यांनीं म्हणून दाखविलें असें म्हणतात. त्याचप्रमाणें त्या वेळीं काढलेल्या एका पत्रकांत त्यांनीं ' माझें कूसहि वांकडें होणार नाहीं ! ' हा भयंकर वाक्यप्रयोग करून कृष्णराव मराठ्यांनाही लाजवलें असें सांगतात. फडके यांचा ' टिच्चून ' आणि माटे यांचा ' कूस ' हे शब्द मराठी वाङ्मयामध्यें आज चांगलेच परिचित होऊन बसले आहेत. सगळ्यांत आश्चर्याची गोष्ट ही कीं, ज्यांनीं माझ्या ' चान्स ' या शब्दाला हरकत घेतली त्यांनीं आपल्या ' वांकड्या कुसा ' चें समर्थन करतांना आकाशपाताळ एक करावयाला कमी केलें नाहीं ! मी त्या वेळच्या एका भाषणांत माट्यांना माझीं पुस्तकें कॉलेजांतील विद्यार्थ्यांना शिकवावीं लागतील असें म्हणालों होतों. त्यावर ' अत्रे माझ्या लेखांतील उतारे आपल्या पुस्तकांमध्यें छापून आपलें पोट जाळीत आहेत. ' असें माटे यांनीं विधान केलें होतें. वास्तविक माझ्या ' अरुण वाचन ' या क्रमिक पुस्तकांमध्यें मीं माट्यांच्या लिखाणामधील मला आवडलेले उतारे समाविष्ट केलेले होते त्याबद्दल माट्यांना मीं मोबदला दिलेला होता. माट्यांचे उतारे मी एका दृष्टीनें विकतच घेतलेले होते. असें असतां माट्यांच्या लेखांवर मी माझें पोट जाळतों हें त्यांचें म्हणणें कसें खरें आहे बरें ? पण भांडणाच्या भरांत माट्यांच्या लेखणींतला आणि वाणींतला संयम सुटतो हेंच खरें. अमुक अमुक माणसाचें मुस्काट रंगवीन असें मीं स्वतः म्हणालों किंवा माझें कूसही वांकडें होणार नाहीं असें मी उद्गारलों तर एकादे वेळीं माझ्या वृत्तीला तें साजूनच दिसेल ! पण माट्यांसारख्यांना तसें म्हणणें मात्र शोभत नाहीं. निदान माट्यांपासून असल्या गोष्टीची मी अपेक्षा करीत नाहीं.

इतकें सगळें रामायण सांगितलें तरी माटे मला आवडतात–त्यांचें लिहिणें मला आवडतें...याचें कारण माटे बाहेरून दिसतात तितके ते रूक्ष नाहींत. माटे गद्याची तरफदारी करीत असले तरी त्यांची मनोवृत्ति गद्य नाहीं. मानवी भावनेचा आणि सहानुभूतीचा निव्वळ शंख आणि जिवंत झरा या माणसाच्या अंतःकरणांतून वहात आहे. त्या झऱ्याच्या ओलाव्याला मी बसलेलों आहें. त्या झऱ्याचे शीतल तुषार माझ्या अंगावर मीं उधळून घेतले आहेत आणि त्यामुळें माझ्या हृदयाची रुखरुख निवलेली आहे. माट्यांचे दोष मला दिसत असले आणि माझे दोष माट्यांना दिसत असले तरी दोघांच्या अंतःकरणांत-

त्या एकमेकांविषयींच्या खुणा एकमेकांना पटलेल्या आहेत आणि दोघांचाहि एकमेकांविषयींचा ओढा मध्यंतरींच्या भांडणामुळें कमी झालेला नाहीं. लोक माझ्याविषयीं वाटेल त्या कंड्या उठवितात याविषयीं एकदां रस्त्यांत उभ्या उभ्या त्यांच्याशीं बोलत असतांना मी चिडून म्हणालों, 'लोक महा हलकट आहेत!' त्यावर माटे मोठ्या जिव्हाळ्यानें मला म्हणाले, 'अत्रे, लोकांना तुम्ही शिव्या देऊं नका. तुमच्या गुणांचें चीज करणारे लोक जगांत कांहीं कमी नाहींत!' अकरा वर्षांपूर्वी एका फौजदारी खटल्याचें किटाळ माझ्यावर आलेलें होतें. त्यांतून माझी सहीसलामत सुटका झाल्यावर मुद्दाम मला भेटून माझें अंतःकरणापासून अभिनंदन करणारे माटे हेच पहिले होत. त्या वेळीं माझा हात हातांत धरून 'गृहस्था, आज मला इतका आनंद झालाय!' असें ज्या भावनेनें ते म्हणाले त्या भावनेची आठवण झाली कीं, माझ्या डोळ्यांत अजूनही पाणी येतें. माटे यांचे ते शब्द मी आमरण कधींहि विसरणार नाहीं. माटे यांनीं माझ्या प्रत्येक नाटकावर लेखी अभिप्राय देऊन माझ्या गुणांचें कौतुक केलेलें आहे. आणि मला वेळोवेळीं उत्तेजन दिलेलें आहे, हें तरी मी कसें विसरेन?

मध्यंतरीं आम्हां दोघांमध्यें पुष्कळच पूर वाहून गेला. अजूनहिं अधूनमधून उरलेलें पाणी खळखळतेंच आहे. मनांतल्या कांहीं अढ्या आणि पीळ अजून शिल्लक आहेतच. पुष्कळ दिवसांत एकमेकांची गांठभेट नाहीं. राजकीय पक्षभेदामुळें आपलेपणाची भावना थोडीशी दुरावलेलीच आहे. म्हणून पुण्यास माझ्यावर जेव्हां हल्ला झाला तेव्हां औपचारिक सांत्वन करण्याचें देखील माट्यांना भान राहिलें नाहीं. कारण त्यांत स्वतःच्या हेक्याला त्यांना थोडी तरी मुरड घालावीच लागली असती.

हीच माट्यांच्या स्वभावांतली एक गोम आहे. माटे मनानें प्रेमळ आहेत; पण वृत्तीनें खेळाडू नाहींत. ते विसरूं शकत नाहींत, डूख धरून बसल्यासारखे वाटतात. म्हणून माट्यांची मैत्री संभाळणें मित्रांना जड वाटतें. कधीं चुकून माकून तोंडांतून भलता शब्द जाऊन त्यांचें मन तर दुखावलें जाणार नाहीं याबद्दल एकसारखें जागरूक रहावें लागतें. बरोबरीच्या मैत्रींत हें कसें शक्य आहे? दत्तोपंत पोतदार मित्रमंडळींत आपले भस्माचे पट्टे आणि बंडी सहज विसरू

शकतात. पण माटे आपल्या मिशा आणि ताठा कधींच विसरूं शकत नाहींत. हा दोघांमधला फरक आहे.

माटे यांच्या बोलण्यांतली आणि लेखनांतील गोडी अवीट आहे. त्यांची व्याख्यानाची पद्धति अतिशय ठसकेबाज आणि मोहक आहे. कित्येक वेळीं त्यांचीं व्याख्यानें अशीं कांहीं रंगतात कीं, कांहीं सुमार नाहीं. एक डोळा तिरपा करून आणि मिशांवर क्वचित् हात फिरवून ते अशा कांहीं आवेशानें आणि विश्वासानें बोलतात कीं, श्रोत्यांवर त्याची तावडतोब छाप पडल्यावांचून रहात नाहीं. स्वतःच्या व्याख्यानांची लज्जत स्वतःच अनुभवीत ते बोलत आहेत असें पुष्कळ वेळां वाटतें. माटयांच्या लेखनशैलीवर त्यांचा स्वतःचा ठळक छाप पडलेला आहे. त्यांचें लिहिणें मोठें डौलदार आणि फर्मास आहे. एक एक शब्द आणि वाक्यप्रयोग ते असा कांहीं ठेवणींतला काढतात कीं, ऐकणारानें चाट व्हावें. त्यांची भाषा जुनाट नाहीं;घरगुती आहे. पुस्तकी नाहीं; बोली आहे. ' नाट्यछटाकार दिवाकर ' यांच्या एका स्मृतिदिनाचे प्रसंगीं त्यांनीं आपल्या भाषणाचें प्रतिवृत्त ' ज्ञानप्रकाशांत ' छापलें होतें. माट्यांच्या लेखनशैलीचा तो एक सर्वोत्कृष्ट नमुना आहे असें माझें मत आहे. माट्यांचे राजकीय आणि सामाजिक विचार मला मान्य नसले तरी त्यांच्या लेखांतील जिव्हाळा आणि वळवळा मला व्याकुळ करूं शकतो. म्हणून माट्यांचें प्रत्येक लिखाण मीं मोठ्या आवडीनें आणि मिटक्या मारीत वाचतों. वैचारिक दृष्ट्या माट्यांचें लिखाण लोकांच्या फारसें स्मरणांत राहिलें नाहीं तरी '**महाराष्ट्रांतील पट्टीचा शैलीकार**' साहित्यिक म्हणून मराठी वाङ्मयांतील त्यांचें स्थान अढळ आहे !

माट्यांची लेखनशैली जितकी तेजस्वी आणि तजेलदार आहे तितकी त्यांची वैचारिका जर असती तर—तर आज महाराष्ट्रीय राजकारणांत आणि समाजकारणांत फारच श्रेष्ठ स्थान त्यांनीं फटकावलें असतें. त्यांच्या वाणींत, लेखणींत आणि व्यक्तिमत्तेंत तें सामर्थ्य आहे. पण जाऊं द्या ! त्याचा विचार करण्यांत काय अर्थ आहे ? माट्यांच्या आणि माझ्यामध्यें कितीही मतभेद असले तरी त्यांच्याशीं मनमोकळेपणानें पोटभर गप्पा मारून पुष्कळ वर्षांचा राहिलेला हिशेब चुकता करण्यांत मला केव्हांहि आनंदच वाटेल !

## अनंत हरि गद्रे

### एक लाख माणूस

अनंत हरि गद्रे यांना मी लहानपणापासून ओळखतों. अर्थात् माझ्या. दोघेहि आम्ही पुण्याचे, आणि फिरून एकाच बोळांत रहाणारे अन् वावरणारे. जोगेश्वरीच्या एका तोंडाला अनंतरावांचें सुगंधी सामानाचें दुकान होतें, तर दुसऱ्या तोंडाला पुराणिकाच्या वाड्यांत मी रहात होतों. तथापि, आमची दोघांची ओळख अशी मुळींच नव्हती. तसें ओळख असण्याचें कांहीं कारणच नव्हतें. मी बोलून चालून कॉलेजांत जाणारा एक विद्यार्थी, आणि अनंतराव तर बाजारपेठेंत दुकान थाटून बसलेले एक उत्साही व्यापारी! वर्तमानपत्राशीं, वाङ्‌मयाशीं, नाटकांशीं किंवा लेखनाशीं अनंतरावांचा त्या वेळीं कांहींच संबंध नव्हता! निदान तसा त्यांचा कांहीं आंतून गुपचूप संबंध असावा किंवा तो पुढें केव्हांतरी फारच जाहीर होणार आहे, याची त्या वेळीं मला ओझरती देखील कल्पना नव्हती. मीहि साहित्याशीं फारशा खोड्या करायला सुरुवात केली नव्हती त्या वेळीं. मग अनंतराव मला कोठून ओळखणार!

बाकी अनंतरावांची आणि माझी ओळख नव्हती; तरी मी मात्र त्यांना त्या वेळीं ओळखत होतों. किंवा ओळखून होतों! रोज त्यांच्या त्या दोन खणी दुकानावरून दोन-चार वेळां तरी जाण्याचा मला प्रसंग येई; पण प्रत्येक वेळीं जातां जातां दुकानाकडे सहज मीं नजर टाकली नाहीं असें मात्र क्वचित् होई! चारदोन ओळखीची मंडळी गप्पांचा आखाडा मांडून त्या दुकानांत आपली नेहमीं बसलेली असायची! अनंतराव हा कोणी तरी एक गमत्या माणूस आहे, अशी त्याच वेळीं मीं खूणगांठ बांधून ठेविली होती. त्यामुळें अनंतरावांना बघितलें कीं, त्यांची थट्टा करण्याचा मोह मनांत हळूच उत्पन्न होत असे. 'अल्ला

अंजीर' विकायला अनंतरावांनीं त्याच वेळीं सुरुवात केली होती. ही 'अख्खा अंजीर' काय भानगड आहे हें आम्हांला मुळींच ठाऊक नव्हतें. 'अख्खा' शब्दाचा अर्थहि आम्हांला त्या वेळीं माहित नव्हता! तेव्हां अनंतरावांच्या दुकानावरून जातांना 'अख्खा अंजीरा'ची पाटी वाचायची, तिची कांहीं तरी वात्रट टवाळी करायची, अन् हंसत हंसत पुढें जायचें, हा आम्हां कॉलेज-मधील कांहीं पोरांचा नित्याचा शिरस्ताच होता!

लोकमान्य टिळकांनीं वऱ्हाड-खानदेशकडे त्या वेळीं स्वराज्याची मोहीम काढली होती. त्या मोहिमेच्या वर्णनाची एक माला त्या वेळीं पुण्यांत प्रसिद्ध होऊं लागली. या मालेचें नांव 'राष्ट्र-प्रेम-माला.' या मालेचीं पुस्तकें छोटींशींच असत, आणा दोन आणे किंमतीचीं! त्यांचें बाह्यांगहि चांगलें आकर्षक असे. पुण्यामध्यें या पुस्तकांचा एकदमच बोलबाला झाला. बहुतेक लोकांच्या हातांत एकादें दुसरें पुस्तक दिसलें नाहीं असें क्वचितच होई. या मालेचे लेखक 'अनंत हरि गद्रे' हीच व्यक्ति आहे असें जेव्हां आढळून आलें, तेव्हां मला चांगलाच धक्का बसला! अनंत हरि गद्रे! जोगेश्वरी नाक्यावरील 'सौगंधिक स्टोअर्स' चा मालक! 'अख्खा अंजीर' विकणारा माणूस! अन् हा 'राष्ट्र-प्रेम-माला' काढूं शकतो! हा लोकमान्य टिळकां-च्यावर पानेंच्या पानें लिहूं शकतो! क्षणभर या गोष्टिवर माझा विश्वासच बसेना! पण न बसून कसें चालेल! मालेचीं पुष्पें दर महिन्याच्या महिन्याला तर निघत होतीं आणि त्याच 'सौगंधिक स्टोर्स'मध्यें 'कोहिनूर गुलकंद' आणि 'अख्खा अंजीर' यांच्या मांडीला मांडी लावून व विक्रीसाठीं बसलेलीं दिसतच होतीं!

सुगंधी सामानाचा हा दुकानदार एक लेखकही आहे अशी खात्री होतांच त्याच्याबद्दलचें कुतूहल अधिकच वाढलें आणि आदरहि पण वाटूं लागला. आदर वाटण्याचें आणखी एक कारण, म्हणजे आम्ही त्या वेळचे कॉलेजांतील तरुण विद्यार्थी हे पराकोटीचे टिळकपूजक होतों. टिळक हे त्या वेळीं जवळ जवळ आमचे परमेश्वरच होते म्हणानात! मवाळांना, गोखल्यांना, आणि सरकारला खच्चून शिव्या द्यायच्या अन् टिळकांचे आणि 'केसरी'चे मुक्तकंठानें पोवाडे गावयाचे, हा त्या वेळीं आम्हां पोरांचा अत्यंत आवडता व्यवसाय असे. टिळकांबद्दल जो कोणी चांगलें बोलेल किंवा चांगलें लिहील तो साहजि-

कच आम्हांला प्रिय! तेव्हां जोगेश्वरी नाक्यावरचा हा गुलकंदवाला टिळकांच्या बाजूचा आहे हें कळतांच इतक्या दिवस जातां-येतां आपण त्याची उगाच थट्टा करीत होतों, याबद्दल हळहळ वाटून आम्हांला बराच पश्चात्ताप झाला!

तथापि, प्रत्यक्ष पुस्तकें वाचून मात्र अनंतरावांच्या लेखनशैलीबद्दल कौतुक वाटण्याऐवजीं त्यांची चांगली टर उडवावी असेंच वाटूं लागलें! कारण अनंतरावांची लेखनशैली त्या वेळीं फारच प्राथमिक अवस्थेंत होती! त्यांच्या दुकानाच्या भाषेंतच बोलायचें म्हणजे त्यांचा साहित्य-गुलकंद त्या वेळीं फारसा मुरलेला नव्हता. अच्युतराव कोल्हटकरांच्या प्रमाणें ते वाक्यांची पुनरावृत्ति एकसारखी पुन्हां पुन्हां करीत असत! पण त्यांच्या त्या लिहिण्यांत अच्युतरावांचा डौलहि नव्हता किंवा त्यांचें लालित्यहि नव्हतें! टिळकांबद्दल लिहितांना तर त्यांच्या अतिशयोक्तीला कांहीं धरबंदच रहात नसे. हिंदभूमि ही ' माता ' आणि टिळक हें ' बाळ ' असें रूपक घेऊन त्यांनीं एक ' पुष्प ' लिहिलेलें अजून मला आठवतें. त्या पुस्तकांत टिळकांशीं त्यांनीं फारच अंगलगट केली म्हणून आम्हीं पोरें त्या वेळीं अनंतरावांवर खूपच चिडलों होतों! अनंतरावांच्या या ' राष्ट्र-प्रेम-माले 'चा मध्यम शिक्षित किंवा अर्धशिक्षित जनतेमध्यें पुष्कळच खप होत असला तरी सुशिक्षित मंडळींवर मात्र या पुस्तकांचा फारसा परिणाम झालेला नव्हता. कांहीं ठिकाणीं तर या पुस्तकांचें हंसूंच होई. तथापि, अनंतराव हा माणूस एक अडाणी दुकानदार आहे, त्याच्यापासून जास्त दर्जाच्या लेखनाची अपेक्षा काय करायची? असेंच पुष्कळांनीं त्या वेळीं आपल्या मनाचें समाधान करून घेतलें असलें पाहिजे.

अनंतराव फारसे शिकलेले नसावेत, असलेच तर ते जास्तींत जास्त ' मॅट्रिक फेल ' असावेत अशीच त्या वेळीं पुष्कळांची समजूत होती. मला वाटतें आज देखील कांहीं कांहीं लोकांचा तसाच समज असावा. अनंतराव हे चांगले शिकलेले आहेत, फर्ग्युसन कॉलेजमध्यें बी. ए. च्या परीक्षेपर्यंत त्यांची मजल पोहोंचलेली आहे, संस्कृत भाषेंत तर त्यांचा हात धरणारे त्या वेळीं फारच थोडे विद्यार्थी होते, हें मला कित्येक वर्षांनीं पुढें कळलें. मला वाटतें एकदां प्रा. माट्यांनींच बोलतां बोलतां मला सांगितलें कीं, ते दोघे एकाच वेळीं कॉलेजांत शिकत होते म्हणून! तथापि, पहिल्यापासून अनंतरावांनीं आपल्या-

भोंवतीं एकंदर ' हवा ' च अशी निर्माण करून ठेवली आहे कीं, ते अर्ध-शिक्षित असावेत असाच त्यांच्याबद्दल दुसऱ्याचा समज व्हावा ! अनंतरावांनीं आपल्याबद्दलचा हा गैरसमज जाणूनबुजून पसरविला आहे कीं काय हें मला ठाऊक नाहीं; पण आहे हें असें आहे ! हो, पण सांगत होतों तें तसेंच राहिलें.

लोकमान्य टिळक १९१७ सालीं विलायतेला जाईपर्यंत अनंतरावांची ही माला पुण्यांत चालूच होती. लोकमान्यांच्या दौऱ्यांत अनंतराव मला वाटतें त्यांच्या बरोबरच गांवोगांव हिंडत असत. त्या वेळीं जोगेश्वरी नाक्यावरील त्यांच्या ' सौगंधिक स्टोर्स ' ची किंवा त्यांच्या ' अरल्या अंजीरा 'ची आठवणही रहात नसे ! पहिल्यापासून हा अनंतरावांचा आपला स्वभावच ! ज्या वेळीं जें त्यांच्या डोक्यांत येईल, त्याचेंच फक्त त्यांना वेड ! मग दुसऱ्या गोष्टींची त्यांना शुद्धहि रहायची नाहीं ! अरल्वा अंजिर डोक्यांत भरला कीं अरल्वा अंजीर ! अन् लोकमान्यांचा दौरा डोक्यांत शिरला कीं लोकमान्यांचा दौरा ! तथापि, एक गोष्ट मात्र नक्की ! लोकमान्यांच्या दौऱ्यांत बातमीदार म्हणून अनंतरावांनीं हिंडण्याचें काम केलें यामुळेंच त्यांचा वर्तमानपत्रांशीं संबंध आला आणि याच संबंधामधून त्यांचें पुढील वृत्तपत्रीय आयुष्य निर्माण झालें ! जोगेश्वरी नाक्यावरून अनंतराव केव्हां पसार झाले आणि पुढें त्यांच्या अरल्या अंजिराचें काय झालें हें मला आज आठवत नाहीं ! पण त्यानंतर त्यांनीं आपला मुक्काम जो मुंबईला हलवला तो आजतागायत अखंडपणें वीस-बावीस वर्षें मुंबईतच आहे, हें मला ठाऊक आहे.

मुंबईस आल्यापासून वृत्तपत्रें आणि नाटकें यांच्यामध्येंच अनंतरावांनीं आपल्या साऱ्या आयुष्याची धांवपळ केलेली आहे. त्या बाबतींत अच्युतराव कोल्हटकरांची त्यांच्या जीवनावर गडद् छाया पडलेली आहे. तसा अच्युत-रावांचा आणि त्यांचा संबंधही पहिल्यापासून आला. कारण 'संदेश' पत्राचे ते आरंभापासूनच बातमीदार होते. अच्युतरावांच्या तऱ्हेवाईक लेखनशैलीचा अनंतरावांच्या लेखनावर पुष्कळच परिणाम झाला. 'संदेश' खुसखुशीत करण्या-साठीं अच्युतराव ज्या ज्या युक्त्याप्रयुक्त्या करीत,ज्या ज्या गमती आणि शकला लढवीत,त्या अनंतरावांसारख्या चाणाक्ष माणसाच्या लक्ष्यांत आल्यावांचून कशा रहातील ? ' टिळक स्वराज्यफंडा ' च्या वेळीं पसतीसशें रुपयांबाबत अच्युत-

राव आणि गायकवाडवाडा यांच्या दरम्यान जें तुंबळ युद्ध झालें त्या युद्धांत अनंतराव हे अच्युतरावांचे सेनापति होते असें म्हटलें तरी चालेल ! आणि खरोखरच त्या वेळीं अनंतरावांनीं ' संदेश 'मध्यें जें निनांवी लिखाण केलें, त्यामध्यें त्यांची प्रतिभा विशेष झळाळीनें उसळून प्रकट झाली.

'संदेश' मध्यें या पसतसिशें रुपयांचें एक ओंवीबद्ध विनोदी पुराण प्रसिद्ध झालेलें होतें. हें पुराण त्या वेळीं लोकांना अतिशयच आवडलें होतें. पुष्कळांना वाटत होतें कीं, हें पुराण अच्युतरावांनींच स्वत: लिहिलेलें असावें; पण हा काव्यमय उपद्व्याप आमच्या अनंतरावांचा होता हें फक्त ' तज्ञां 'ना माहीत आहे. पसतीसशें रुपयांवर अनंतरावांनीं अक्षरश: पसतीसशें ओंव्या रचल्या.. या ' पसतीसशें ' मधील पसतीसावर नरसोपंत केळकर आणि यशवंतराव नेने हीं ' नरसू–नेना ' नामक दोन शून्यें आहेत ही अनंतरावांची विनोदी कोटी त्या वेळीं खूपच लोकप्रिय झाली होती. अच्युतरावांचें शिष्यत्व पत्करून अनंतरावांनीं दुसरें कांहीं मिळाविलें नसलें, तरी एक गोष्ट मात्र नक्की मिळविली; आणि ती म्हणजे गायकवाडवाड्याचें वैर ! गायकवाडवाड्यांतले टिळकांचे आश्रित अच्युतरावांइतकाच अनंतरावांचाहि द्वेष आणि तिरस्कार करूं लागले ! मला आठवतें तसें अनंतरावांचें आणि गायकवाडवाड्याचें हें हाडवैर पुष्कळ वर्षें टिकून होतें ! सध्यां काय परिस्थिति आहे हें मात्र मी सांगूं शकत नाहीं !

मुंबईत आल्यानंतर अनंतरावांनीं आपलें ' मौज ' हें पत्र सुरू करून मनोरंजक साप्ताहिकांचा महाराष्ट्रांत एक नवीनच जमाना सुरू केला हें निःसंशय कबूल केलें पाहिजे. हरिभाऊ आपट्यांच्या 'करमणुकी' नंतर महाराष्ट्रांत इतकें मनोरंजक साप्ताहिक दुसरें निघालेंच नाहीं. हरिभाऊंची ' करमणूक ' अधिक वाङ्मयात्मक असल्यानें तिचा दर्जा निःसंशय मोठा होता. अनंतरावांची ' मौज ' ही साहित्यप्रिय सुशिक्षितांसाठीं नव्हती. अच्युतरावांच्या ' संदेश ' मुळें महाराष्ट्रांतील बहुजनसमाजामधून वृत्तपत्रीय वाचकांचा जो एक मोठा वग निर्माण झाला होता त्याच वर्गाचें साप्ताहिक मनोरंजक करण्यासाठीं अनंतरावांची ' मौज ' अवतीर्ण झालेली होती. ' मौज ' चा ढंग आणि थाट सर्व अच्युतरावी वळणामधून निर्माण झालेला असला तरी त्यावर अनंतरावांच्या वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्वाची छाप होतीच होती. जन्मापासूनच

'मौजे' ला विलक्षण लोकप्रियता प्राप्त झाली! आणि 'मौजे' च्या दिवाळी अंकानें तर लोकप्रियतेचा अधिकच उच्चांक गांठला!

'मौजे' चा आणि अनंतरावांचा, मला वाटतें, सातएक वर्षं संबंध होता. या काळांत अनंतरावांनीं आपल्या लेखनकौशल्याचे विविध चमत्कार वाचकांना दाखविले. अनेक प्रतिपक्ष्यांवर टीकांची झोड उठवून अनंतरावांनीं त्यांचीं हाडें खिळखिळीं करून टाकिलीं. प्रा. ना. सी. फडके यांना तर अनंतरावांनीं पळतां भुई थोडी करून टाकिली. स्वतःचें नांव प्रसिद्ध न करतां बुरख्याआडून दुसऱ्यावर गोळ्या झाडण्याची प्रा. ना. सी. फडके यांची संवय फार जुनी आहे! आज 'झंकार' मध्यें 'मं. द. वागळे' हें टोपण नांव धारण करून फडके ज्या शिव्या देत आहेत, त्या परंपरेची सुरुवात वीस वर्षांपूर्वी मुंबईला 'विनोद' नांवाचें एक पत्र निघत होतें त्यामधून फडके यांनीं प्रथम केली. अनंतराव जोगेश्वरीच्या नाक्यावर 'आवळेल तेल' विकीत होते. त्याचा फायदा घेऊन फडक्यांनीं त्यांना 'आवळेल अनंत' अशी शिवीगाळ करावयास सुरुवात केली. त्यावर 'फडक्यांतला विंचू' म्हणून अनंतरावांनीं फडक्यांना साक्षात् आपल्या कोंकणी पायतणानेंच ठेंचून काढलें! अनंतरावांच्या त्या टीकेमुळेंच फडक्यांना मुंबई सोडून पसार व्हावें लागलें!

अनंतरावांची टीका करण्याची पद्धति अगदीं एखाद्या रांगडी शिपाई गड्यासारखी होती! म्हणजे अगदीं सरळ आणि छातीठोक! त्यांत प्रा. ना. सी. फडक्यांप्रमाणें मत्सर, असूया किंवा खुनशीपणा बिलकूल नसे. दोन टोले द्यायचे, दोन टोले घ्यायचे हा अनंतरावांचा बाणा असे. शिवाय, त्यांचें भांडण काय जें असायचें तें केवळ वर्तमानपत्रापुरतें! एरवीं ते आपल्या प्रतिपक्ष्याबद्दल चुकून कधीं वाईट बोलायचे नाहींत! वाटेंत तो सहज भेटलाच तर त्याच्याशीं हंसून खेळून चार गप्पा मारल्यावांचून ते रहायचे नाहींत! 'मौज'मध्यें अनंतरावांनीं नाना तऱ्हेचीं लोकप्रिय सदरें सुरू केलीं. त्यांत 'विलायती सुधारणेचा ओम्फस्' आणि हडपांच्या कादंबऱ्या हीं सदरें खूपच लोकप्रिय झालीं. त्यांनीं केलेलें 'साप्ताहिक भविष्या 'चें भूत तर आज बहुतेक साऱ्या वर्तमानपत्रांच्या बोकांडीं बसून त्यांना छळतेंच आहे!

अच्युतरावांप्रमाणेंच अनंतरावांचें आणि पैशाचें सूत पहिल्यापासून कधीं जमलें नाहीं. काय व्हायचें कोणास ठाऊक! जेवढा म्हणून कांहीं त्यांना पैसा

मिळे तेवढा सारा ह्या ना त्या भानगडींत पसार होत असे. शेवटीं आमचे अनंतराव आपले कफल्लुक ते कफल्लुकच ! सात वर्षांनंतर छापखान्यासकट 'मौज' त्यांच्या हातून जी निसटली ती पांडोबा भागवतांनीं कांहीं काळ सांवरून धरली; पण पांडोबांचें अन् अनंतरावांचें पटेना ! दोघांच्याहि स्वभावांत जमीन-अस्मानाचें अंतर. म्हणजे पांडोबा जमिनीवर तर अनंतराव अस्मानांत ! शेवटीं पांडोबांच्या गळ्यांत 'जुनी मौज' अडकवून देऊन अनंतराव बाजूला झाले आणि चिडून त्यांनीं 'नवी मौज' सुरू केली. पण 'पहिल्या मौजे'ची भट्टी कांहीं 'दुसऱ्या मौजे'त जमली नाहीं ! एकदां पहिली घडी जी विसकटली ती विसकटलीच ! खुद्द अनंतरावांच्या ध्यानांत ही गोष्ट जेव्हां आली तेव्हां वृत्तपत्राच्या जगाला रामराम ठोकून त्यांनीं सरळ नाट्य-सृष्टीचा रस्ता सुधारला !

अच्युतरावांसारखा अनंतरावांनाहि नाटकाचा पुष्कळ वर्षांपासून नाद लाग-लेला होता. अच्युतरावांनीं 'नारिंगी निशाण' हें नाटक लिहून आपल्या रंग-भूमीच्या सेवेचें निशाण रोवलें. त्यानंतर स्वतःचा नाट्यसंच घेऊन त्यांनीं साऱ्या महाराष्ट्रांत संचार केला, आणि वर्तमानपत्रांत त्यांना आलेला आर्थिक तोटा बऱ्याच अंशीं भरून काढण्याचा प्रयत्न केला. 'नवी मौज' बंद करून 'मुंबई नाटिका मंडळी' सुरू करण्यांत अनंतरावांनींहि आपल्या गुरू-च्याच पावलावर पाऊल टाकलें. तत्पूर्वी 'स्वराज्यसुंदरी' आणि 'माझा देश' हीं दोन नाटकें लिहून अनंतराव हे नाटककार बनलेलेच होते. 'स्वराज्यसुंदरी'त त्यांनीं दादाभाई नौरोजींचें भूत रंगभूमीवर आणून खूपच गंमत केली होती. ही नाटिका मंडळी काढून मराठीमध्यें अनंतरावांनीं नाटि-कासांप्रदाय चांगलाच लोकप्रिय केला. त्यांनीं एकंदर नऊ नाटिका लिहिल्या. त्या कमीअधिक प्रमाणांत सर्वच लोकप्रिय झाल्या.

साहित्यदृष्ट्या अनंतरावांच्या या नाटिका सामान्य आहेत हें खरें; पण बहुजनसमाजाचें मनोरंजन करण्याच्या दृष्टीनें त्या फारच यशस्वी ठरल्या. या नाटिकांचे मुंबईंत आणि इतरत्र शेंकडों प्रयोग झाले. एकेका दिवशीं तर त्यांचे तीन तीन प्रयोग होत. आज नवीन चित्रपट लागायचे वेळीं चित्र-मंदिराबाहेर लोकांचा जसा तोबा उडतो, अगदीं तशी गर्दी या नाटिकांच्या प्रयोगाच्या वेळीं नाटकगृहाबाहेर होई. या बाबतींत अनंतरावांनीं जें विलक्षण

यश मिळविलें तें खरोखरच दृष्ट लागण्यासारखें होतें. आणि खरें सांगायचें म्हणजे, अनंतरावांच्या या नाटिका मंडळीला 'कुणा तरी मेल्याची' दृष्टच लागली! तीन वर्षें चालवून ती मंडळी त्यांना नागपूर येथें बंद करावी लागली. त्या वेळीं अनंतरावांची परिस्थिति इतकी बिकट होती कीं, मुंबईला परत यायला त्यांच्याजवळ भाड्याचे देखील पैसे नव्हते!

तथापि नाट्यसृष्टींतल्या पराभवानें अनंतराव खचले नाहींत! तो मुळीं त्यांचा स्वभावच नव्हता! थोडा वेळ त्यांनीं विसांवा घेतला असेल इतकेंच! त्यांच्यांत दडून बसलेला 'अच्युतराव' त्यांना थोडाच स्वस्थ बसूं देतो? 'निर्भीड' पत्र काढून अनंतरावांनीं वृत्तपत्रसृष्टींत फिरून जोरजोरानें गर्जायला सुरुवात केली. याच वेळीं अनंतरावांचा आणि माझा आयुष्यांत प्रथम प्रत्यक्ष असा संबंध आला. पुण्यांत प्लेग असल्यानें मी त्या वेळीं मुंबई येथें मुक्काम करून होतों. या मुक्कामांत माझा आणि मामा वरेरकरांचा वाद सुरू झाला. हा वाद निर्माण व्हायला आणि अनंतरावांचा 'निर्भीड' निघायला एकच गांठ पडली. मलाहि वर्तमानपत्र पाहिजे होतें आणि अनंतरावांनाहि असला एकादा वाद पाहिजे होता. त्यामुळें साहाजिकच माझें आणि अनंतरावांचें गोत्र तावडतोब जमलें. 'निर्भीड'च्या पहिल्या अंकापासून तों सातआठ अंक आमचा वाद एकाद्या महायुद्धाच्या तीव्रतेनें चाललेला होता. त्यामुळें 'निर्भीड'चा खप एखाद्या वणव्याप्रमाणें महाराष्ट्रांत पसरला. दोनतीन वर्षें अनंतरावांनीं 'निर्भीड' पत्र उत्तम तऱ्हेनें चालविलें. या पत्रामध्यें त्यांचें स्वतःचें विशेष लोकप्रिय झालेलें असें सदर म्हटलें म्हणजे त्यांच्या 'निर्भीड नाटिका.' प्रचलित विषयावर आधारलेलें गरमागरम, खमंग आणि संगीत नाट्य लिहिण्यांत अनंतरावांची लेखणी चांगली कुशल आहे. आणि लोकप्रिय चालींवर विडंबन पद्यें झपाट्यानें रचण्यांत तर ते चांगलेच वाकबगार आहेत. दोनतीन वर्षें 'निर्भीड' पत्र उत्तम तऱ्हेनें चालाविल्यावर अनंतरावांच्या आयुष्यांत एकाएकीं क्रांति झाली. सावरकरांच्या प्रेरणेनें त्यांचें लक्ष एकदम समाजसेवेकडे वळलें आणि त्यांच्या जीवनांतील एका नवीन कालखंडाला सुरुवात झाली.

सावरकर निर्बंधमुक्त झाले त्या दिवशीं मी कोल्हापूरला होतों. दुसऱ्या दिवशीं अनंतराव एकदम माझ्यापुढें प्रकट झाले, आणि रत्नागिरीला चला

म्हणून म्हणाले. माझ्या मोटारींतून आम्ही दोघेहि सावरकरांकडे गेलों. तेथें एकदोन दिवस राहिलों. सावरकरांना त्या वेळीं राजकीय भमिका अशी कोणतीच नव्हती. त्यामुळें आमची आणि सावरकरांची जी भाषा झाली, ती केवळ जात्युच्छेदनाच्या आणि अस्पृश्यतानिवारणाच्या चळवळीपुरतीच ! झुणकाभाकर भोजनाची चळवळ सुरू करण्याची स्फूर्ति सावरकरांकडून घेऊन आम्ही दोघेहि देशावर परतलों. अर्थात् त्या बाबतींत पुढें सारा पुढाकार अनंतरावांनींच पत्करला. मी केवळ त्यांचा एक सहकारी म्हणूनच होतों. त्यानंतर एक वर्षभर साऱ्या महाराष्ट्रांत झुणकाभाकर भोजनाची चळवळ अनंतरावांनीं खूपच गाजविली. पुष्कळदां आम्ही दोघे बरोबरच संचार करीत होतों.

झुणकाभाकर भोजनाच्या चळवळींत प्रकट झालेला अनंतरावांचा उत्साह, कळकळ आणि कार्यनिष्ठा खरोखरच अवर्णनीय होती. एकदां कांहीं करावयाचें अनंतरावांनीं डोक्यांत घेतलें कीं, त्यांच्या कामाला नि श्रमाला अंत नसे ! या साऱ्या भानगडींत आणि गडबडींत अनंतरावांचें ' निर्भीड ' पत्र मात्र सफा झालें, आणि त्यांच्या खिशाला आणि पदराला चांगलाच चट्टा बसला. एक गोष्ट मात्र त्यांनीं साधली; ती म्हणजे वक्तृत्व. या चळवळीच्या निमित्तानें जाहीर भाषणें करण्यास अनंतरावांनीं प्रथम सुरुवात केली. आणि थोड्या वेळांतच उत्तम वक्ते म्हणून त्यांनीं चोंहींकडे नांव मिळविलें. अनंतराव वक्ते आणि मी अध्यक्ष, किंवा मी वक्ता आणि अनंतराव अध्यक्ष असे आलटून पालटून कार्यक्रम करीत करीत आम्हीं पुष्कळशा गांवांतून हिंडलों आहोंत आणि मोठमोठ्या सभा गाजविल्या आहेत. झुणकाभाकर चळवळींत अनंतरावांचा आणि माझा जो ऋणानुबंध जडला त्याचें एक निदर्शक म्हणून मी माझें ' वंदे मातरम् ' नाटक त्यांनाच अर्पण करून टाकलें.

नाट्यसृष्टीचा संबंध सुटल्यानंतर मध्यंतरीं चित्रपटासारख्या अद्भुतरम्य जगाकडे अनंतराव आकर्षिले जावेत हें त्यांच्या स्वभावाला शोभण्यासारखेंच होतें. कांहीं तरी प्रचंड करून दाखवावें आणि लोकांना आश्चर्यानें बेशुद्ध पाडावें याची अनंतरावांना भारी खुमखुम ! त्यामुळें चित्रपटाचें वातावरण अनंतरावांच्या प्रकृतीला एकंदर अधिक मानवण्यासारखें होतें. तथापि नाटकमंडळी चालविण्याचा जो अतिशय वाईट अनुभव अनंतरावांना आला त्यामुळें पैशाच्या अधिक उचापती करीत बसण्याची त्यांना दडसच बसली.

ते जर खरोखरच त्या भानगडींत पडते तर त्यांनीं त्या काळांत कांहींतरी खूपच गंमत करून दाखविली असती यांत शंका नाहीं. चित्रपटांचा आणि अनंतरावांचा जो संबंध आला तो केवळ वृत्तपत्रीय प्रसिद्धीकरणापुरता; पण त्यांतहि अनंतरावांनीं एक शास्त्रच निर्माण करून ठेविलें आहे. आज एकाद्या चित्रपटाची आरंभापासून अखेरीपर्यंत प्रसिद्धि करण्याच्या ज्या कांहीं हजार लटपटी आणि खटपटी निघालेल्या आहेत, त्यांपैकीं पुष्कळशा अनंतरावांच्या डोक्यांतूनच निघालेल्या आहेत. त्या लोकांच्या आतां इतक्या परिचयाच्या झालेल्या आहेत कीं, त्या आरंभीं कोणीं शोधून काढल्या असाव्यात याचा विचार करण्याइतकें देखील कुतूहल त्यांच्यामध्यें उरलेलें नाहीं. पण कांहीं म्हटलें तरी चित्रपटांच्या प्रसिद्धीकरणशास्त्राचा ओनामा अनंतरावांनींच घालून दिला यांत शंका नाहीं.

बोलपटनिर्मितीशीं अनंतरावांचा एकदांच संबंध आला, तो म्हणजे ' संत नामदेव ' या बोलपटाशीं. त्या बोलपटाचे सूत्रधार म्हणून त्यांची नेमणूक झाली. पण एकटा सूत्रधार बिचारा काय करणार? त्यांच्या स्वाधीन केलेलीं पात्रेंच अशीं कांहीं नमुनेदार होतीं कीं, प्रत्यक्ष ब्रह्मदेवालाहि त्यांच्याकडून कामें करवून घेणें जमलें नसतें! म्हणून या बोलपटाचें शेवटीं जें काय व्हावयाचें तेंच झालें. आज या बोलपटाचें नांवदेखिल कोणाच्या ध्यानांत नाहीं. पण त्या बोलपटाची अनंतरावांनीं जीं ' गरगरा ' छाप प्रसिद्धि केली होती त्यामधला ' गरगरा ' हा शब्द मात्र मराठीमध्यें कायमचा मुक्काम करून बसलेला आहे. हा बोलपट पुण्याला जेव्हां प्रथम लागला त्या वेळची एक गोष्ट मला आठवते. पहिल्या प्रयोगाचा अध्यक्ष होतों मी. पुण्यांतले बरेचसे साहित्यिक आणि वृत्तपत्रकर्ते बोलावलेले होते. बाकीची गर्दी होती आपली बेतास बात. चित्रपट बघून झाल्यानंतर आमंत्रित मंडळी गंभीर चेहेरे करून आणि अनंतरावांना चुकवून परस्पर पसार झाली! कारण अनंतरावांना भेटून सांगण्यासारखें विशेष कांहीं नव्हतेंच त्या चित्रपटांत! पण निदान शिष्टाचार म्हणून तरी त्यांनीं जातां जातां अनंतरावांना भेटावयास हवें होतें. त्या गोष्टीचा अनंतरावांना भारी विषाद वाटला. खिन्न चेहरा करून विडी फुंकीत ते एकटेच खुर्चीवर बसले होते. मीं विचारलें, " काय, अनंतराव, विशेष कांहीं ? " अनंतराव एक बिडीचा झुरका मारून एकदम गरजले, " काय हलकट आहेत

तुमचे हे पुण्याचे लोक !" मी चांगला हदरलोंच. म्हटलें, "काय, झालें काय ?" अनंतराव गंभीर चेहरा करून म्हणाले, "जातांना एक तरी लेकाचा मला भेटून गेला का ? मी म्हणतों, असेल आमचा चित्रपट भिकार ! पण कांहीं 'मॅनर्स' आहेत कीं नाहींत ? यांना आमंत्रण करून आम्हीं मुद्दाम बोलावलें, त्याबद्दल जातांना एकादा नमस्कार, निदान विचारणें तरी– " अनंतराव त्या दिवशीं असे खवळले होते कीं कांहीं विचारूं नका. ती आठवण झाली कीं, मला अजून हंसूं येतें. अर्थात् अशा तऱ्हेनें चिडण्याचा अनंतरावांचा कांहीं स्वभाव नाहीं ! पण कधीं कधीं उखडते स्वारी !

धाडसी संपादक, यशस्वी नाटिकाकार आणि कर्ते सुधारक म्हणून अनंतरावांनीं जितका नांवलौकिक मिळविला, तितकीच किंवा कांकणभर अधिकच कीर्ति त्यांनीं प्रसिद्धिपटु म्हणून मिळविली. 'अमृतमंथन' या 'प्रभात'-च्या यशस्वी बोलपटाच्या प्रसिद्धीकरणाचें पुष्कळसें श्रेय अनंतरावांनाच द्यावें लागेल. 'बालमोहन नाटकमंडळी' माझें 'घराबाहेर' नाटक घेऊन जेव्हां प्रथम मुंबईस आली, तेव्हां त्या नाटकाचे 'रॉयल ऑपेरा हाऊस'मध्यें होणारे प्रयोग पहाण्यासाठीं सारी मुंबई घराबाहेर खेचून काढण्याचें काम अनंतरावांनीं मोठ्या सफाईनें केलें ! "हाऊस फुल्ल" हा शब्द त्याच वेळीं त्यांनीं निर्माण केला. जाहिरातींच्या निमित्तानें अनंतरावांनीं असे कितीतरी नवीन नवीन शब्द निर्माण करून मराठी भाषेंत रूढ केलेले आहेत ! 'दणदणीत,' 'दणकेबाज,' 'गर्जून,' 'गरगरां गरगरां,' 'तडाखेबंद' ही सारी अनंतरावांनींच निर्माण केलेली प्रजा आहे ! प्रत्येक नाटकाच्या किंवा चित्रपटाच्या वेळीं निरनिराळ्या जाहिरातींच्या कल्पत्या काढण्यांत अनंतरावांचें डोकें चांगलेंच तरबेज आहे. महाराष्ट्रांतले पहिले प्रसिद्धिशास्त्रविशारद म्हणून त्यांचा केव्हांहि अभिमानानेंच उल्लेख करावयाला पाहिजे. या त्यांच्या गुणावर बहाल होऊन एका व्याख्यानांत सहज स्फूर्तीनें मीं त्यांना 'जाहिरात-जनार्दन' ही पदवी देऊन-टाकली, ती आज त्यांना चांगलीच चिकटून बसल्यासारखी दिसते !

वर्तमानपत्रांच्या, नाटकांच्या आणि समाजसेवेच्या या अतिरिक्त वेडामुळें, नादामुळें किंवा छांदिष्टपणामुळें, अनंतरावांनीं आपल्या स्वतःच्या आयुष्याचें आणि संसाराचें अगदीं 'गरगरां' करून टाकलें आहे असें म्हणायला कांहीं हरकत नाहीं. अनंतरावांना स्वतःचें आयुष्य असें कांहीं नाहीं ! सकाळीं

वर्तमानपत्रांचें आणि कात्रणांचें एक पुडकें कांखोटीला मारून आणि गळ्याला उपरणें गुंडाळून विडी फुंकीत फुंकीत ही स्वारी 'सेंट्रल सिनेमा' च्या डाव्या गल्लींतून भ्रमिष्ट चेहऱ्यानें आणि धिम्या पावलांनीं जी बाहेर पडते ती खरेंच पुन्हां आपल्या घरीं सुखरूप पोहोंचत असेल किंवा काय याची बघणारालादेखील शंका वाटल्यावांचून रहात नाहीं. अनंतरावांच्या घरांत अधून मधून पाळणा हलत असतो म्हणूनच समजायचें, कीं ही स्वारी रात्रौ घरींच मुक्कामाला येत असावी ! नाहीं तर दिवसांतून चोवीस तास यांच्या पायाला आपलें चक्र बांधलेलें आहे ! एकदां यांची एक लहान मुलगी वारली. त्या वेळीं हे घरांत नव्हते. तेव्हां त्यांना शोधायचें काम माझ्याकडे आलें. तास दीड तासानें मीं त्यांचा पत्ता काढला आणि त्यांना सांगितलें. तेव्हां चिंतातुर चेहरा करून हे पुटपुटले, " कोणती मुलगी कोणास ठाऊक ! " . यावरून मी काय म्हणतों तें लक्षांत येईल.

खाण्यापिण्याची तर अनंतरावांना आठवणहि नसते. कित्येक वर्षे स्वारी ताकावरच राहिलेली होती. पुन्हां त्यांनीं जेवायला कधीं सुरुवात केली कोणास ठाऊक ! केशभूषा आणि वेषभूषा यांचीहि त्यांना कधीं फिकीर नाहीं. दोनतीन दिवसांनीं कधीं आठवण झाली म्हणजे सेफ्टी वस्तऱ्याचें नुसतेंच एक पातें हातांत घेतात आणी दाढीला पाणी किंवा साबण न लावतां अथवा समोर आरसा न धरतां ते त्या पात्यानें आपली दाढी कशीतरी खरडून काढतात. गाल चारदोन ठिकाणीं कापून त्यांतून रक्त निघालें तर त्याची त्यांना पर्वाहि नसते. शांतपणें उपरण्यानें ते आपले टिपतच असतात. केस कापायलादेखील ते सलूनमध्यें असे कधींच जात नाहींत. वरच्या डोक्याला तर त्यांना टक्कलच पडलेलें आहे; पण डोक्यामागले वाढलेले केस कापण्याचें काम वस्तऱ्याचें पातें घेऊन ते स्वतःच करतात. त्यांना पडशाचा आणि अपचनाचा बराचसा उपद्रव होत असतो. त्यामुळें सकाळीं उठल्यावर नाकामध्यें ' अमृतांजन ' चोळणें आणि रात्रीं निजायच्यापूर्वी 'हिंगाष्टका' ची किंवा ' सोनामुखी ' ची पुडी घेणें हा त्यांचा ठराविक व्यवसाय झाला आहे ! आणि तो त्यांच्या तऱ्हेवाईकपणाला चांगलाच शोभण्यासारखा आहे. अनंतरावांना जर अतिशय व्यसन कशाचें असेल तर तें विड्यांचें ! विड्यांचें आणि कागदांचें एक एक बंडल देऊन त्यांना एका खोलींत बसविलें तर अखंड चोवीस तासांत ते एकादें

संपूर्ण नाटक किंवा वर्तमानपत्राचा खास अंक निर्माण करूं शकतील ! असा विक्रम पूर्वी त्यांनीं अनेक वेळां करून दाखविलेला आहे.

अनंतरावांना कंटाळा म्हणन कसा तो माहीतच नाहीं. प्रत्येक गोष्टीची त्यांना जबरदस्त हौस ! ' नाहीं ' हा शब्द त्यांच्या तोंडून कधीं निघायचाच नाहीं. आणि एकादी गोष्ट त्यांनीं हातीं घेतली कीं रडत म्हणून ते कधींच माघारीं यायचे नाहींत. साहित्यिकांचें नाटक करायचें म्हटलें; अनंतरावांचें पाऊल सर्वांच्या पुढें ! दिवसभर सारे धंदे करून रात्रीं तालमीला अगदीं वेळेवर हजर ! डोक्यांत हजार गोष्टी; मग भाषणाची नक्कल कोठून पाठ होणार ? पण त्याबद्दल वांकडें तोंड म्हणून नाहीं ! अनंतराव, हें आयत्या वेळीं व्हायचें कसें ? ' अशी कोणीं शंका काढली तर ' बरोबर होईल, कांहीं काळजी करूं नका ! ' म्हणून अनंतरावांनीं ठासून आश्वासन दिलेंच समजा ! अनंतरावांसारखा धीराचा माणूस संसारांत क्वचित्‌च मिळतो. आयुष्यांत अप्रिय गोष्टी शेंकडों घडत असतात आणि त्यामुळें माणसाचें मन नेहमीं अस्वस्थ होतें; पण अनंतरावांना वाईटांतून नेहमीं चांगलेंच दिसतें. " अरे, खूप मजा आला ! असें ' फाईन ' झालें म्हणतां ! लोकांनीं खूप ' एन्जॉय ' केलं !" असें अनंतरावांनीं हंसून म्हटलें नाहीं, असें व्हायचें नाहीं !

अनंतरावांच्या खिशांत रोज सतराशें साठ लफडीं असायचीं. तीं ते रोजच्या रोज कशी निस्तारीत असतील तें तो ' आकाशांतला हरी ' किंवा पृथ्वीवरचा हा ' अनंत हरी ' च जाणे ! पण त्यामुळें त्यांच्या वृत्तीचें गांभीर्य किंवा विचाराची स्थिरता मात्र कधींहि ढळलेली दिसून येत नाहीं. अनंतरावांच्या शब्दकोशांत ' स्वार्थ ' हा शब्दच नाहीं. जें आजपर्यंत त्यांनीं कांहीं केलें तें दुसऱ्यासाठीं ! स्वतःच्या संसाराची त्यांनीं कधींहि पर्वा केली नसली तरी, शेंकडों लोकांचे संसार त्यांनीं साक्षात् उभे केले आहेत ! कोणत्या माणसाला त्यांनीं कशी मदत केली हें जसें तीं माणसें विसरून गेलीं तसे ते स्वतःहि खरोखरच विसरून गेले असतील ! कोणाचेंहि वाईट व्हावें किंवा वाईट करावें अशी त्यांनीं कधींहि बुद्धि बाळगलेली नाहीं. इतका प्रेमळ, प्रामाणिक आणि निर्मत्सरी माणूस निदान माझ्या तरी आढळांत नाहीं. मराठी वृत्तपत्र-साहित्याची अनंतरावांनीं जशी अनमोल सेवा केलेली आहे, तशी अच्युतराव कोल्हटकरांचे निवडक लेख खंडशः प्रसिद्ध करून मराठींतील वैचारिक

वाङ्मयाचीहि त्यांनीं फार मोठी सेवा केलेली आहे. किंबहुना अनंतरावांनीं हें काम जर धडाडीनें हातीं घेतलें नसतें तर अच्युतरावांचें सारें लिखाण आजपर्यंत अंधारांतच राहिलें असतें, हें अगदीं निश्चित!

इतकें सारें म्हटलें तरी, अनंतरावांना आयुष्यांत एकंदरींत यश असें फार कमी! सारा जन्म त्यांचा रखडण्यांत आणि धडपडण्यांतच गेला आहे! अजूनहि जाईल! त्यांच्याबद्दल चांगलें बोलणारीं माणसें फार कमी! कोणी कांहीं, कोणी कांहीं, आपला त्यांच्या विरुद्धच बोलत असणार. पण या गोष्टीबद्दल अनंतरावांनीं आपल्या मनाला कधीं खंत लावून घेतली नाहीं. 'आपण आतां थकलों आहोंत–लौकरच सेवानिवृत्त होण्याचा आपला विचार आहे!' असें ते कालपरवांपासून म्हणूं लागले आहेत; पण तें कांहीं खरें नव्हे! आज त्यांच्या चित्रपट-प्रसिद्धीकरण-व्यवसायाचा रौप्यमहोत्सव आहे. या प्रसंगीं त्यांना धन्यवाद देण्यासाठीं त्यांचे शेंकडों हितचिंतक एकत्र जमणार आहेत. तो रोमहर्षक मेळावा एकदां त्यांच्या दृष्टीस पडला कीं, हा थकलेला अनंतराव उपरणें सरसावून एकदम ताठ उभा राहील आणि गर्जून म्हणेल कीं, 'मित्रहो, मीं रिटायर होण्याचें ठरविलें होतें; पण आतां तुम्हांला बघून तो माझा बेत मीं रद्द केला आहे! एवढेंच काय, पण यापुढें प्राण गेला तरी मी रिटायर होणार नाहीं–तुमचीच सेवा करीत जगेन आणि तुमचीच सेवा करीत मरेन!'

खरेंच, अनंतराव म्हणजे एक गंमत आहे, अनंतराव म्हणजे एक मौज आहे. कोणी कांहींहि म्हणो, मला तर अनंतराव म्हणजे लाख माणूस वाटतो!

## आमचे सनातनी दोस्त कृष्णराव मराठे !

मराठी साहित्यांतील अश्लीलतेचा पाठपुरावा, स्वतःच्या भल्याबुऱ्या समजुतीं-प्रमाणें का होईना, पण गेलीं बारा वर्षें सतत अगदीं आकसानें करणारे पुण्याचे श्री. कृष्णराव मराठे आज महाराष्ट्रांत कोणाला माहीत नाहींत ? पुण्याच्या बोळां-तील आणि गल्ल्यांतील घाण हुडकीत रोज सकाळ-दुपार हिंडणाऱ्या म्युनि-सिपालिटीच्या सॅनिटरी 'इन्स्पेक्टरा'प्रमाणें श्री. कृष्णराव मराठे हे गेलीं बारा वर्षें मराठी साहित्यांतली घाण तपासून बाहेर काढण्याचें काम स्वतःच्या खर्चानें करीत आहेत ही गोष्ट कोणाला ठाऊक नाहीं बरें ? लांबून सॅनिटरी इन्स्पेक्टराचा खाकी डगला दिसला कीं, रस्त्याच्या कडेला 'बसलेलीं' पुण्यांतील पोरेंसोरें पटापट मागल्या मागें आपल्या घरांत ज्याप्रमाणें पळत सुटतात, त्याप्रमाणें ज्यांच्या धाकानें आणि भीतीनें मराठी साहित्यांतील पुष्कळशा टारगट पोरांनीं आजकाल 'रस्त्यावर बसण्याचें' जवळ जवळ वर्ज्यच केलें आहे, त्या कृष्ण-राव मराठ्यांची मराठी वाङ्मयांतील कामगिरी कोण जाणीत नाहीं बरें ?

अश्लीलतासंशोधनाच्या या बेसुमार नादामुळें 'अश्लील मराठे' म्हणून साऱ्या महाराष्ट्रानें त्यांची चेष्टा केली तरी देखील त्या चेष्टेला न जुमानतां ज्यांनीं आपला सदरहू उपद्याप एखाद्या मिशनऱ्याच्या निगरगट्टपणानें चालू ठेवला त्या चिवट आणि चिकट वृत्तीच्या कृष्णराव मराठ्यांना आज महराष्ट्रांत कोण ओळ-खीत नाहीं बरें ? 'कृष्णराव मराठे' हें नांव ऐकतांच कोणालाहि हंसूं आवरणें जरा जडच जातें. तरुण मंडळी मोठमोठ्यानें हंसतात; तर वृद्ध मंडळीहि उपर-ण्याच्या आड तोंड दडवून स्मित केल्यावांचून रहात नाहींत. कृष्णराव मराठे म्हणजे एक निव्वळ गंमत आहे, एक करमणूक आहे, असेंच ज्याला त्याला आपलें वाटतें ! तथापि, लोकांना काय वाटतें त्याची बिलकूल पर्वा न करतां गालांतल्या गालांत हंसत हंसत आपला खाक्या धीमेपणानें चालू ठेवणारे

कृष्णराव मराठे मराठी साहित्यांत वावरणाऱ्या कोणत्या माणसाच्या परिचयाचे नाहींत बरें ?

कृष्णराव मराठ्यांची आज आवर्जून आम्हांला आठवण होण्याचें कारण असें कीं, गेल्याच आठवड्यांत त्यांच्या वयाला साठ वर्षे पूर्ण झालीं आणि त्यांना एकसष्टावें वर्ष लागलें. त्या निमित्तानें पुण्यामध्यें त्यांच्या चाहत्यांकडून त्यांचा गौरव झाला. कृष्णरावांना एकसष्टावें वर्ष लागलें, याबद्दल मलाहि मनापासून आनंद होत आहे. कारण, कृष्णरावांचीं आणि माझीं जाहीर भांडणें आजपर्यंत कितीहि हमरीतुमरीनें झालेलीं असलीं, कृष्णरावांनीं माझा पिच्छा आजपर्यंत कितीहि निकरानें पुरविला असला आणि कृष्णरावांची थट्टा-चेष्टा मीं कितीहि हिरीरीनें यापर्वी केलेली असली किंवा त्यांच्या मतांची टर मीं कितीहि कडक शब्दांत आजपर्यंत उडविलेली असली तरी आमचा हा विरोध केवळ तत्त्वाचा आहे, भिन्न विचारसरणीचा आणि दृष्टिकोणाचा आहे. दोघांच्याहि मनांत एकमेकांबद्दल वैयक्तिक द्वेष किंवा असूया अशी कांहीं नाहीं हें आम्ही दोघेहि पक्केपणानें ओळखून आहोंत. म्हणून आम्हां दोघांची एरवीं कधींहि गांठ पडली तरी आम्ही तोंडें चुकवून एकमेकांना कधींच टाळीत नाहीं. उलट थोडा वेळ उभें राहून चारदोन गमतीच्या गप्पा मारतों आणि मगच पुढें जातों ! कृष्णराव मराठ्यांची आणि माझी अशा स्वरूपाची ‘ दोस्ती ’ असल्यामुळें त्यांच्या एकसष्टीच्या गौरवांत मला सामील होण्यास कोणत्याहि तऱ्हेचा संकोच वाटत नाहीं, हें मी मोठ्या आनंदानें मान्य करतों.

कृष्णराव मराठे यांच्या आणि माझ्या ‘दोस्ती’चें स्वरूप सर्वस्वीं सार्वजनिक आहे. इतक्या वर्षांची त्यांची आणि माझी ओळख असून आणि इतकीं वर्षें आम्ही दोघे पुण्यांत राहात असूनहि त्यांची वैयक्तिक अशी मला फारच थोडी माहिती आहे. पुण्यांत ते कोठें रहातात हेंदेखील मला माहीत नाहीं, याचें कारण कृष्णराव हे अत्यंत भिडस्त आणि प्रसिद्धिपराङ्मुख गृहस्थ आहेत. त्यांना आज महाराष्ट्रांत जी एवढी प्रसिद्धि मिळालेली आहे, ती केवळ त्यांच्या उद्योगवैशिष्ट्यामुळें त्यांच्या गळीं पडलेली आहे. त्याला त्यांचा खरोखरच नाइलाज आहे. स्वतःच्या नांवाचा गाजावाजा न करतां केवळ कार्यावर दृष्टि ठेवून वागणारे असे ते एक मोठे सालस गृहस्थ आहेत.

१९३१ सालीं कोल्हापूर येथें जें साहित्यसंमेलन भरलें होतें त्या संमेलनांत कृष्णराव मराठे पहिल्यानें अवतीर्ण झाले. पुण्याहून एका पिशवींत बऱ्याचशा ‘ अश्लील ’ पुस्तकांचा गठ्ठा भरून आणि त्यांतील भयंकर अवतरणांनीं बऱ्याचशा वह्या खच्चून भरून काढून स्वारी कोल्हापूरला आली होती. त्यांच्याबरोबर प्रवास करणाऱ्या मंडळींची त्यांच्या पिशवीमधील निवडक पुस्तकांतील आणि वह्यांतील इरसाल उतारे वाचून मात्र खूपच करमणूक झाली. मराठी साहित्याशीं कोणत्याहि तऱ्हेनें संबंध नसतांना केवळ ‘ अश्लील ’ साहित्याचें बारदान घेऊन हा भला गृहस्थ या साहित्यसंमेलनांत कां उपस्थित झालेला आहे याची कोणालाहि त्या वेळीं कल्पना झाली नाहीं ! साहित्यसंमेलन म्हणजे प्रथितयश विद्वानांचा, लेखकांचा आणि कवींचा मेळावा ! सामान्य लेखकांची जेथें डाळ शिजणें कठीण, तेथें कृष्णरावांसारख्या अलबत्यागलबत्याला कोण विचारणार ? तथापि, त्यामुळें हा बावळट चेहऱ्याचा ब्राह्मण बावचळला नाहीं. तो आपलें विलक्षण बाड घेऊन संमेलनामधून शांतपणें फिरतच होता. सुरुवातीला त्याचें म्हणणें गंभीरपणें ऐकून घ्यायला कोणीहि तयार नव्हता. पाठ फिरतांच जो तो त्यांची थट्टाच करीत होता. तथापि, त्यामुळें त्यांनीं आपला प्रचार कांहीं सोडला नाहीं. हळूहळू त्यांनीं आपलें म्हणणें कांहीं मंडळींच्या तरी गळीं उतरविलें आणि ‘ अश्लील वाङ्मयाचा निषेध ’ संमेलनांत करण्याच्या ठरावाचें तट्टू त्यांनीं चार पायांवर तरी उभें करविलें.

विषयनियामक मंडळांत या विषयावर जेव्हां चर्चा झाली, तेव्हां कृष्णराव मराठे आपलें भयंकर बाड घेऊन बोलावयाला उभे राहिले. आयुष्यांत जाहीरपणें त्या विषयावर बोलण्याची अशी त्यांची ती पहिलीच वेळ असावी. कृष्णराव मराठे यांच्याजवळ त्या वेळींहि वक्तृत्व नव्हतें आणि आजहि पण नाहीं. तथापि आपलें म्हणणें श्रोत्यांना रेटून सांगायचें एवढें मात्र त्यांना उत्तम माहीत आहे. ‘ अश्लील वाङ्मयांतील उतारे ’ जेव्हां त्या सभेंत कृष्णराव वाचून दाखवूं लागले, तेव्हां एका शिष्ट भगिनीनें आरडाओरड करून त्यांना ‘ सबूर ’ केलें ! कृष्णरावांची स्थिति त्या वेळीं अतिशय केविलवाणी झाली. ते गयावया करून सांगूं लागले, “अहो, हे कांहीं माझे स्वतःचे उतारे नाहींत. ज्या वाङ्मयाचा येथें निषेध व्हावा असें मला वाटतें तें मी तुम्हांला वाचून

दाखवति आहें ! ” पण कृष्णरावांचें म्हणणें त्या वेळीं कोणींच ऐकून घेतलें नाहीं. त्यांची खूपच तिरपीट उडाली त्यावेळीं ! पुढें खुल्या संमेलनांत कृष्ण-रावांच्या ठरावाचा जो कांहीं बोजवारा वाजायचा तो वाजलाच ! पण परा-भवानें मनावर कसलाहि परिणाम होण्यासारखे कच्च्या काळजाचे कृष्णराव नाहींत.

त्या वर्षापासून जवळजवळ गेलीं बारा वर्षें कृष्णराव मराठे साहित्यसंमेल-नाच्या मागें हात धुवून लागलेले आहेत. किंबहुना कृष्णराव मराठ्यांचा हा मशहूर ठराव हा साहित्यसंमेलनामधील दर वर्षाचा एक ठराविक कार्यक्रमच होऊन बसलेला आहे.संमेलनानें हा त्यांचा ठराव अनेकवेळां धुडकावून लावलेला आहे. दोनतीन वेळां तो पास होऊन त्याच्या अंमलबजावणीसाठीं कमिटीहि नेमण्यांत आली. नाशिक संमेलनांत तर या ठरावाला आम्ही नेस्तनाबूत करून त्याच्या अस्थि गंगेच्या डोहांत टाकून दिल्या होत्या ! पण कृष्णराव मराठ्यांवर त्याचा कांहीं एक परिणाम झालेला नाहीं. त्यांनीं त्या अस्थि शांतपणें ‘ सावडून ’ फिरून सांगली संमेलनांत नेल्या आणि माल्यांच्या हस्तें परत जिवंत करून घेतल्या ! संमेलनाचा अध्यक्ष ज्या मताचा असेल तशी कृष्णरावांच्या ठरावाची वासलात लागते, असें आतां थोडक्यांत एक तंत्रच ठरून गेलेलें आहे.

गेलीं बारा वर्षें कृष्णरावांचें हें काम अव्याहतपणें चाललें आहे; त्यांत खंड म्हणून नाहीं. मधून मधून बारक्यासारक्या ठिकाणीं जाऊन ते आपल्या आव-डत्या विषयावर व्याख्यानेंहि देतात; पण त्यांच्या व्याख्यानाची तऱ्हा आपली ही कीं, आपल्या बाडांतले उतारे श्रोत्यांना वाचून दाखवावयाचे आणि मग म्हणायचे, “ बघा, असें भयंकर हे लोक लिहितात ! हें तुम्हांला पसंत आहे काय ? नाहीं ना ? मग याचा निषेध करा बघूं ! ” कृष्णरावांच्या भोंवतीं त्यांच्या मताचे चारदोन सनातनी प्राणी अधूनमधून जमत असले तरी कृष्णरावांचा तंबू सर्वस्वीं एकखांबी आहे ! सारे श्रम, सारें काज आणि सारा उत्साह एकटा त्यांचा ! बाकीच्यांची नुसती ‘ होला हो ’ इतकेंच !

कृष्णरावांच्या या अश्लीलतासंशोधनाचें पर्यवसान कालांतरानें त्यांचें ‘संस्कृति संरक्षक-मंडळ-स्थापन होण्यांत झालें. या मंडळांत दुसरे पुष्कळ सभासद जरी असले,तरी त्याचे खरे आधारस्तंभ म्हणजे कृष्णरावच ! या मंडळाचा नि आमचा उभा दावा असला तरी गेलीं अनेक वर्षें या मंडळामार्फत कृष्णरावांनीं

मोठ्या चिकाटीनें काम केलें आहे, हें मान्य करावयाला आम्हांला मुळींच संकोच वाटत नाहीं. कुठें एकाद्या कादंबरींत कांहीं 'अश्लील' भाग आला, कुठें रस्त्यावर एकादें नागवें चित्र लागलें किंवा मासिकांत प्रसिद्ध झालें, कुठें चित्रपटांत एकादा हिंदूंच्या धर्मभावना दुखवणारा भाग आला, कुठें एकाद्या नाटकांत मुलेंमुली एकत्र काम करतांना दिसून आलीं कीं, कृष्णराव मराठ्यांच्या या मंडळानें त्या गोष्टीची दखलगिरी घेतलीच म्हणून समजा! सह्या गोळा करणें, सभा भरविणें, पत्रकें काढणें, सरकारदरबारीं अर्ज करणें, हें तंत्र कृष्णरावांना आतां अगदीं हातच्या मळासारखें झालें आहे. या बाबतींत माझी त्यांची दोन वेळां चांगलीच जुंपली होती, हें जगजाहिर आहे! माझ्या 'ब्रॅण्डीच्या बाटली' मधील 'कृष्णराव, चान्स या' हें वाक्य काढून टाकण्यासाठीं त्यांनीं आकाशपाताळ एक करून सोडलें. शिवाजी आखाड्यांतील प्रचंड सभेंत मींहि त्यांचीं हाडें रताळ्याप्रमाणें किसून काढलीं. अर्थात् सेन्सॉर बोर्ड हेंदेखील कृष्णरावांप्रमाणेंच बुरसलेलें सनातनी असल्यानें कृष्णरावांची मागणी त्यानें मान्य केली. कृष्णरावांना वाटलें, आपला जय झाला! मला वाटलें, माझाच जय झाला! कांहीं का असेना; पण त्या वेळेला वादविवादाचा खूपच महापूर उसळला आणि गडगंज गंमत झाली यांत शंका नाहीं!

तीन वर्षांपूर्वी पुण्याला 'कॉंग्रेस हाऊस'च्या मदतीसाठीं कांहीं मुलींनीं 'सौभद्र' नाटकाचा एक प्रयोग माझ्या नेतृत्वाखालीं केला. त्या वेळींदेखील कृष्णरावांनीं आमची फजिती करण्याचा अतिशयच धूर्त डाव रचला होता. त्यांनीं महात्मा गांधींना हळूच एक पत्र लिहिलें आणि विचारलें कीं, 'मुलींनीं नाटकाच्या धंद्यांत काम करणें हें तुम्हांला मान्य आहे कीं नाहीं?' महात्मा गांधींनीं त्यांना उत्तर धाडलें कीं 'हें मला मान्य नाहीं!' तें पत्र कृष्णरावांनीं वर्तमानपत्रांत छापून मुलींच्या नाट्यप्रयोगाला महात्मा गांधींचा विरोध आहे असा गवगवा करून आम्हांला चांगलेंच चिमटींत धरलें; पण मीहि कांहीं कमी वस्ताद नाहीं. मी महात्माजींना तार करून सर्व परिस्थिति कळविली. त्यावर 'अशा निरपवाद प्रसंगीं मुलींनीं नाट्यप्रयोगांत कामें करण्याला माझी हरकत नाहीं' अशी महात्माजींची मला तार आली! मग काय विचारतां! आमचा मुलींचा नाट्यप्रयोग मोठ्या दणक्यानें पार पडला! त्या वेळीं प्रेक्षकांपुढें मीं कृष्णरावांची अशी कांहीं 'बिनपाण्यानें' केली कीं, कांहीं विचारूं नका!

नाट्यप्रयोगांत काम करणाऱ्या मुलींच्या पालकांना भेटून त्या मार्गानेंहि आमचे पाय ओढण्याचा कृष्णरावांनीं प्रयत्न केलेला होता, तो निराळाच ! त्याच गोष्टीला उद्देशून मीं त्या प्रयोगाच्या व्याख्यानांत ' कृष्णरावानें आमची सुभद्रा पळविण्याचा प्रयत्न केला ! ' असें सांगून प्रचंड हंशा पिकविला होता, तो पुष्कळांच्या अजून आठवणींत असेल.

कृष्णरावांच्या अन् माझ्या ' प्रेमाचा ' असा जुना इतिहास आहे. तथापि, इतकें असूनहि आमची ' दोस्ती ' विनतोड आहे. म्हणजे दोघेहि एकमेकांना चांगलेच ओळखून आहोंत ! कृष्णरावांच्या मनाची ठेवणच मुळीं सनातनी ब्राह्मणाची आहे. आचारानें, विचारानें आणि सगळ्याच बाबतींत ते शंभर नंबरी ' सोंवळे ' आहेत. पुण्याच्या एंजिनिअरिंग कॉलेजमध्यें अध्यापक म्हणून काम करीत असतांना केवळ नाइलाज म्हणूनच त्यांना विजार-बुटांचा विटाळ सहन करावा लागला. साहित्यसंमेलनामधील प्रयोजनांत ते मिश्र पंगतींत केव्हांहि जेवायला बसत नाहींत. आपला जाळीदार मुकटा नेसून ते काटकोनानें बाजूला बसावयाला कधींहि चुकावयाचे नाहींत. फारच दाटी-वाटी झाली, तर स्वतःच्या आणि शेजाऱ्यांच्या मध्यें ते एक पाण्याची रेघ देखील काढतील. कृष्णरावांचा एकंदर चेहरामोहरा, पोशाख, चालणें, बोलणें एकंदर अशा थाटाचें आहे कीं, नुकतेच दोन तासांपूर्वीं हे राजापूरहून बोटीनें आले असावेत असाच पहाणारांचा समज व्हावा. शहरी जीवनाचा कोणताहि संस्कार त्यांच्यावर अद्यापपर्यंत झालेला नाहीं. या दृष्टीनें त्यांनीं स्वतःपुरतें तरी जुन्या ' संस्कृती 'चें मोठ्या कसोशीनें संरक्षण केलेलें आहे, हें मुकाट्यानें मान्य करावयाला हवें.

नवीन जीवनांतील किंवा संस्कृतींतील नेमकें त्यांना काय आवडतें किंवा एकादी लहानशीशी गोष्ट तरी आवडते का हें सांगणें मोठें मुष्किल आहे. तसें म्हटलें तर, कृष्णरावांनीं विद्येच्या किंवा जीवनाच्या कोणत्याहि एका विभागाचा नीटसा अभ्यास केला आहे, असें वाटत नाहीं. समाजशास्त्र, मानसशास्त्र, भाषाशास्त्र, रसशास्त्र किंवा साहित्य यांपैकीं एकाहि शास्त्राचें व कृष्णरावांचें दहा दिवसांपुरतें देखील नातें नसेल. ते विद्वान् नाहींत; लेखक नाहींत; कवि नाहींत; वक्ते नाहींत; तसें म्हटलें तर, ते कांहीं एक नाहींत ! असलेच तर ते एक अतिशय कष्टाळू प्रचारक आहेत. त्यांना जें काय वाटतें तेंच त्यांचें

मत, तोच त्यांचा पक्ष आणि तेंच त्यांचें शास्त्र! बारा वर्षें ते एकाच गोष्टीचा आणि एकाच दृष्टिकोणाचा प्रचार करीत आहेत. समाज बदलला, जग बदललें, कल्पना बदलल्या तरी कृष्णराव, बदलणें शक्य नाहीं. त्यांनीं बारा वर्षांपूर्वीं आपल्या तुणतुण्याचा जो एक सूर लावून ठेवलेला आहे, त्याच सुरावर ते जन्मभर गात बसणार! मग कोणी कांहींहि म्हणो अगर काहींहि सांगो!

जिनाजवळ जशी पाकिस्तानाची व्याख्या नाहीं, तशी कृष्णरावांच्या जवळ अश्लीलतेची व्याख्या नाहीं! त्यांना जें जें म्हणून अश्लील वाटेल तेवढें तेवढें अश्लीलच! विनोद, शृंगार, वात्रटपणा, मस्करी, चावटपणा, बीभत्सपणा, पांचटपणा, ग्राम्यपणा या सर्व गोष्टींचा हिशेब कृष्णरावांच्या दृष्टीनें 'सब घोडे बारा टक्के!' यांपैकीं कोणतीहि गोष्ट कृष्णरावाच्या कानांवर पडली कीं, त्यांना 'कसेंसें' वाटलेंच म्हणून समजा! किंबहुना असेंहि म्हणतां येईल कीं, जी गोष्ट वाचल्यानें कृष्णरावांना 'कसेंसेंच' वाटतें, तीच गोष्ट त्यांच्या मतानें अश्लील! अश्लीलतासंशोधनाचा कृष्णरावांचा असा 'गांवठी' खाक्या असल्यामुळें 'अश्लील' म्हणून त्यांनीं निवडलेल्या उताऱ्यांपैकीं शेंकडा नव्वद उतारे केवळ विनोदी, श्रृंगारिक किंवा वात्रटपणाचे असतात! यामुळें आधुनिक तरुणांवर कृष्णरावांच्या प्रचाराचा कांहीं एक परिणाम होऊं शकत नाहीं. उलट त्यांच्या प्रचाराचें आधुनिक मंडळींत हसेंच होतें. साहित्य आणि रसशास्त्राचा व्यासंग कृष्णरावांनीं जर काळजीपूर्वक केला असता आणि त्यांचें समाजशास्त्राचें अध्ययन जर मार्मिक असतें तर आधुनिक साहित्याचे एक जबरदस्त सनातनी टीकाकार म्हणून कृष्णरावांचें महाराष्ट्रांत नांव झालें असतें! बाकी मग, ते 'सनातनी' राहिले असते कीं नाहीं याचा संशय आहे! कोणत्याहि आधुनिक विद्येच्या अभ्यासापासून शंभर पावलें दूर राहणें ही कृष्णरावांच्या संस्कृतिसंरक्षणमंडळाच्या सभासदत्वाची एक महत्त्वाची अट तर नव्हे ना?

कृष्णरावांना राजकीय मतें आहेत कीं नाहींत, हें मला सांगतां येत नाहीं. पण, आपल्या अश्लीलतासंशोधनांत ते राजकीय दृष्टि बाळगून पक्षपात करतात अशी माझी त्यांच्याविरुद्ध प्रामाणिक तक्रार आहे. 'सह्याद्रि' मासिकावर छापून आलेल्या नग्न चित्राविरुद्ध त्यांनीं तक्रार केल्याचें ऐकिवांत

नाहीं ! सावरकरांच्या नाटकांतील अश्लील ग्राम्यपणा त्यांनीं वेशीवर टांगलेला मला माहीत नाहीं ! महात्मा गांधींवर हिंदुमहासभावाल्या पत्रांकडून जी अत्यंत वाणेरडी आणि अश्लील टीका होते, त्याचा निषेध करण्यासाठीं त्यांनीं संस्कृति-संरक्षक-मंडळाच्या सभा भरविलेल्या मला ठाऊक नाहींत. रत्नागिरीला प्रा. ना. सी. फडके हे 'म्हातारे' बनून कृष्णरावांच्या पक्षांत जेव्हां सामील झाले, तेव्हांपासून प्रा. फडके यांच्या कादंबऱ्यांतील अश्लीलतेची घाण कृष्णरावांना आतां येईनाशी झाली आहे. किंबहुना आतां प्रा. फडके आणि त्यांच्या तरुण पत्नी सौ. कमळाबाई यांच्यावर मुंबईतलें एक पत्र अश्लील टीका करतें म्हणून त्याचा निषेध करण्यासाठींदेखील कृष्णराव पुढें सरसावले आहेत. तेव्हां कृष्णराव एरवीं कितीहि सालस, बाळबोध आणि सरळ दिसत असले, तरी त्यांच्यांत ही पक्षपाताची नाजुकशी लुच्चेगिरी आहेच आहे ! त्यामुळें त्यांच्या सात्त्विक सनातनी भूमिकेला थोडेंसें तरी गालबोट लागलेलें आहे, असें मला वाटतें !

कृष्णरावांचे आणि आमचे कांहींहि मतभेद असले किंवा त्यांच्या आणि आमच्यामध्यें पूर्वीं कितीहि 'जोडाजोडी' झालेली असली तरी कृष्णराव हा माणूस मला आवडतो, मनापासून आवडतो आणि कोणालाहि तो आवडण्यासारखाच आहे. आपल्या निरलस आणि नेटाच्या प्रचारकार्यामुळें एक अक्षरदेखील मराठी भाषेंत न लिहितां मराठी साहित्याच्या इतिहासांत कृष्णरावांची भूमिका शास्त्रीय आणि साहित्यिक दृष्ट्या कितीहि सदोष आणि चुकीची असली, तरी मराठी साहित्य हें अंतर्बाह्य निर्मळ व्हावें ही त्यांच्या मनाला रात्रंदिवस तळमळ लागून राहिलेली आहे ही गोष्ट आम्हांलादेखील नाकबूल करतां यावयाची नाहीं ! बस्, कृष्णरावांच्या आणि आमच्या प्रेमांतला खरा दुवा हींच आहे ! आणि एवढ्यासाठींच आम्हीं कृष्णरावांच्या एकसष्टीच्या अभिनन्दनांत सामील होतों आहोंत. परमेश्वर कृष्णरावांना दीर्घायुष्य आणि आरोग्य देवो ! कारण, तसें झालें तरच पुष्कळ वर्षें आम्हांला आणि कृष्णरावांना मराठी साहित्याच्या कल्याणासाठीं अनेक गंमतींचीं भांडणें-लढायला मिळतील आणि झाली तर महाराष्ट्राची फायद्यासह करमणूकच होईल !

## महाराष्ट्राचे श्रेष्ठ गद्य-कवि खांडेकर

नदीचें मूळ आणि ऋषीचें कुळ कधीं शोधूं नये म्हणतात. ह्या संशोधनाचें पर्यवसान नसत्या भानगडी बाहेर येण्यांत होतें असा जो सामान्य प्रवाद आहे तो माझ्या मतें खोटा असून हें संशोधन अत्यंत बिकट आहे म्हणून त्या भानगडींत पडूं नये असा त्या वचनाचा अर्थ असावा असें मला वाटतें. ह्याची प्रचीति मी खांडेकरांचें मूळ शोधण्याचा प्रयत्न करूं लागलों तेव्हां मला आली. खांडेकरांचें बालपण आणि शिक्षण सांगली येथें झालें. त्यांचा पुष्कळसा काळ कोंकणामध्यें कोठल्याशा गांवीं गेला. ह्या गोष्टी मला स्वतःला प्रत्यक्ष माहीत नाहींत. माझी खांडेकरांबद्दलची पहिली आठवण १९१४ च्या सुमाराची आहे. मी त्या वेळीं फर्ग्युसन कॉलेजमध्यें पहिल्या वर्षांत होतों. खांडेकर माझ्या वर्गांत होते कीं नाहीं हें मला माहीत नाहीं. कदाचित् एखादें वर्ष ते माझ्या-पुढें देखील असतील. पण ते फर्ग्युसन कॉलेजमध्यें पहिल्या वर्षाच्या वर्गांत होते एवढें मला अंधुकपणें आठवतें.

खांडेकरांचे एक थोरले बंधु त्यांच्याच अंगकाठीचे आणि त्यांच्यापेक्षां वयानें फार मोठे नसलेले माझ्या चुलत्यांकडे कांहीं निमित्तानें येत. ते डोक्याला एक बारीक पांढरा रुमाल बांधीत. त्यांच्या आणि खांडेकरांच्या आकृतीबद्दल माझ्या मनांत पुष्कळ दिवस संभ्रम होता. पुष्कळ वर्षेपर्यंत माझी अशी कल्पना होती कीं, खांडेकर कॉलेजमध्यें असतांना रुमाल बांधीत असत. हा माझा भ्रम खुद्द खांडेकरांनीं दूर केला, आणि त्या वेळीं मला कळलें कीं, खांडेकरांना एक वडील भाऊ असूं शकतो म्हणून! खांडेकरांचें नांव प्रथम गडकऱ्यांच्या बोलण्यांत आलें. मी, कमतनूरकर आणि इतर कांहीं थोडी उमेदवार लेखक-मंडळी गडकऱ्यांच्यापेक्षां वयानें किती तरी लहान असतां त्यांच्याशीं

शिष्यत्वापेक्षां मैत्रीच्या सलगीनें वागत असूं. गडकरीदेखील आमच्याशीं इतक्या मोकळेपणानें वागत असत, कीं इतरांना त्यांच्या सडेतोड स्वभावाचें भय वाटत असलें तरी आम्हांला तसें कधींच वाटलें नाहीं. गडकरी एके दिवशीं खांडेकरांबद्दल सहज बोलतां बोलतां म्हणाले, "महा हुशार आहे पोरगें ! हें नांव काढणार पुढें !" मीं विचारलें, "कशावरून?" तेव्हां गडकरी आपले आधींच मोठे असलेले डोळे जास्त वटवटीत करून म्हणाले, "अहो, माझें प्रेमसंन्यास मीं फ्रेंच भाषेमधून चोरलें असा धडधडीत आरोप केला ह्या पोरानें माझ्यावर ! आणि माझें 'राजसंन्यास' मीं ह्याला वाचून दाखवलें तेव्हां आपण तें पुरें करून दाखवणार म्हणून त्यानें आश्वासन द्यायला मला कमी केलें नाहीं ! आतां ह्या पोराला काय म्हणावें ! जो पोरगा गडकऱ्यांवर असले आरोप करायला भीत नाहीं, तो कांहीं तरी आयुष्यांत भयंकर करून दाखवणार!" गडकरी आपल्या विशिष्ट विनोदी तऱ्हेनें म्हणाले. ते उद्गार आज अनेक वर्षांनीं आणि अनेक अर्थांनीं खरे ठरले आहेत. गडकऱ्यांवर वाङ्मयचौर्याचा आरोप करणारा तो हुशार मुलगा आज मराठी साहित्यसंमेलनाचा अध्यक्ष झालेला आहे! वास्तविक पहातां खांडेकर हे गडकऱ्यांचे शिष्य ! आज खांडेकर हे कोल्हटकर ह्यांना आपल्या गुरुस्थानीं मानीत असले, आणि माडखोलकरदेखील त्यांच्याबरोबर सामील असले, तरी खांडेकर-माडखोलकर ह्यांच्या लिखाणावर गडकऱ्यांच्या लेखनाचा जितका परिणाम झालेला आहे तितका कोल्हटकरांच्या झालेला नाहीं. खांडेकर-माडखोलकर ह्यांच्या पिढीला कोल्हटकर हे दूरचे डोंगर होते ! त्यांच्या समोरचा तेजस्वी आदर्श म्हटला म्हणजे गडकरी हाच होय. पुढें उतारवयांत खांडेकर-माडखोलकर ह्यांची वृद्ध कोल्हटकरांशीं परिचय-मैत्री झाली आणि त्या वेळीं हीं नवीं नातीं जाहिर करण्यांत आलीं हें सर्व खरें ! पण खरें सांगायचें म्हणजे ही मागून सुचलेली सबब आहे ! खांडेकरांनीं कांहीं म्हटलें तरी त्यांचे गुरु गडकरी हेच होत ! गडकऱ्यांच्या पावलावर पाऊल टाकूनच खांडेकरांनीं मराठी साहित्यांत पदार्पण केलें हें निर्भेळ सत्य आहे. १९१५ ते १९१८ पर्यंत खांडेकर काय करीत होते हें मला माहीत नाहीं. पण कॉलेजचा अभ्यासक्रम सोडून ते एका श्रीमंत वडिलांचे दत्तक पुत्र झाले आहेत असें मीं त्या वेळीं ऐकलें होतें. त्यानंतर त्यांची प्रकृति बिघडली. त्यांच्यावर चेटकें करण्यांत आलीं, त्यांना भूतबाधा झाली, इत्यादि अनेक बातम्याहि मी मधून मधून ऐकत होतों. तथापि

खांडेकरांचें लेखन त्या सुमारास माझ्या वाचनांत आलें नाहीं. त्या सुमारास 'मनोरंजन', 'उद्यान' इत्यादि मासिकांत माझ्या कविता प्रसिद्ध होत होत्या. कमतनूरकर ह्यांच्या नवीन पद्धतीच्या गोष्टीहि 'मनोरंजन' आणि 'नवयुग' मासिकांत त्या वेळीं प्रसिद्ध होऊं लागल्या होत्या. तथापि खांडेकरांचें लिखाण त्या वेळीं प्रसिद्ध होत नसावेंसें वाटतें. एके दिवशीं 'उद्यान' मासिकाचे संपादक गणपतराव कुलकर्णी गडकऱ्यांच्याकडे आले होते. 'उद्यान' मासिकांत त्या वेळीं 'आदर्श' ह्या सहीनें कांहीं विनोदी लेख प्रसिद्ध होत होते. मला स्वत:ला 'आदर्श' हा लेखक अतिशय बुद्धिमान् वाटत होता. त्याच्या सदरील विनोदी लेखांमध्यें गडकरी-कोल्हटकरपद्धतीच्या कोट्यांचा पाऊस पडलेला होता. हा लेखक कोण म्हणून मीं विचारणा केल्यावर मग मला कळलें कीं, 'आदर्श' म्हणजे खांडेकर! माझी आठवण जर बरोबर असेल तर मला असें वाटतें कीं, त्या वेळीं खांडेकर विनोदी लेखक बनण्याच्या अवस्थेंत होते. आणि ज्या तऱ्हेचे विनोदी लेख त्यांच्या लेखणींतून त्या वेळीं बाहेर पडत होते त्यावरून, विनोदी लेखक होण्याचा ते अत्यंत कसून प्रयत्न करीत असावेत असेंच त्या वेळीं मला वाटलें. तथापि पुढें खांडेकर निर्भेळ विनोदी लेखक कां झाले नाहींत ह्याचें कारण माझ्या मतें हेंच असावें कीं, त्या वेळीं त्यांनीं आपल्या एका हेडमास्तरांना उद्देशून कांहीं तरी तिखट विनोदी लेख लिहिला आणि त्यामुळें आपली बदनामी झाली असें त्या हेडमास्तरांना वाटून त्यांनीं उद्यान मासिकाच्या संपादकांना वकिलामार्फत नोटीस दिली. हें प्रकरण पुढें फारसें चिघळलें नाहीं; पण त्यामुळें खांडेकरांच्या विनोदी प्रतिभेला कांहीं काळ चांगलीच दडस बसलेली असावी असें वाटतें!

त्यानंतर फिरून कांहीं वर्षें म्हणजे जवळ जवळ १९२५ पर्यंत खांडेकरांचें लिखाण माझ्या वाचनांत आलें नाहीं. मध्यंतरीं ते कविता करीत असावेत असें वाटतें. मी स्वत: 'केशवकुमार' ह्या टोपणनांवानें कविता प्रसिद्ध करीत असें. केव्हां तरी मीं 'कुमार' ह्या नांवानें कांहीं कविता प्रसिद्ध झालेल्या वाचल्या. तेव्हां माझ्या नांवाशीं अर्धवट स्पर्धा करणारा हा नवीन कवि कोण म्हणून मी रागारागानें चौकशी करूं लागलों तेव्हां मला कळलें कीं, 'कुमार' म्हणजे खांडेकर! ही खांडेकरांची दुसरी अवस्था म्हणजे कवि बनण्याची! लघुक-

थाकार ही खांडेकरांची तिसरी अवस्था माझ्या आठवणीप्रमाणें ' रत्नाकर ' मासिक निघाल्यापासून सुरू झाली. ' रत्नाकर ' मासिकांत खांडेकरांच्या एकाहिपेक्षां एक तेजस्वी लघुकथा जेव्हां प्रसिद्ध होऊं लागल्या, तेव्हां अखिल महाराष्ट्राचें लक्ष ह्या तरुण प्रतिभावान् लेखकाकडे प्रथम वळलें. खांडेकरांच्या गोष्टींमध्यें काव्यमय वाक्यें, विनोदी कोट्या, साहित्यविषयक संदर्भ पुष्कळ विखुरलेले असत. तथापि, ह्या वैशिष्ट्यापेक्षां गोष्टींच्या विषयाचा ताजेपणा, विषय रंगविण्याचा त्यांचा जिव्हाळा आणि लेखनशैलींतील चटकदारपणा ह्यांमुळें खांडेकरांच्या गोष्टी त्या वेळीं एकदम लोकप्रिय झाल्या. खांडेकर आपल्या गोष्टींशीं पूर्ण तादात्म्य पावले असावेत असें चटकन् कोणाच्याहि ध्यानांत येत असे. फडके ह्यांच्या गोष्टींमध्यें लेखकाचा प्रामाणिक जिव्हाळा आढळून येत नसे. लेखक आपल्या कलेचें आणि प्रतिभेचें हेतुपूर्वक प्रदर्शन करीत आहे असाच त्यांच्या गोष्टी वाचीत असतांना वाचकांचा ग्रह होई. त्यामुळें खांडेकरांच्या आधींपासून फडके लघुकथा लिहीत असूनहि, खांडेकर लघुकथेच्या क्षेत्रांत आल्याबरोबर ते फडक्यांना सहज बगल मारूं शकले! ह्याच सुमारास, मला वाटतें, खांडेकरांनीं ' रंकाचें राज्य ' नांवाचें म्युनिसिपालिटी विषयावर एक नाटकहि लिहून टाकलें. ही खांडेकरांची चवथी अवस्था. हें नाटक रंगभूमीवरहि अवतीर्ण झालें; तथापि तें आलें केव्हां अन् गेलें केव्हां ह्याचा कोणाला फारसा पत्ता लागला नाहीं. लघुकथालेखन हा खांडेकरांच्या प्रतिभेचा एकच तेजस्वी उन्मेष महाराष्ट्राच्या डोळ्यांत भरला; आणि त्याबाबत महाराष्ट्रानें त्यांच्याकडून ज्या ज्या अपेक्षा केल्या त्या त्या खांडेकरांनीं भरगच्चपणें पुरवल्या ह्यांत कांहीं संशय नाहीं ! लघुकथाकार म्हणून खांडेकर लोकप्रिय झाले. त्यामुळें त्यांचा लेखनांतील आत्मविश्वास वाढला; त्यांच्या बुद्धींतील धुकें नाहींसें झालें, आणि त्यांच्या प्रतिभेंतील संशोधक मर्मभेदीपणा बाहेर आला. त्याबरोबर त्यांची टीकाकार ही पांचवी तेजस्वी अवस्था महाराष्ट्राला पाहावयाला मिळाली. खांडेकरांची टीका किती प्रभावी आणि तिखट आहे ह्याचा अनुभव त्यांचे टीकाविषय जे जे झाले आहेत त्यांनाच विचारावयाला हवा. मला वाटतें, कवि लोकांना खांडेकरांनीं जितकें लोळवलें आहे तितकें कोणालाच नसेल ! एरवीं अत्यंत गरीब आणि सालस दिसणारे खांडेकर, टीकाकाराच्या आसनावर आरूढ झाले म्हणजे किती क्रूर बनत

ह्याचा दाखला ' सरोज–छेः पंकज ! ' आणि ' त्रिदल-परीक्षण ' ह्या त्यांच्या टीकालेखांवरून कोणालाहि पटून येईल.

' गडकरी–व्यक्ति आणि वाङ्मय ' हा ग्रंथ देखील खांडेकरांच्या टीकात्मक लेखनाचा एक मूर्त पुरावाच म्हटला पाहिजे. गडकऱ्यांच्या चरित्रावर आणि वाङ्मयावर इतक्या झपाट्यानें विस्तृत ग्रंथ लिहून खांडेकरांनीं महाराष्ट्रांतील साहित्यिकांना चकित केलें ! गडकऱ्यांच्यावर मराठी भाषेत जे जे ग्रंथ लिहिले गेले आहेत, त्यांमध्यें खांडेकरांनीं लिहिलेला हा ग्रंथ अधिक चांगला आहे, ह्यांत संशय नाहीं. तथापि, गडकऱ्यांच्याबद्दल खांडेकरांना प्रत्यक्ष माहिती अशी थोडी, आणि गडकरी त्यांचे लेखनगुरु असूनहि त्यांच्या वाङ्मयाबद्दल खांडेकरांच्या मनांत आदर आणि जिव्हाळा कमी ! गडकऱ्यांच्या वाङ्मयांत दोष काढण्याची त्यांच्या मनाची बैठक अगदीं जुनी ! त्यामुळें गडकरी-वाङ्मयाच्या बाबतींत हा ग्रंथ लिहून खांडेकरांनीं पुष्कळसा अन्याय केलेला आहे असें माझें स्वतःचें मत आहे. कसेंहि असो ! पण एक मार्मिक आणि विलक्षण टीकाकार म्हणून तरी ह्या ग्रंथामुळें खांडेकर हे मराठी वाङ्मयांत ख्यात झाले ह्यांत शंका नाहीं. लघुकथाकार आणि टीकाकार ह्या दोन नात्यांनीं महाराष्ट्रांत सुप्रसिद्ध झाल्यानंतर खांडेकरांनीं आपल्या सहाव्या कार्यक्षेत्रांत उडी टाकली. त्यांनीं कादंबरीलेखनास हात घातला ! ' हृदयाची हांक ', ' कांचनमृग ', ' दोन ध्रुव ', ' उल्का ', अशा एकापेक्षांहि एक तेजस्वी कादंबऱ्या लिहून त्यांनीं आपल्या प्रभावी आणि चपल लेखनानें मराठी वाचकांना दिपवून टाकलें ह्यांत संशय नाहीं. 'दोन ध्रुव', 'उल्का' ह्या त्यांच्या दोन कादंबऱ्या तरी मराठी वाङ्मयाचीं दोन भूषणें म्हणून समजावयाला हरकत नाहीं. 'उल्का' ह्या कादंबरींत खांडेकरांची प्रतिभा माध्यान्हीला पोहोंचल्यासारखी वाटते. त्यांच्या सर्व कादंबऱ्यांत ही कादंबरी मला अतिशय आवडते. इतकी सुंदर लेखनशैली मराठी भाषेंतील कोणत्याहि ललित कृतींत आढळून येईल असें मला वाटत नाहीं. विचार आणि भाषा ह्यांची आकर्षकतेच्या बाबींत जणुं काय शर्यतच लागलेली आहे असें आढळन येतें. ह्यानंतर खांडेकरांनीं पुष्कळ कादंबऱ्या प्रसिद्ध केलेल्या आहेत आणि त्यांपैकीं कांहीं लोकप्रियहि झालेल्या आहेत; पण ' उल्का ' च्या पातळीपर्यंत एकहि कादंबरी पोहोंचं शकली नाहीं असें मला प्रामाणिकपणें वाटतें.

'बोलपट-लेखन' हा खांडेकरांच्या प्रतिभेचा सातवा पैलू! 'छाया', 'ज्वाला', 'देवता', 'सुखाचा शोध' हे त्यांचे बोलपट प्रकाशित झालेले आहेत. त्यांपैकीं 'छाया' आणि 'देवता' हे बोलपट अत्यंत यशस्वी ठरले. 'ज्वाला' हा बोलपट दिग्दर्शकाच्या मूर्ख हट्टामुळें अपयशी ठरला. 'सुखाचा शोध' ह्या बोलपटांतील विषय अगदीं नवीन होता; पण त्याची उठावण व्यवस्थितपणें झाली नाहीं. लघुनिबंधकार ही खांडेकरांच्या पराक्रमी प्रतिभेची आठवी बाजू. त्यांचे निबंध फडके ह्यांच्या 'गुजगोष्टी'प्रमाणें किंवा अनंत काणेकर ह्यांच्या 'पिकलीं पानें'प्रमाणें लघुनिबंधलेखनक्षेत्रांत आपलें वैशिष्ट्यपूर्ण अस्तित्व दाखवूं शकले नाहींत हें खरें आहे. कारण त्यांच्या निबंधांची लेखनशैली तितकीशी सुस्पष्ट व सोपी नाहीं; आणि निबंधाच्या आधुनिक तंत्राचा त्यांनीं तितकासा अभ्यास केलेला दिसत नाहीं. वाङ्मय-विषयावरील उत्तम वक्ता हा खांडेकरांच्या साहित्य-कीर्तीचा नववा खांब! खांडेकर हे जितक्या द्रुतगतीनें लिहितात तितक्याच चपलतेनें आणि विपुल-तेनें ते बोलूं शकतात. त्यांची लेखणी जितकी तिखट आहे तितकीच त्यांची जीभहि खवचट आहे. मोठ्या आवाजाची त्यांना अनुकूलता नाहीं; तथापि, ऐनवेळीं विशेष तयारी न करतांना खांडेकर फारच उत्तम बोलूं शकतात! बोलण्यांतहि त्यांचा जिव्हाळा आणि त्यांची तन्मयता विशेष प्रकर्षानें व्यक्त होते. निरनिराळ्या साहित्यसंमेलनांच्या अध्यक्षस्थानावरून त्यांनीं साहित्य-विषयावर जीं जीं भाषणें केलेलीं आहेत, तीं तीं सर्वच अत्यंत मोहक आणि विद्वत्ताप्रचुर अशीं झालेलीं आहेत. खांडेकरांचीं भाषणें मराठी भाषेंतील चिरका-लीन वाङ्मयांत समाविष्ट व्हावयाला हरकत नाहीं. चाळीस-बेचाळीस वर्षांच्या आयुष्यांत संपत्ति आणि प्रकृति ह्यांची अत्यंत प्रतिकूलता असतांना, एका खेड्यांत राहून आणि शिक्षकाची वृत्ति पत्करून खांडेकरांनीं एकनिष्ठतेनें आणि त्यागवृत्तीनें मराठी भाषेची जी थोर आणि तेजस्वी सेवा केलेली आहे तिला मराठी साहित्यांत दुसरी तोड नाहीं. हरि नारायण आपटे आणि विठ्ठल सीता-राम गुर्जर ह्यांच्या इतकेंच विपुल आणि चपल लेखन जर कोणीं केलें असेल तर तें खांडेकरांनींच! मराठी साहित्यांतील खांडेकरांचें स्थान अढळ आहे. त्यांनीं विनोदी लेख लिहिले, टीका लिहिल्या, नाटकें लिहिलीं, कादंबऱ्या लिहिल्या, काव्यें लिहिलीं किंवा पटकथा लिहिल्या तरी खांडेकरांच्या प्रतिभेची

बैठक ही निःसंशय कवीची आहे. खांडेकरांची बुद्धि आणि भावनाहि केवळ कवीं-मध्येंच वैशिष्ट्यानें आढळून येणारी अशी आहे. खांडेकर हे उत्तम लघुकथाकार किंवा कादंबरीकार असले तरी, कथेपेक्षां काव्यामध्येंच त्यांचें मन जास्त तन्मयतेनें रमतें. खांडेकर पद्यात्मक काव्य करीत असले तरी त्यांच्या 'उल्के'-त जेवढें काव्य आहे तेवढें त्यांच्या 'कुमार' कृत प्रासबद्ध काव्यांत आढळून येणार नाहीं. म्हणूनच मी खांडेकरांना मराठी भाषेंतील एक श्रेष्ठ गद्य-कवि संबोधतों. खांडेकरांच्या लेखनांत अलंकार, उत्प्रेक्षा, कोट्या ह्यांची गर्दी फार असते असें जें म्हटलें त्याचीहि मीमांसा तरी हीच आहे कीं, ते एक श्रेष्ठ दर्जाचे गद्य-कवि आहेत! वाचकांनीं पाहिजे तर फिरून खांडेकर-वाङ्मय एकदां ह्या दृष्टीनें वाचून पाहावें म्हणजे त्यांचीदेखील खात्री होईल कीं, खांडेकर हे केवळ लघुकथाकार किंवा कादंबरीकार नसून, ते प्रामुख्यानें एक प्रतिभा-शाली गद्य-कवि आहेत. अशा ह्या कविश्रेष्ठाचा गौरव आज महाराष्ट्रांतल्या साहित्यिकांनीं केलेला आहे ह्याबद्दल आम्हांला हर्ष होत आहे. खांडेकरांच्या हातून ह्याहिपेक्षां उज्ज्वल साहित्यसेवा घडो आणि त्यांच्यावर संपत्ति आणि आरोग्य ह्यांची पूर्ण कृपा राहो हीच आमची प्रार्थना आहे!

नवीन स्त्री निर्माण करणारे

## तत्त्वज्ञानी कादंबरीकार

गेल्या ऑक्टोबरमध्यें साहित्यसंमेलनासाठीं मी नाशिकला एक दिवस आधीं गेलों. गाडींतून स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर उतरलों तों वामनराव जोशी 'या' असें म्हणत समोरून हंसत आले, आणि एक भला मोठा हार त्यांनीं माझ्या गळ्यांत घातला. 'आमच्या परिषदेचा बरं का !' वामनराव म्हणाले. मला खरोखरच लाजल्यासारखें झालें. मी म्हणालों, 'काय हें वामनराव ?' 'कांहीं कांहीं गोष्टी करायलाच पाहिजेत अत्रे !' वामनराव आपल्या नेहमींच्या स्वरांत म्हणाले. तथापि त्यांच्या त्या स्वरांत मला उपचारापेक्षां भावनेचा जिव्हाळा अधिक असावासा वाटला ! परवां स्मशानांत वामनरावांच्या चिर-निद्रित मूर्तीला हार घालतांना 'कांहीं कांहीं गोष्टी करायलाच पाहिजेत अत्रे' हे वामनरावांचे ते शब्द माझ्या कानांत निराळ्याच अर्थानें निनादूं लागले आणि हृदयाची कालवाकालव झाली ! वामनरावांच्या तत्त्वज्ञानानें त्या प्रसंगीं मनाचें समाधान न होतां उलट भावनेचाच प्रक्षोभ अधिक वाढला !

वामनरावांचा आणि माझा अनेक वर्षांचा परिचय होता. अतिशय चांगला परिचय होता. या परिचयाला मैत्री म्हणावें कीं नाहीं याचा मला 'संशय' आहे. अधिकारी आणि वडील साहित्यिक म्हणून मी त्यांना मानीत असें. त्यांचें लेखन वाचावयाला मिळावें आणि त्यांचें संभाषण ऐकावयाला मिळावें म्हणून मी नेहमींच हपापलेला असें. वर्षांतून कधीं दोन दिवस ते माझ्या घरीं आले म्हणजे दोनतीन तास तरी आमची बैठक टिके. या दोनतीन तासांच्या अवधींत आम्ही न भेटलेल्या पूर्वींच्या कालावधीवर असा कांहीं सूड उगवून

घेत असूं कीं कांहीं विचारूं नका ! वामनरावांना सिगारेटस् देण्यांत मला फार आनंद होत असे. वामनरावांची बौद्धिक पातळी एवढी उंच होती कीं, त्यांच्या बुद्धीशीं आणि चारित्र्याशीं लगट करणें ही अशक्यच गोष्ट होती. एरवीं वामनरावांकडे बघतांना ही दूरपणाची जाणीव विशेषच जाणवत असे. तथापि सिगारेटस् ओढूं लागले म्हणजे ते मला जवळ आल्यासारखे वाटत आणि मनाला थोडेंसें बरें वाटे ! वामनरावांच्या पिढीचें वळण आणि त्यांच्या पोशाखाची ठेवण यांच्याशीं त्यांचें टेनिस खेळणें अगर सिगारेट ओढणें या गोष्टी विसंगत वाटल्यासारख्या दिसत; पण आधुनिक पिढीशीं दुवा जोडण्याची ती त्यांच्या सुप्त मनाची धडपड असावी असें वाटतें.

वामनरावांचें व्यक्तिमत्त्व मोठें विचित्र होतें असें या वेळीं म्हटलें तर त्यांच्या-बद्दल अनादर व्यक्त केल्यासारखें होईल असें कोणाला वाटेल. तथापि ही जाणीव ठेवूनहि मी असें म्हणतों. वामनरावांची राहणी, त्यांचें वागणें, बोलणें, चालणें अगदीं साधें होतें. इतकें साधें कीं, त्यांत थोडासा बावळट-पणा होता असें म्हटलें तरी चालेल. तथापि हा बावळटपणा नुसता दैनंदिन वागण्यापुरताच होता. मुद्द्याची गोष्ट आली कीं, वामनरावांचा पक्केपणा तावडतोब प्रत्ययाला येई. आपल्या हातून कोणाचेंहि मन दुखूं नये, किंबहुना जगांत कोणींहि कोणाचें मन दुखवूं नये हें वामनरावांचें ध्येयवचन होतें आणि तें पाळण्याचा ते आटोकाट प्रयत्न करीत. तथापि स्वतः त्यांना एकादी गोष्ट मनोमन पटली कीं तिचा आग्रह करतांना ते इतके कठोर होत कीं, त्यामुळें कोणी दुखावलें जाईल याचा ते विचार करीत नसत. अर्थात् दुखावलेल्या माणसाची ते मागाहून क्षमा मागत ही गोष्ट निराळी.

प्रत्येक प्रश्नाला एकापेक्षां एक अनेक बाजू असतात ही जाणीव महाराष्ट्राला वामनरावांनीं प्रथम करून दिली. माणसानें सर्व बाजूंनीं विचार करून एकादी गोष्ट करावी हें वास्तविक वामनरावांच्या म्हणण्याचें तात्पर्य. तथापि त्याचें पर्यवसान संशयवादांत होऊन वामनरावांना 'संशयात्मा' अशी थोडीशी थट्टेची पण बरीचशी कौतुकाची पदवी मिळाली. सर्व बाजूंचा विचार करायचा म्हणजे संशयाचें भरमसाट धुकें निर्माण करून कांहींच न करतां हात जोडून स्वस्थ बसावयाचें, असा अर्थ नाहीं. वामनरावांनाहि तसा अर्थ अभिप्रेत नव्हता; पण प्रत्यक्ष व्यवहारांत मात्र एखाद्या प्रश्नावर चर्चा करतांना किंवा त्याबद्दल

मत बनवितांना वामनराव इतके बुजल्यासारखे किंवा गोंधळल्यासारखे करीत कीं, कधीं कधीं ते स्वतःला हास्यापद करून घेत असत. एखाद्या प्रश्नावर वामनरावांचें ठाम मत काय आहे असें विचारणें हा एक विनोदाचा विषय होऊन बसला होता. हॅम्लेट छापाच्या या ' निष्क्रिय ' विचारसरणीमुळेंच प्रा. माटे हे त्यांना एकदां ' मंत्रचळे ' असें म्हणाले होते.

वामनरावांच्या या मंत्रचळेपणामुळें कधीं कधीं त्यांच्याबद्दल अगदीं चीड येत असे ! कांहींहि नवीन गोष्ट काढावयाची म्हटली कीं, वामनरावांच्या तत्त्व-ज्ञानाची त्याला मुरड बसलीच म्हणून समजा. तरुण मनांचा त्यामुळें फार हिरमोड होत असे. पण सर्वांना संभाळून नेण्याकडे वामनरावांची दृष्टि असे. साहित्यसंमेलनांत राजकीय प्रश्नांची चर्चा होऊं नये, कारण त्यामुळें सरकारी नोकरांना संमेलनांत भाग घेतां यावयाचा नाहीं असें वामनरावांचें मत होतें. सोलापूर साहित्यसंमेलनांत फॅसिस्ट-विरोधी ठराव एका रॉयिस्टानें आणला असतां ' त्यांत साम्राज्यविरोध हेहि शब्द घालण्यांत यावेत ' अशी मोठ्या धूर्तपणाची उपसूचना आणून त्यांनीं त्या रॉयिस्टाची बंभेरी उडवली ! तथापि त्यांची मूळ भूमिका राजकीय ठराव संमेलनांत येऊं नये हीच होती. नाशिक संमेलनाला त्यांनीं ही भूमिका पटवून देण्याचा अतोनात आग्रह केला. पण आपलें म्हणणें कोणीहि ऐकावयाला तयार नाहीं असें त्यांना पटल्याबरोबर त्यांनीं ती भूमिका सोडून देण्याचा खेळाडूपणाहि दाखविला !

वामनरावांचीं राजकीय मतें काय असावींत हा देखील मोठा वादाचा प्रश्न होता. पंडित सातवळेकरांनीं लिहिलेल्या एका लेखाबद्दल राजद्रोहाच्या आरोपावरून त्यांना तीन वर्षांची शिक्षा झालेली होती. समर्थ विद्यालयाच्या राष्ट्रीय वातावरणांत त्यांच्या आयुष्याचा कांहीं काळ गेला. लो. टिळकांच्या सान्निध्यांतहि त्यांनीं कांहीं वर्षें घालविलेलीं होतीं. अच्युतराव कोल्हटकर यांच्या ' मेसेज् ' या इंग्रजी पत्राचें संपादनहि त्यांनीं केलें होतें. इतका ' राज-कीय ' अनुभव त्यांना असूनहि त्यांनीं देशाच्या राजकारणापासून स्वतःची फार-कत करून घेतली होती. ही फारकत त्यांनीं मुद्दाम करून घेतली असावी असें वाटत. कारण वामनरावांचें पर्वीचें राजकीय वातावरण आणि त्यांची तत्त्वज्ञान-संशोधनाची एकंदर आयुष्यांतील वात्ति यांचें पर्यवसान ते साम्यवादी होण्यां-तच व्हावयाला पाहिजे होतें. ते साम्यावादी कां झाले नाहींत याचें राहून राहून

मला आश्चर्य वाटतें. तथापि, आपल्या राजकीय मतामुळें प्रा. कर्वे यांच्या संस्थांना एवढा देखील उपसर्ग पोहोंचूं नये याबद्दल ते जागरूक असावेत. म्हणून राजकारणाशीं ज्याचा संबंध येईल अशा कोणत्याहि भानगडींत ते पडले नाहींत ! नाहींतर मार्क्सच्या आधुनिक तत्त्वज्ञानाकडे पाठ फिरवून पारंपरिक तत्त्वज्ञानाचा जुना मार्ग चोखाळण्याचें त्यांना कांहींच कारण नव्हतें.

वामनरावांच्या एवढ्या विसंगतिपूर्ण वैचित्र्याचा विचार करूनहि शेवटीं गंमत अशी कीं या साऱ्या विसंगतींना विरघळून टाकणारी अशी एक श्रेष्ठ सुसंगति त्यांच्या स्वभावांत, जीवनांत आणि चारित्र्यांत होती. ही सुसंगति म्हणजे त्यांची साधुवृत्ति ! खरोखरच वामनराव म्हणजे त्याग, तपस्या आणि सौजन्य यांचा सात्त्विक संगमच होते. समाजाच्या कल्याणाबद्दल त्यांचें अन्तःकरण रात्रंदिवस तळमळत असे. सर्वांचें कल्याण व्हावें, समाजांतील मतभेद आणि कलह नाहींसे होऊन सुख आणि शांति नांदावी आणि उदात्त मानवी ध्येयांचा पगडा जीवनावर पडून त्याची उत्क्रान्ति व्हावी हें वामनरावांच्या तत्त्वज्ञानाचें साध्य होतें ! पुष्कळ वेळ वामनराव पडतें घेत. इतकें कीं त्यांच्यावर भ्याडपणाचा आरोप यावा ! तथापि त्या पडतें घेण्याच्या वृत्तीमागें भ्याडपणा नसून सर्वांचें जमावें ही एकच सद्बुद्धि होती. आपलें ध्येय साध्य करण्यासाठीं वाटेल त्या हालअपेष्टा मुकाट्यानें सहन करण्याची वामनरावांची सिद्धता होती. वामनरावांचें आयुष्य दारिद्र्यांत गेलें म्हणून हळहळणाऱ्या माणसांना वामनरावांच्या आयुष्याचें रहस्यच कळलें नाहीं ! दारिद्र्याचें कंकण उघड्या डोळ्यांनीं वामनरावांनीं आपल्या हाताला बांधून घेतलें होतें ! वामनरावांच्या जीवनांतलें हें सौजन्य, ही सात्त्विकता, हा त्याग यांच्यामुळेंच त्यांचें कर्तृत्व आणि साहित्य एवढें उदात्त आणि सोज्वल झालेलें आहे. साहित्य हें सत्य, शिव आणि सुंदर पाहिजे हा त्यांनीं साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदावरून दिलेला संदेश त्यांच्या साहित्यांत संपूर्णतया प्रतिबिंबित झालेला आढळून येईल.

रुक्ष तत्त्वज्ञानाचा अभ्यास केल्यानंतर वामनरावांनीं आपला मोर्चा ललित लेखनाकडे कां वळविला हा प्रश्न सहजच मनांत येतो. तथापि वामनरावांची स्वाभाविक भूमिका ही समाजशिक्षकाची होती, हें लक्षांत घेतलें म्हणजे त्या प्रश्नाचें उत्तर मिळतें. जें तत्त्वज्ञान वामनरावांना स्वतःला पटलें होतें, तें त्यांना समाजाला शिकवावयाचें होतें. त्यासाठीं त्यांनीं कादंबरी हें माध्यम निवडून

काढिलें. वामनरावांच्या कादंबऱ्या या नुसत्या करमणुकीच्या हेतूनें लिहिलेल्या नाहींत. समाजशास्त्र व नीतिशास्त्र यांतलीं अनेक प्रमेयें त्यांनीं आपल्या कादंबऱ्यांतून विशद केलेलीं आहेत. तथापि त्यांच्या कादंबऱ्यांत प्रचारकी पांडित्याचा रुक्षपणा कोठेहि आलेला नाहीं. त्यांच्या कादंबऱ्या म्हणजे काव्य-शास्त्रविनोदाची अत्यंत आल्हाददायक मेजवानीच होय. 'शास्त्र' हा शब्द 'काव्य' आणि 'विनोद' यांच्या बेचकयांत कां वसविलेला आहे याची मख्खी वामनरावांनींच ओळखली! काव्य आणि विनोद यांच्या हृदयंगम आणि रसदार अवगुंठनानें झांकला तरच 'शास्त्रा'चा कठोर कर्कशपणा नाहींसा होतो. याचा प्रत्यय वामनरावांच्या कादंबऱ्या वाचतांना पदोपदीं येतो. शास्त्रीय विषयावरील संवाद किती लालित्यपूर्ण आणि आकर्षक करतां येतात याचीं शेंकडों उदाहरणें 'रागिणी' मधून काढून देतां येतील.

वामनरावांची ललितलेखनाची प्रतिभा अगदीं स्वतंत्र आणि सोज्वळ होती. म्हणूनच 'कादंबरीकार' वामनरावांनीं 'तत्त्वज्ञानी' वामनरावांवर मात केली! वामनरावांची अवलोकनशक्ति मार्मिक होती. त्यांचा जीवनाचा अनुभव आणि अभ्यास व्यापक आणि विविध होता. त्यांची कल्पकता तेजस्वी होती. त्यांच्या विनोदामधील नाजूक जिव्हाळा काळजाला गुदगुल्या करणारा होता. तर त्यांची रसवंती अत्यंत काव्यमय आणि प्रसादपूर्ण होती. श्रेष्ठ कादं-बरीकाराच्या अंगीं लागणारी गुणसंपदा वामनरावांजवळ होती. म्हणूनच मराठी वाङ्मयांत हरि नारायण आपटे यांच्यानंतर कादंबरीचें नवीन युग सुरू करण्याचें कार्य त्यांच्या हातून होऊं शकलें. मध्यम वर्गातली जुन्या वळणाची बाळबोध स्त्री हरिभाऊंनीं चितारली, तर नवीन शिक्षणानें आणि संस्कृतीनें जागृत झालेली समाजांतील उद्यांची नवीन स्त्री चितारण्याचें कार्य वामनरावांनींच केलें! रागिणी, उत्तरा, सुशिला, सरला, हीं जागृत झालेल्या नवीन स्त्रीचीं विविध रूपें होत! हरिभाऊंनीं चितारलेल्या स्त्रियांमुळें स्त्री-जातीबद्दल दया आणि अनुकंपा वाटूं लागते. स्त्रियांच्या उद्धारासाठीं आपण कांहीं तरी केलें पाहिजे असें नुसतेंच वाटायला लागतें. पण वामनरावांच्या मानसकन्यांचा तेजस्वीपणा बघून डोळे दिपतात आणि स्त्रीजातीच्या साम-र्थ्याबद्दल आदर वाटूं लागतो! स्त्रियांच्या बद्दल त्यांना वाटणाऱ्या जिव्हाळ्या-मुळें वामनरावांच्या कादंबऱ्यांतील स्त्रिया जिवंत आणि कर्तृत्ववान् वाटतात!

म्हणूनच कीं काय त्यांनीं चितारलेलीं पुररुपात्रें त्यांच्यासारखींच बावळट वाटूं लागतात !

नवीन स्त्रीची कल्पना महाराष्ट्रापुढें ठेवून वामनरावांनीं समाजाचें फार मोठें कार्य केलें आहे. अण्णासाहेब कर्वे यांच्या स्त्रीशिक्षणाच्या कार्याला वामनरावांच्या कादंबऱ्या या खरोखरच पूरक झालेल्या आहेत. येरंडवण्याच्या महिला पीठामधून ज्या ज्या पदवीधर महिला बाहेर पडल्या त्यांच्या जीवनावर आणि विचारसरणीवर वामनरावांच्याच शिकवणुकीची आणि तत्त्वज्ञानाची छाप पडलेली असल्यामुळें इतर विश्वविद्यालयांतून बाहेर पडलेल्या पदवीधर महिलांपेक्षां त्यांचें व्यक्तिमत्त्व आणि कर्तृत्व अगदीं निराळें आहे असें दिसून येतें. महिला विद्यापीठाच्या पुष्कळशा जी. ए. आणि पी. ए. या चालत्याबोलत्या रागिणी, उत्तरा किंवा सुशिला वाटतात. महाराष्ट्रांतील सुशिक्षित स्त्री ही शिक्षण मिळूनहि पुष्कळ वर्षें बोलकी झालेली नव्हती; ती नुसता कौतुकाचा विषय झालेली होती. सुशिक्षित पुरुषांच्या दृष्टीनेंच ती समाजाकडे पहात होती. स्त्रीच्या दृष्टीनें स्वतःकडे आणि जगाकडे पाहण्याची तिची सिद्धता झालेली नव्हती. पुरुषी जगाबद्दलची तिची भीड अद्यापि चेपली नव्हती. या लाजऱ्या सुशिक्षित स्त्रीला वामनरावांनीं बोलकी केली ! तिच्या स्वतःच्या भावना, तिच्या स्वतःच्या अडचणी, तिच्या बाबतींत झालेला अन्याय, तिचे हक्क या सर्व गोष्टी स्पष्ट आणि निर्भीड शब्दांत पुरुषांच्यापुढें मांडण्याचें धारिष्ट वामनरावांच्या शिकवणुकीमुळें तिच्या अंगीं उत्पन्न झालें. विभावरी शिरूरकर छापाचें जीवंत स्त्रीसाहित्य हें वामनरावांच्याच शिक्षणाचें दृश्य फळ आहे. वामनरावांनीं निर्मिलेल्या या 'नवीन स्त्री'चें तेजस्वी स्वरूप बघून महाराष्ट्रांतील पुष्कळशा पुरुषांनीं डोळे मिटून घेतले असतील आणि पुष्कळशा नवऱ्यांनीं वामनरावांच्या नांवानें बोटेंहि मोडलीं असतील ! पण त्याला काय इलाज आहे ? वामनरावांनीं जागृत केलेली ही उद्यांची नवीन स्त्री आतां स्वतःच्या जातीचा उद्धार करण्यच्या कामीं पुरुषावर अवलंबून राहणार नाहीं हें मात्र नक्की ! वामनराव आतां कालवश झालेले असले तरी वामनरावांच्या शिकवणुकीचें हें वैशिष्ट्य महिला विद्यापीठांत तसेंच अखंडित राहील अशी आमची आशा आहे !

स्त्री-स्वभावाचा जो आदर्श वामनरावांनीं महाराष्ट्रापुढें ठेवला तो त्यागी

आणि ध्येयवादी अशा स्त्रीचा होता ! कामुक आणि भोगी स्त्रीचीं चित्रें प्रा. फडके आणि त्यांचे कांहीं समव्यवसायी कादंबरीकार रंगविण्यांत सध्यां गुंग होऊन गेले आहेत. सुशिक्षित स्त्रियांच्या बुद्धीचे आणि कर्तृत्वाचे विविध आणि तेजस्वी विलास वर्णन करतांना त्यांच्या उन्नत वक्षस्थळांचें किंवा वाऱ्यानें उडवलेल्या पदराचें लोचट वर्णन करण्याची आवश्यकता प्रा. फडके यांच्याप्रमाणें वामनराव यांना कधींहि वाटली नाहीं. फडके आणि वामनराव हे दोघेहि तत्त्वज्ञानाचे विद्यार्थी आणि अध्यापक; दोघेहि फिरून कादंबरीकार, असें असतां स्त्रीकडे पाहण्याचा एकाचा दृष्टिकोण तामसी आणि कामुक तर दुसऱ्याचा सात्त्विक आणि उद्बोधक ! वाङ्मयाच्या विद्यार्थ्यांनीं ही तुलना सविस्तरपणें करून पहाण्यासारखी आहे. वामनरावांचें सर्व ललितसाहित्य उदात्त ध्येयवादानें आणि सोज्वळ भावनांनीं सुगंधित झालेलें आहे. स्त्रियांच्या वातावरणांत पुष्कळ वर्षें ते राहिल्यानें त्यांच्या लेखनशैलीमध्यें भावनांचा हळुवारपणा आणि विचारांचा मनोहर संयम प्रकट झालेला आहे. स्त्रियांच्या कळवळ्यानें वामनरावांचें हृदय भरलेलें होतें म्हणूनच महाराष्ट्राच्या या साक्रेटिसाच्या बुद्धींत भवभूतीच्या भावनेची कोमलताहि निर्माण झाली ! गुलाबाच्या ताटव्यांत कांटे बोचण्याची तरी भीति असते; पण वामनरावांच्या काव्यमय ललितलेखनांत तार्किक कर्कशतेचा एकहि कांटा बोचण्याचा संभव नाहीं ! वामनरावांच्या कादंबऱ्यांतील एकंदर वातावरण इतकें उदात्त आणि सोज्वळ आहे कीं, क्रांतिकारक स्त्रीचें चित्र त्यांनीं समाजापुढें ठेविलें असूनहि प्रतिगामी वृत्तीच्या पुराणमतवादी समाजानें त्यांच्यावर कधींच डोळे वटारले नाहींत किंवा त्यांच्या लेखनामुळें ‘ तशी ’ एखादी खळबळ किंवा चळवळ महाराष्ट्रांत कधींच निर्माण झाली नाहीं. ‘ संस्कृतिसंरक्षक ’ म्हाताऱ्यांच्या डोळ्यांत वामनरावांनीं चांगलीच धूळ टाकली असें म्हणावयाला कांहीं हरकत नाहीं.

महाराष्ट्रांतील उद्यांच्या जागृत स्त्रीचा जनक, एक सामर्थ्यवान् कादंबरीकार, आणि समाजहितासाठीं तळमळणारा एक सोज्वळ तत्त्वज्ञानी आणि प्रभावशाली शिक्षक अशा विविध स्वरूपांत वामन मल्हार जोशी यांची कीर्ति महाराष्ट्रांत चिरकाल टिकेल याविषयीं कोणालाहि शंका नाहीं ! मुंबई

येथील एका सत्कारसमारंभाचे वेळीं वामनरावांनीं जनतेला जो संदेश देऊन ठेविला आहे त्यांतच त्यांच्या कर्तृत्वाचें रहस्य सांठविलेलें आहे.

" नुसत्या विद्वत्तेनें वाङ्मय लिहितां येत नाहीं. जीवन जगल्यावांचून, जीवनांतील संकटांचा अनुभव घेतल्यावांचून जीवनांत आणि वाङ्मयांत जिवंतपणा व तेजस्विता येत नाहीं. निर्मळ, खंबीर आणि त्यागमय जीवन कंठल्याखेरिज, आयुष्यांत कांहीं दिव्य आणि उदात्त तत्त्व सांगावयाचें आहे असें उमाळ्यानें वाटल्याखेरीज जिवंत आणि प्रभावी वाङ्मय लिहितां येणार नाहीं ! "

● ● ●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वल्प
अनुक्र. ७३५५८ वि:
९८८३ नों २०.२.७

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
७९६८

REFBK-0007167